## अचानक नाहीशा झालेल्या व ठावठिकाणा माहित नसलेल्या शासकीय कर्मचारी/निवृत्तीवेतनधारक यांच्या कुटूंबियांना कुटुंबनिवृत्तीवेतन आणि उपदान मंजूर करण्याबाबत.

.................................................................................................

**विहित कार्यपध्दतीचे पालन करणेसंबंधी.**

वित्त विभाग,

परिपत्रक क्रमांक: सेनिवे १००० /प्र.क्र.८३/सेवा-४, दिनांक ३ जुलै,२०००.

वाचा: १) शासन निर्णय, वित्त विभाग क्र.सेनिवे १०८९/४९१/सेवा-४, दि.५ जुलै,१९९३.

२) शासन निर्णय , वित्त विभाग क्र.सेनिवे १०९३/१८०/सेवा-४, दि.७ ऑक्टोबर, १९९३.

३) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र.सेनिवे १०९४/१५६/सेवा-४, दि.२६ जून ,१९९५.

### परिपत्रक

अचानक नाहीशा झालेल्या व ठावठिकाणा माहित नसलेल्य शासकीय कर्मचारी/निवृत्तीवेतनधाकर यांच्या कुटूंबियांना कुटूंबनिवृत्तीवेतन आणि उपदान मंजूर करण्यासंबंधात आवश्यक ते आदेश शासनाने वर नमूद केलेल्या शासन निर्णयाव्दारे निर्गमित केलेले आहेत. वरील शासन निर्णयांमधील विहित कार्यपध्दतीनुसार अचानक नाहीशा झालेल्या व ठावठिकाणा माहित नसलेल्या शासकीय कर्मचा-यांच्या/निवृत्तीवेतनधारकांच्या कुटूंबियांना कुटूंब निवृत्तीवेतन आणि उपदान मंजूर करण्याबाबतची प्रकरणे, संबंधित कार्यालय प्रमुख/विभाग प्रमुख यांनी तयार करुन मंत्रालयीन प्रशासकीय विभागांकडे मंजूरीसाठी पाठविणे आवश्यक आहे. मंत्रालयीन प्रशासकीय विभागाची मंजूर प्राप्त होताच त्याबाबतच्या मंजूरी आदेशांसह अशी प्रकरणे कुटूंबनिवृत्तीवेतन व उपदान यांच्या प्राधिकृतीसाठी, यथास्थिती, महालेखापाल( लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर यांना पाठविणे वरील शासन निर्णयांना अभिप्रेत आहे. तथापि, शासनाच्या आता असे निदर्शनास आले आहे की, बेपत्ता झालेल्या शासकीय कर्मचा-यांची प्रकरणे संबंधित महालेखापालांना सादर करीत असतात. साहजिकच अशा प्रकरणी महालेखापालांकडून आक्षेप घेण्यात येतो व अशी प्रकरणे पुनश्च मंत्रालयीन प्रशासकीय विभागाची मान्यता प्राप्त करण्याच्या कार्यवाहीसाठी संबंधित कार्यालय/विभाग यांच्याकडे परत पाठेविण्यात येतात. अनुषंगाने विहित कार्यपध्दतीचे योग्यरित्या पालन केले न गेल्यामुळे बेपत्ता शासकीय कर्मचा-याच्या कुटुंबियांना कुटूंब निवृत्तीवेतन व उपदान प्राप्त होण्यास विलंब होतो.

२. शासनाने या बाबींची गंभीर दखल घेतलेली असून, सर्व कार्यालय/विभाग प्रमुखांना असे निदेश देण्यात येत आहेत की, बेपत्ता झालेल्या शासकीय कर्मचा-यांच्या प्रकरणी होणारा कालापव्यय टाळण्याच्या दृष्टीने अशी प्रकरणे मंत्रालयीन प्रशासकीय विभागांची मंजूरी प्राप्त केल्यानंतरच संबंधित महालेखापालांकडे

सादर केली जातील याबाबत विशेष दक्षता घेण्यात यावी. तसेच या कार्यपध्दतीचे काटेकोरपणे पालन न करणा-या कर्मचा-यांविरुध्द योग्यती शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात यावी.

३. कार्यालय/विभाग प्रमुखांनी हे आदेश त्यांच्या अधिपत्याखालील सर्व कार्यालयांच्या त्वरीत निदर्शनास आणावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने ,

वसन्त चौधरी,
शासनाचे उप सचिव.

******

ज्या राज्य शासकीय कर्मचा-यांनी सरकारी क्षेत्रातील उपक्रमांमध्ये /
स्वायत्त संस्थांमध्ये/स्थानिक संस्थांमध्ये स्वत:ला सामावून घेतल्यानंतर
निवृत्तीवेतनऐवजीची एक रकमी ठोक रक्कम स्विकारलेली आहे.
अशा कर्मचा-यांच्या बाबतीत अंशराशीकरणाच्या दिनांकापासून १५
वर्षाचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर निवृत्तीवेतनाचा १/३ इतका
अंशराशीकृत भाग पुन:स्थापित करणे..
पूर्ण निवृत्तीवेतनावर महागाई वाढ..

## वित्त विभाग

शासन निर्णय क्रमांक :निअंक १००१/५०/सेवा-४, दिनांक ९ एप्रिल, २००१.

वाचा: १) शासन निर्नय, वित्त विभाग क्र.निअंक १०९७/१२/सेवा ४ दि.२६ मे,१९९७.
२) शासन निर्णय ,वित्त विभाग क्र.निअंक १०९९/३०६/सेवा-४, दि.१५.०९.१९९९.

निर्णय : शासन निर्णय, वित्त विभाग क्र.निअंक १०९९/३०६/सेवा-४ दिनांक १५ नोव्हेंबर,१९९९ च्या तरतूदीनुसार ज्या राज्य शासकीय कर्मचा-यांनी सरकारी क्षेत्रातील उपक्रमांमध्ये/स्वायत्त संस्थांमध्ये सामावून घेतल्यानंतर निवृत्तीवेतनाऐवजी एक रकमी ठोक रक्कम स्वीकारलेली आहे, अशा कर्मचा-यांच्या पुन:स्थापित करण्यात आलेल्या निवृत्तीवेतनाच्या १/३ इतक्या भागाच्या रकमेत सुधारणा करण्याबाबतची प्रकरणे विनियमित करण्याबाबतचे आदेश प्रसृत करण्यात आले आहेत. उपरोक्त शासन निर्णयाच्या परिच्छेद २ च्या तरतूदीनुसार, इतर राज्य शासकीय निवृत्तीवेतनधारकांना वेळोवेळी ज्या दराने महागाई वाढ अनुज्ञेय ठरविण्यात आलेली आहे, त्याच दराने, पुन:स्थापित करण्यात आलेल्या निवृत्तीवेतनाच्या १/३ इतक्या अंशराशीकृत भागावर उपरोक्त शासन निर्णयाच्या परिच्छेद ३ मधील अटींच्या अधीन राहून महागाई वाढ देय आहे.

२. शासनाने आता निर्णय घेतला आहे की, ज्या राज्य शासकीय कर्मचा-यांनी सरकारी क्षेत्रातील उपक्रमांमध्ये/स्वायत्त संस्थांमध्ये/स्थानिक संस्थांमध्ये स्वत:ला सामावून घेतल्यानंतर निवृत्तीवेतनाऐवजीची एक रकमी ठोक रक्कमी स्वीकारलेली आहे आणि जे शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक निअंक १०९७/१२/सेवा ४ दिनांक २६ मे, १९९७ च्या तरतूदींनुसार निवृत्तीवेतनाचा १/३ इतका अंशराशीकृत भाग पुन:स्थापित केला जाण्यास पात्र ठरले आहेत, असे कर्मचारी पुन:स्थापित करण्यात आलेल्या निवृत्तीवेतनाचा १/३ इतका सुधारित अंशराशीकृत भाग व पुन:स्थापित करण्यात आलेल्या निवृत्तीवेतनाच्या १/३ इतक्या सुधारित अंशराशीकृत भागावर प्रदान करण्यात येणा-या निवृत्तीवेतनावरील महागाई वाढीऐवजी, पुन:स्थापनेच्या दिनांकापासून पूर्ण निवृत्तीवेतनावर महागाई वाढीच्या प्रदानास प्राप्त ठरतील . वेगळया शब्दात निवृत्तीवेतनावरील महागाई वाढ पूर्ण निवृत्तीवेतनावर, म्हणजे समावेशन झालेल्या कर्मचा-याने समावेशानंतर सेवानिवृत्तीवेतनाऐवजीची एक रकमी ठोक रक्कम स्वीकारली नसती तर त्यास निवृत्तिवेतनाचा १/३ इतका अंशराशीकृत भाग पुन:स्थापित

झाल्याच्या दिनांकास जे सुधारित निवृत्तीवेतन प्राप्त झाले असते, त्या निवृत्तीवेतनावरच देय ठरेल . तथापि निवृत्तीवेतना

विबाम .

.

वरील महागाई वाढीचे प्रदान उपरोक्त शासन निर्णय, वित्त विभाग दिनांक १५ नोव्हेंबर, १९९९ च्या परिच्छेद ३ मध्ये विहित करण्यात आलेल्या अटींच्या अधीन राहून करण्यात येईल .

३ . शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक निअंक १०९९/३०६/सेवा ४ दिनांक १५ नोव्हेंबर, १९९९ च्या परिच्छेद २ मधील तरतूदी वर निर्देशिल्याप्रमाणे सुधारण्यात आल्याचे मानण्यात येईल .

४ . समावेशित कर्मचारी सरकारी क्षेत्रातील उपक्रम/स्वायत्त संस्था/स्थानिक संस्था इत्यादी मधील त्यांच्या समावेशनापूर्वी जेथे काम करीत होता, त्या मंत्रालयीन प्रशासकीय विभाग/कार्यालये यांनी पूर्ण निवृत्तीवेतनावरील महागाई वाढीच्या प्रदानामुळे देय झालेल्या थकबाकीची परिगणना करावी आणि नेहमीच्या पध्दतीनुसार म्हणजे अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई/नागपूर व कोषागार अधिकारी यांचेमार्फत त्यांचे प्रदान करणे शक्य व्हावे यासाठी निवृत्तीवेतनाचे कागदपत्र, यथास्थिती, महालेखापाल, मुंबई /नागपूर यांचेकडे आवश्यकती मंजुरी देण्यासाठी पाठवावे . समावेशन झालेल्या कर्मचा-यांना शासन निर्णय, वित्त विभाग,क्रमांक निअंक १०९९/३०६/सेवा ४ दिनांक १५ नोव्हेंबर, १९९९ च्या तरतूदीनुसार महागाई वाढ/महागाई वाढीची थकबाकी यापूर्वीच प्रदान केली गेलेली असल्यास ती या आदेशानुसार प्रदान करतांना समायोजित करण्यात यावी .

५ . जेथे समावेशित कर्मचा-यांचा मृत्यु निवृत्तीवेतनाच्या अंशराशीकरणाच्या दिनांकापासून १५ वर्षानंतर किंवा १ एप्रिल, १९८५ यापैकी, जो नंतरचा दिनांक असेल त्यानंतर झाला असेल आणि तो निवृत्तीवेतनाचा अंशराशीकृत भाग पुन:स्थापित करण्याच्या लाभास पात्र ठरला असेल तर त्याचे कुटुंबातील सदस्य/कायदेशीर वारस या आदेशातील तरतुदीनुसार देय ठरणा-या महागाई वाढीच्या थकबाकीची मागणी करण्यास पात्र राहतील .

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने ,

वसन्त चौधरी,
शासनाचे उप सचिव .

******

**सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांना शासनाच्या वतीने न्यायालयीन/ विभागीय चौकशीच्या कामासाठी कराव्या लागणा-या प्रवासासाठी प्रवासभत्ता, दैनिक भत्ता, सवलतीच्या दराने विश्रामगृह व कागदपत्र उपलब्ध करुन देणे इत्यादी सोयी देण्याबाबत.**

सामान्य प्रशासन विभाग,
परिपत्रक क्रमांक सीडीआर १००५/प्र.क्र.८/०५/अकरा ,दि.२० जून,२००६.

परिपत्रक

शासकीय अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुध्द न्यायालयात खटला दाखल करण्यासाठी फौजदारी दंड प्रक्रिया संहितेच्या कलम १९७ अन्वये शासन मंजूरी दिली जाते. अशी मंजूरी देण्याच्या प्रक्रियेत सहभागी असलेल्या तसेच मंजुरी आदेशावर स्वाक्षरी करणा-या अधिका-यांना न्यायालयात साक्षी-पुरावे नोंदविण्यासाठी बोलाविले जाते. प्रत्यक्ष खटला सुनावणी सुरु होईपर्यन्त मंजुरी आदेशावर सही करणारे काही अधिकारी/कर्मचारी सेवानिवृत्त झालेले असतात. या सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचा-यांना ते जरी सेवानिवृत्त झालेले असले तरी शासकीय कामकाजाचा भाग म्हणून न्यायालयात किंवा विभागीय चौकशी प्रकरणी चौकशी अधिकारी यांचेसमक्ष हजर रहावे लागते. तथापि, अशा सेवानिवृत्त अधिकारी/ कर्मचा-यांना उपरोल्लेखित कामाकरिता उपस्थित राहण्याकरिता त्यांना देय असलेला प्रवास भत्ता, दैनिक भत्ता, आवश्यकतेनुसार विश्रामगृहात सवलतीच्या दराने राहण्याची सोय तसेच संबंधित प्रकरणासंदर्भातील कागदपत्राबाबत सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांना माहिती उपलब्ध करुन देण्यासंदर्भात विशिष्ट अशा सूचना खालीलप्रमाणे एकत्रितरीत्या प्रसृत करण्यात येत आहेत.

(१) सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचा-यांना जेव्हा एखाद्या प्रकरणात सरकारी साक्षीकरिता न्यायालयामध्ये/विभागीय चौकशीमध्ये बोलावण्यात येते, त्यावेळी त्यांना संबंधित प्रकरणाबाबतची माहिती करुन देणेही आवश्यक असते. यास्तव प्रकरणाशी संबंधित विभागाने संबंधित प्रकरणाचा संक्षिप्त खुलासा( **briefing** ) तसेच आवश्यकती कागदपत्र संबंधितांना उपलब्ध करुन द्यावीत.

(२) अशा अधिकारी/कर्मचा-यांना प्रवास भत्ता व दैनिक भत्ता वित्त विभाग, अधिसूचना क्र. संकीर्ण १००४/प्र.क्र.५७/सेवा ५, दिनांक २१ मे,२००५ अन्वये विहित केलेल्या दराप्रमाणे देण्यात यावा.

(३) तसेच, विश्रामगृहातील वास्तव्याच्या भाडे आकारणीसंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्र.आरक्षण-२००५/प्र.क्र.२४/मिव्य-२, दिनांक ४.०६.२००५ मधील तरतुदीप्रमाणे भाडे आकारणी करण्यात यावी.

वरील क्रमांक (१) व (२) च्या संदर्भातील खर्चाची देयके सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचा-यांनी प्रकरण ज्या विभागाशी संबंधित असेल, त्या विभागाला सादर करावीत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार ,

का.तु.सातकर,
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

******

**सेवानिवृत्त होणा-या कर्मचा-यांकडून येणे असलेल्या रकमाा तसेच विविध अग्रिमावरील व्याजांच्या येणे रकमा इत्यादींची वसूली उपदानातून करण्यासाठी आवश्यक ती माहिती महालेखापालांना तातडीने पाठविणेबाबत.**

वित्त विभाग,
शासन परिपत्रक, क्रमांक : सेनिवे-१००६/७८/सेवा-४, दिनांक २३ नोव्हेंबर, २००६.

## परिपत्रक

महालेखापाल ( लेखा व अनुज्ञेयता ) - १, महाराष्ट्र , मुंबई यांनी शासनाच्या असे निदर्शनास आणले आहे की, महाराष्ट्र नागरी सेवा ( निवृत्तीवेतन ) नियम, १९८२ मधील नियम १३२ ते १३४(ए) नुसार, सेवानिवृत्ती होणा-या शासकीय कर्मचा-यांकडून करावयाच्या वसूलीबाबत महालेखापाल कार्यालयास अचूक रक्कम कळविणे आवश्यक असते. तसेच महाराष्ट्र नागरी सेवा ( निवृत्ती वेतन ) नियम, १९८२ च्या नियम १२३ मधील तरतूदीनुसार परिशिष्ट ५ मधील नमुना ७ अन्वये, सेवानिवृत्त होणा-या शासकीय कर्मचा-याच्या उपदानातून वसूल करावयाच्या शासकीय येणे रकमेच्या तपशिलामध्ये घरबांधणी अग्रिम, वाहन अग्रिम इत्यादींच्या मुद्दल तसेच वसूल व्हावयाचे व्याज इ.रकमेचा तपशिल महालेखापाल कार्यालयास कळविणे आवश्यक असते.मात्र, शासकीय कर्मचा-यास सेवानिवृत्ती विषयक लाभ त्वरेने अदा करणे शक्य व्हावे म्हणून विभागीय प्रमुख/कार्यालय प्रमुख यांचेकडून असा तपशिल महालेखापाल कार्यालयास कळविण्यात येत नाही तर, उपदानाच्या रकमेचा काही भाग रोखून ठेवण्याची विनंती महालेखापाल कार्यालयास केली जाते.त्यानुसार महालेखापाल कार्यालयाकडून उपदानाच्या काही भाग रोखून ठेवला जातो. मात्र, महालेखापाल कार्यालयाने या संदर्भात वरचेवर विनंती करुनही वसूल करावयाच्या अचूक रकमांचा तपशिल ( मुद्दल, व्याज यांसह ) विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख यांच्याकडून महालेखापाल कार्यालयास कळविण्यात येत नाही.

२. शासन, या परिपत्रकाव्दारे सर्व विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुखांना असे निदेश देत आहे की, अशाप्रकारे रोखून ठेवलेल्या उपदानाच्या रकमांसदर्भातील अचूक तपशिल संबंधित विभाग/कार्यालय प्रमुखांनी महालेखापालांना त्वरेने कळवावा.

३. महालेखापालांकडे प्रलंबित असलेली अशी सर्व प्रकरणे त्वरित निकालात निघावी यासाठी शासनाच्या वरील आदेशांचे काटेकोरपणे पालन केले जाईल, याबाबत सर्व विभाग/कार्यालय प्रमुखांनी योग्य ती दक्षता घ्यावी.

४. वरील शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या **www.maharashtra.gov.in** या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २००६१२०११६२८४५००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने ,

उषा प्र.महाजन.
शासनाच्या उप सचिव.

******

विवाम.

## निवृत्तीवेतनधारकांना निवृत्तीवेतनासाठी बँकेत संयुक्त बचत खाते उघडण्याची मान्यता देण्याबाबत.

वित्त विभाग,
शासन निर्णय, क्रमांक : संकीर्ण १०.०५/प्र.क्र.१९६/कोषा-प्र-५, दि.१२ डिसेंबर, २००७.

वाचा: १) वित्त विभाग, निर्णय क्र.डीएटी - १३७५/४/७५/एडीएम -९, दि.१८.९.१९७५.
२) वित्त विभाग, निर्णय क्र. टीआरडब्ल्यु -१३७६/७६0/एडीएम -९, दि.११.३.१९७६.
३) वित्त विभाग, निर्णय क्र. टीआरडब्ल्यु -१३७६/१४९२/एडीएम-९, दि.६.७.१९७६.

### प्रस्तावना :

महाराष्ट्र शासनाच्या निवृत्तीवेतनधारकांना बँकेमार्फत निवृत्तीवेतन प्रदान करणे या योजनेच्या अंमलाखली येणा-या निवृत्तीवेतनधारकाने, योजनेंतर्गत असणा-या प्राधिकृत बँकेत स्वत:च्या एकटयाचे ( **Single name** ) नावाने सेव्हींग खाते सुरु करावे अशी तरतूद योजनेत आहे. महाराष्ट्र शासनाच्या निवृत्तीवेतनधारकांना वरील योजनेंतर्गत संयुक्त खाते सुरु करण्यास मान्यता द्यावी किंवा कसे ही बाब शासनाच्या विचाराधीन होती. आता प्रस्तुत प्रकरणी शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

### शासन निर्णय :

शासन निर्णय, वित्त विभाग,क्र.डीएटी-१३७५/४/७५/एडीएम ९ दि. १८.९.१९७५ मध्ये अंशत: सुधारणा करुन वरील योजनेकरिता प्राधिकृत केलेल्या बँकेत निवृत्तीवेतनधारकाने स्वत: व ज्या नावे कुटुंब निवृत्तीवेतनाचे प्राधिकार पत्र अस्तित्वात असेल अशा नावे संयुक्त बचत खात्यात निवृत्ती वेतन जमा करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

निवृत्तीवेतनधारकाने निवृत्तीवेतनासाठी कुटुंबातील व्यक्तींसह सुरु केलेले संयुक्त खाते पुढील शर्तीच्या अधीन राहील -

(१) संयुक्त बचत खाते **'Former or Survivor'** किंवा **'Either or Survivor '** या तत्वावर चालविता ( **operate** ) येईल.

(२) निवृत्तीवेतनधारकाच्या बँक खात्यात एकदा निवृत्तीवेतनाची रक्कम जमा केल्यावर शासनाची जबाबदारी संपुष्टात येईल.त्याच्या/ तिच्या सहखातेदाराने चुकीने वा निवृत्तीवेतनधारकाच्या पश्चात रक्कम काढली तर त्याची जबाबदारी निवृत्तीवेतनधारकाची राहील.

(३) निवृत्तीवेतन फक्त निवृत्तीवेतनधारकाच्या हयातीत देय असल्याने त्याच्या/तिच्या मृत्यूची माहिती अधिदान व लेखा अधिकारी/कोषागार अधिकारी तसेच बँकेस विनाविलंब व

कोणत्याही परिस्थितीत मृत्यूच्या दिनांकापासून एक महिन्याचे आत सहखातेदाराने कळविणे बंधनकारक राहील. तसेच निवृत्तीवेतनधारकाचा मृत्यू झाल्यास संयुक्त खाते कोषागार कार्यालयाच्या सूचनेवरुन बँकेकडून बंद करण्यात येईल.

(४) निवृत्तीवेतनधारकाचे मृत्यूच्या दिनांकास बँक खाती शिल्लक असलेली निवृत्तीवेतनाची रक्कम, निवृत्तीवेतनधारकाने सहखातेदाराचे नावाने नामनिर्देशन केले नसेल तर कायदेशीर वारस असल्याच्या सक्षम प्राधिका-याचा दाखला सादर केल्याशिवाय सहखातेदाराला, संयुक्त खात्यातून रक्कम काढता येणार नाही. तसेच अशा अधिकच्या रकमेचे प्रदान झाले तर अतिप्रदानाची रक्कम कुटुंबनिवृत्तीवेतनातून, संयुक्त खात्यातून किंवा त्याच्या /तिच्या सहखातेदाराच्या नांवे असलेल्या वैयक्तिक खात्यातून वसूल करण्यात येईल.

(५) निवृत्तीवेतनधारकाच्या मृत्यूच्या दिनांकानंतर माहिती अभावी त्याच्या/तिच्या संयुक्त खात्यात निवृत्तीवेतनाची रक्कम जमा केली गेल्यास व सदर अतिप्रदानाची रक्कम खात्यात तशीच शिल्लक राहिल्यास अतिप्रदानाची रक्कम बँकेकडून शासनास परत केली जाईल.

२. सध्या निवृत्ती वेतन घेणा-या निवृत्तीवेतनधारकास त्याचे/तिचे निवृत्तीवेतन संयुक्त खात्यामध्ये जमा व्हावे अशी इच्छा असेल तर त्याला/तिला तो/ती सध्या ज्या अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई/कोषागारातून निवृत्तीवेतन घेतो/घेते, त्या अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई/ कोषागार अधिकारी यांना निवृत्तीवेतनधारकाने व सहखातेदाराने ह्या शासन निर्णयाव्दारे विहित केलेल्या शर्ती व अटी मान्य असल्याबाबत सोबतच्या विहित नमुन्यात समुचित रकमेच्या स्टॅम्प पेपरवर *( समुचित रकमेच्या स्टॅम्प पेपरवर या शब्दाऐवजी" शासनाकडून वेळोवेळी निर्धारित केलेल्या नियमानुसार शपथपत्र द्यावे" अशी दिनांक ४.७.२००८ च्या वित्त विभाग, शुध्दीपत्र क्र.संकीर्ण १०.०५/प्र.क्र.१९६/कोषा-प्र ५ अन्वये सुधारणा)* शपथपत्र द्यावे . शपथपत्र प्राप्त झाल्यावर संबंधित कोषागार अधिका-याने/ अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई यांनी निवृत्तीवेतनधारकास संयुक्त खाते उघडण्याची सुविधा देण्याबाबतचे प्राधिकारपत्र बँकेस द्यावे व त्याप्रमाणे खालील अनुक्रमांक ३ येथील *( अ.क्र ३ येथील " या शब्दाऐवजी " शपथपत्रातील अनुक्रमांक ३ " अशी दिनांक ४.७.२००८ च्या शुध्दीपत्रानुसार सुधारणा )* सूचना देखील बँकेच्या निदर्शनास आणावी.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या **www.maharashtra.gov.in** या अधिकृत वेब साईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २००७१२१२१७३४४२००१असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने ,

सुनिल सोनी,
प्रधान सचिव (वित्तीय सुधारणा)
वित्त विभाग.

******

विवाम.

राज्य शासनाच्या निवृत्तीवेतनधारकांना बँकेमार्फत निवृत्तीवेतन प्रदान करण्याची सुधारित पध्दत.

वित्त विभाग,
शासन निर्णय क्रमांक निवेयो-१००७/प्र.क्र.१२०/कोषा प्र- ५ दि.१८.८.२००८.

वाचा : १) वित्त विभाग ठराव क्र.डीएटी १३७५/३/७५/एडीएम-९ दि.१८ सप्टेंबर,१९७५.
२) वित्त विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण १००५/प्र.क्र.१९६/कोषा-५ दि.१२.१२.२००७.

**प्रस्तावना:**

निवृत्तीवेतनधारकांच्या विविध अडचणींचा साधकबाधक विचार करुन बँकेमार्फत निवृत्तीवेतन प्रदानाबाबतचा विद्यमान योजनेचे सुलभीकरण करुन निवृत्तीवेतनधारकांना प्रथम व नियमित निवृत्तीवेतन प्रदान विनाविलंब व्हावे तसेच निवृत्तीवेतनधारकांना कोठुनही, केव्हाही व कोणत्याहीवेळी निवृत्तीवेतन विषयक माहिती अधिक सोईस्कररीत्या शीघ्रतेने उपलब्ध होऊन निवृत्तीवेतनविषयक सेवा अधिक तत्परतेने उपलब्ध व्हावी यासाठी कोषागास्तरावर सुविधा कक्ष स्थापन करणे व निवृत्तीवेतन संकेतस्थळ ( **Pension Website** ) कार्यान्वित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. सबब वरील संदर्भ क्र.१ व २ समोरील शासन निर्णय अधिक्रमित करुन शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय:**

राज्यातील सर्व निवृत्तीवेतनधारकांना वेळेवर निवृत्तीवेतन अदा होण्याच्यादृष्टीने तसेच त्यांच्या अडचणींचे निवारण होऊन एकूण निवृत्तीवेतन वितरण कार्यपध्दतीवर संनियंत्रण ठेवण्यासाठी संचालक, लेखा व कोषागारे यांच्या अधिनस्त कार्यरत असलेल्या उपसंचालकापैकी एका उपसंचालकाकडे निवृत्तीवेतनावर संनियंत्रण व तक्रारींच्या निराकरणाचे काम सोपविण्यात यावे. त्यांना उपसंचालक (निवृत्तीवेतन) असे संबोधण्यात यावे. त्यानुसार उपसंचालक (निवृत्तीवेतन) यांनी पुढील कामे पार पाडावीत.

**I )** कार्यालय प्रमुखाकडून महालेखापाल यांच्याकडे मंजूरीसाठी सादर करण्यात आलेल्या सर्व निवृत्तीवेतन प्रकरणांची अद्यावत यादी ठेवणे.

**ii )** महालेखापाल यांच्याकडे अंतिम मंजूरीसाठी सादर केलेल्या सर्व निवृत्तीवेतन प्रकरणांचा पाठपुरावा करणे. आवश्यक अतिरिक्त माहिती उपलब्धतेसंबंधी संबंधित कार्यालय व महालेखापाल यांच्यादरम्यान समन्वय राखणे.

**iii )** महालेखापाल यांच्याकडील मंजूर निवृत्तीवेतन प्रकरणांची माहिती संबंधित कोषागारास उपलब्ध करणे व संबंधित निवृत्तीवेतनधारकास विनासायास निवृत्तीवेतन मिळेल असे पाहाणे.

**iv )** प्रथम निवृत्तीवेतन प्रदानासंदर्भात महालेखापाल कार्यालयास आवश्यक असलेली सर्व माहिती उपलब्ध करुन देणे.

v ) निवृत्तीवेतनधारक संबंधित कोषागाराकडून वेळेवर नियमितपणे निवृत्तीवेतन मिळत असल्याबाबतची खातरजमा करणे .

vi ) निवृत्तीवेतनधारकांना अनुज्ञेय असलेले निवृत्तीवेतन केंद्रिभूत पध्दतीने **ECS** प्रणालीव्दारे वितरीत करण्याकरिता आवश्यक पध्दती विकसित करणे .

vii ) निवृत्तीवेतनधारकांना निवृत्तीवेतन अदा करण्याच्या योजनेअंतर्गत जास्तीत जास्त बँकांचा समावेश करण्यासाठी वेळोवेळी आवश्यक कार्यवाही करणे .

viii ) कोषागर कार्यालयात स्थापन करण्यात आलेल्या निवृत्तीवेतन सुविधा कक्षाच्या कामावर संनियंत्रण ठेवणे .

ix ) निवृत्तीवेतनासंदर्भातील अर्थसंकल्पिय तरतूदी व खर्चासंदर्भात सनियंत्रण करणे .

x ) निवृत्तीवेतनधारकांच्या वैयक्तिक तसेच निवृत्तीवेतनधारकांच्या संघटनांच्या तक्रारींचे निराकरण करणे .

xi ) निवृत्तीवेतनासंदर्भातील संकेतस्थळ अद्ययावत ठेवणे .

## निवृत्तीवेतनधारकांसाठी सुविधा कक्ष / संकेतस्थळ ( **Website** )

२ . निवृत्तीवेतनधारकांना सेवा तात्काळ उपलब्ध करुन देण्यासाठी तसेच त्यांच्या अडचणींचे निराकरण करण्यासाठी संचालक, लेखा व कोषागारे यांनी पुढील तीन महिन्यात प्रत्येक कोषागार कार्यालयात एक निवृत्तीवेतन सुविधा कक्ष स्थापन करावा. निवृत्तीवेतनधारकास अधिदान व लेखा अधिकारी कार्यालय/कोषागार कार्यालय यामध्ये विविध ठिकाणी संपर्क साधण्याचा त्रास टाळण्याच्या हेतुने व त्याला सर्व सुविधा एकाच ठिकाणी उपलब्ध होण्याकरिता सदर सुविधा कक्ष कार्यरत राहील .

३ . वरीलप्रमाणे निर्माण करण्यात येणा-या सुविधा कक्षामार्फत खालील कामे हाताळली जातील .

i) कोषागार कार्यालयाने प्राप्त निवृत्तीवेतन प्रकरणाची नोंदवही ठेवणे, प्रथम निवृत्तीवेतन सुरु करणे .

ii) प्रथम निवृत्तीवेतन प्रदानाच्यावेळी संबंधित निवृत्तीवेतनधारकास सेवानिवृत्तीनंतरचे इतर लाभ (अंशराशीकरण, मृत्यू-नि- सेवा उपदान इत्यादी) अदा केली असल्याची खात्री करणे .

iii) निवृत्तीवेतनधारकास केलेल्या प्रथम प्रदानाची माहिती उप संचालक (निवृत्तीवेतन) मार्फत महालेखापालांना विनाविलंब कळविणे .

iv ) निवृत्तीवेतन प्रकरणाचे वेळोवेळी विहित केलेल्या नियमांनुसर वार्षिक नुतनीकरण करणे .

v) निवृत्तीवेतन धारकार्माफत वेळोवेळी आलेल्या सर्व अर्जाचे विहित केलेल्या कालावधीमध्ये निपटारा करणे, सुधारित निवृत्तीवेतन दाखला देणे , कोषागाराचे बदल, कुटुंबनिवृत्तीवेतन सुरु करणे, इत्यादी सर्व प्रकारच्या अडचणींचे निवारण करणे .

vi ) निवृत्तीवेतनधारकांना आयकर दाखला उपलब्ध करून देणे .

vii ) तात्पुरते निवृत्तीवेतन प्रदानासंदर्भात संबंधीत कार्यालयांशी समन्वय ठेऊन त्यावर संनियंत्रण करणे .

viii) शासनास येणे असलेल्या वसुलपात्र रक्कमांची नोंदवही ठेवणे, व त्यानुसार संबंधित कर्मचा-याच्या निवृत्तीच्या दिनांकानंतर निवृत्तीवेतनलाभातून वसुल करणे .

४.   शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक अर्थसं -१००८/प्र.क्र.४/भाग २ /कोषा प्रशा-४ दिनांक २८ फेब्रुवारी, २००८ अन्वये अधिदान व लेखा कार्यालय /सर्व कोषागार/उप कोषागार कार्यालये येथे अर्थसंकल्प वितरण प्रणाली व सेवार्थ आज्ञावली यांच्या सुविधा उपलब्ध करुन देणे, त्या प्रणालींच्या अंमलबजावणीत येणा-या अडचणींचे निवारण करणे यासाठी सुविधा केंद्रे स्थापन करण्यात आली आहेत. सदर ठिकाणी संगणक उपलब्ध आहेत. ही सुविधा केंद्रे आहरण व संवितरण अधिकारी यांच्यासाठी वापरात असली तरी ती सुविधा केंद्रे अधिदान व लेखा कार्यालय/सर्व कोषागार/ उप कोषागार कार्यालये यांनी निवृत्तीवेतनधारकास वापरण्यासाठी विनामूल्य उपलब्ध करुन देण्यात यावीत.

५.   निवृत्तीवेतनधारकांना त्यांच्या निवृत्तीवेतनातील वाढ ,बदल,थकबाकी व अन्य माहिती आणि त्या संदर्भातील अर्जांचे नमुने संबंधित शासन निर्णय, आयकर कपात इत्यादीबाबत व्यापक स्तरावर माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी व त्यामध्ये बदल नोंदविण्यासाठी संचालक, लेखा व कोषागारे यांच्याकडून पुढील तीन महिन्यांच्या कालावधीत निवृत्तीवेतन संकेतस्थळ सुरु करतील. नजीकच्या सहा महिन्यांच्या कालावधीत नव्याने सेवानिवृत्त होणा-या सर्व शासकीय कर्मचा-याच्या सेवानिवृत्ती प्रकरणाची स्थितीही या संकेत स्थळावर नोंदविण्यात येईल.

६.   याचबरोबर आहरण व संवितरण अधिकारी, महालेखापाल आणि संचालक , लेखा व कोषागारे यांना संकेतस्थळावरुन परस्परांसंबंधी निवृत्तीवेतनधारकांसंदर्भात, तात्पुरते निवृत्तीवेतन प्रदानाची, वसूलपात्र रकमांची केलेल्या वसूलीची, महालेखापालांकडून प्राप्त झालेल्या निवृत्तीवेतन प्रदान आदेशाची व यानुषंगाने कोषागारे कार्यालयांकडून करण्यात येणा-या कार्यवाहीबाबतची सद्यस्थिती दर्शविणारी अद्यायावत माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल.

## निवृत्तीवेतनधारकांना स्वतंत्र निवृत्तीवेतन लेखा क्रमांक देण्याची पध्दती

७.   याउद्देशाने नव्याने विकसित केलेल्या संगणकीय प्रणालीव्दारे प्रत्येक निवृत्तीवेतनधारकांस स्वतंत्र निवृत्तीवेतन लेखा क्रमांक ( **Unique I.D.**) देण्यात येईल. सदर क्रमांकाव्दारे संबंधित निवृत्तीवेतनधारकाबाबतची माहिती संकेतस्थळावरुन अथवा कोषागार कार्यालयातील सुविधा कक्षातून प्राप्त करता येऊ शकेल. सदर निवृत्तीवेतन लेखा क्रमांक हा खालील कार्यपध्दती अवलंबून देण्यात यावा.

(i)   ज्या कर्मचा-यांना वरील संदर्भ क्र:२ येथील दि.७ जुलै २००७ च्या शासन निर्णयान्वये नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू करण्यात आली आहे. त्यांना सदर योजनेंतर्गत लेखा क्रमांक प्राप्त झाला आहे. त्यांच्याबाबतीत निवृत्तीवेतनाकरिता वरीलप्रमाणे देण्यात आलेला क्रमांक कायम राहील.

(ii)   तसेच ज्या सेवानिवृत्त कर्मचा-यांना विशिष्ट संकेतांक/लेखा क्रमांक देण्यात आलेला नाही, अशा निवृत्तीवेतनधारकांच्याबाबतीत खालीलप्रमाणे वीस अंकांचा लेखा क्रमांक (भाग- अ मध्ये दर्शविलेला अकरा अंकी कार्यालयीन संकेतांक व भाग- ब मध्ये दर्शविलेला कर्मचारी नऊ अंकी संकेतांक) देण्यात यावा.

भाग – अ) पहिले अकरा अंक खालील बाबी दर्शवितील.

(१) पहिला अंक – निवृत्तीवेतनधारक निवृत्तीच्यावेळी कार्यरत असणा-या संस्थेचा प्रकार दर्शविल. उदा:

| | |
|---|---|
| शासकीय कर्मचा-यांसाठी .. .. .. .. | १ |
| जिल्हापरिषद कर्मचा-यांसाठी .. .. .. | २ |
| मान्यताप्राप्त व अनुदानित अशासकीय शाळांसाठी .. .. | ३ |
| मान्यताप्राप्त व अनुदानित माध्यमिक शाळांसाठी . .. | ४ |
| कृषितर विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्नित मान्यताप्राप्त व अनुदानित अशासकीय महाविद्यालयांसाठी .. .. .. | ५ |
| कृषि विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्नित अनुदानित महाविद्यालयांसाठी .. | ६ |

(२) पुढील चार अंक :-त्यांच्या निवृत्तीच्या लगतपूर्वी वेतन आहरित केलेल्या कोषागार/ उपकोषागार यांचा संकेतांक दर्शवतील. (अपवादात्मक परिस्थितीत कोषागार/उप कोषागार यांचा संकेतांक माहित नसल्यास निवृत्तीवेतनधारक सध्या ज्या कोषागार/ उपकोषागारातून निवृत्तीवेतन घेत असेल त्या कोषागार/ उप कोषागाराचा संकेतांक देण्यात यावा.)

(३) पुढील सहा अंक :- सेवानिवृत्तीच्या लगत पूर्वी ज्यांनी वेतन आहरित केले आहे त्या आहरण व संवितरण अधिका-यांचा संकेतांक दर्शवीतील. ( अपवादात्मक परिस्थितीत आहरण व संवितरण अधिका-याचा संकेतांक माहित नसल्यास " **000000** " असा संकेतांक द्यावा.)

भाग– ब) उर्वरित नऊ अंक कर्मचारी संकेतांक दर्शवेल. आणि तो खालील बाबी दर्शविल.

(१) पहिली तीन अक्षरे – सेवानिवृत्त कर्मचा-याच्या नावाची आद्याक्षरे असतील.

(२) त्या पुढील एक अक्षर – सेवानिवृत्त कर्मचा-याचे लिंग निदर्शक (पुरुष–**M** व स्त्री–**F**) असेल.

(३) त्यानंतरचे दोन अंक – सेवानिवृत्त कर्मचा-याच्या जन्म वर्षातील शेवटचे दोन अंक दर्शवितील. ( अपवादात्मक परिस्थितीत ज्यांचे जन्मवर्ष माहित नसेल त्यांच्याबाबत शेवटचे दोन अंक " **00** " असे देण्यात यावेत.)

(४) त्यापुढील दोन अंक – प्रणालीव्दारे दिला जाणारा क्रमांक दर्शवितील. ( **System Generated** )

(५) अंतिम अक्षर– पडताळणी संकेतांक ( **check digit** ) असेल.

**( iii )** यापुढे याच पध्दतीने कर्मचा-यांना कर्मचारी संकेतांक ( **Employee Code** ) दिला जाणार असल्याने यापुढे कोणत्याही संगणक प्रणालीव्दारे कर्मचारी संकेतांक दिला जाणार असेल तर तो या पध्दतीनेच देण्यात यावा. या पध्दतीप्रमाणे यापूर्वीच क्रमांक देण्यात आला

असेल तर कर्मचा–याच्या सेवानिवृत्तीनंतरही तोच क्रमांक वापरण्यात यावा. कर्मच–याच्या निवृत्तीनंतर वेगळा क्रमांक देण्यात येऊ नये. यापूर्वी कोणत्याही पध्दतीने कर्मचारी संकेतांक दिला असेल व तो उपरोक्त पध्दतीस अनुसरुन नसेल तर तो बदलण्यात येऊन उपरोक्त पध्दतीप्रमाणे देण्यात येईल.

८. वर नमूद केल्याप्रमाणे प्रत्येक कर्मचा–यास एकादा दिलेला लेखा क्रमांक हा आहरण व संवितरण अधिकारी यांनी संबंधित प्रत्येक कर्मचा–यास रितसार कळवावा. तसेच सदर लेखा क्रमांक संबंधित कर्मचा–याच्या वेतन देयक नोंदवहीमध्ये त्याच्या नावासमोर नोंदवावा. सदरहू लेखा क्रमांक निवृत्तीवेतन प्रदान प्रमाणपत्रावरसुध्दा नमूद करण्यात यावा जेणेकरून संबंधित निवृत्तीवेतनधारकाकडे कायमस्वरुपी माहितीसाठी व विविध संदर्भासाठी जतन करता येईल

<u>निवृत्तीवेतनधारकास निवृत्तीवेतनाचे प्रथम प्रदान :–</u>

९. प्रथम सेवानिवृत्तीवेतन अदा करण्याची पध्दत खालील प्रमाणे राहील.

i) कोषागार कार्यालयात ओळख पटविण्यासाठी उपस्थित झालेल्या निवृत्तीवेतनधारकास " प्रथम येणा–यास प्रथम प्राधान्य " या तत्वानुसार विनाविलंब सेवा देण्यात यावी. निवृत्तीवेतनधारकाला शक्य तो पहिल्या भेटीच्या वेळी त्याची सर्व प्रकारची प्रदाने अदा करण्यात यावी. जर त्याची ओळख पटविण्यास शंका असेल किंवा इतर कोणत्याही कारणामुळे निवृत्तीवेतन अदा करता येत नसेल फक्त तेव्हाच त्यांना पुन्हा येण्यासाठी त्यांच्या सोईप्रमाणे निश्चित तारीख व वेळ देण्यात यावी.

ii) महालेखापालांकडून मंजूर झालेल्या निवृत्तीवेतन प्रदान आदेश तसेच बचतखात्याचा तपशील याआधारे सेवानिवृत्त कर्मचा–याची ओळख पटविल्यानंतर व त्याशिवाय इतर कोणतेही कागदपत्र न मागता निवृत्तीवेतनधारकास निवृत्तीवेतन सुरु झाल्याचे निवृत्तीवेतन प्रदान प्रमाणपत्र ( मूळ)( **Pension Commencement Certificate – Original** ) देण्यात यावे.

iii) अंशराशीकरण, मृत्यु- नि–सेवा उपदान इत्यादीबाबत देय असणा–या सर्व रकमांचे प्रदान, ईसीएस/इएफटी/रेखांकित धनादेशाव्दारे संबंधित निवृत्तीवेतनधारकांच्या बँक खात्यात जमा करण्यासाठी संबंधित बँकेकडे पाठविण्यात यावे. निवृत्तीवेतनधारकास देय रकमेच्या परिगणनेच्या आदेशाची प्रत माहितीकरिता संबंधित निवृत्तीवेतनधारकास पत्राव्दारे व इ–मेलव्दारे देण्यात यावी. तसेच सदर प्रत संकेतस्थळावर प्रत्येक निवृत्तीवेतनधारकाच्या वैयक्तिक ( **Log in** ) मध्येसुध्दा उपलब्ध करुन देण्यात येईल.

<u>निवृत्तीवेतनधारकाच्या निवृत्तीवेतन प्रदान आदेशातील वैयक्ति माहितीतील बदल :–</u>

१०. निवृत्तीवेतनधारकाने त्याच्या वैयक्तिक माहितीत बदल झाल्याबाबत कोषागार अधिकारी यांना कळविल्यास वा सुविधा कक्षाशी संपर्क साधल्यास त्याबाबतच्या वैधतेची खात्री करुन तसा बदल करण्यात यावा. तसेच

शासन / महालेखापाल/ कोषागार यांच्याकडून प्राप्त निदेशानुसार निवृत्तवेतनात होणारे बदल (महागाई भत्ता वगळून) निवृत्तीवेतन प्रदान प्रमाणपत्र (सुधारित -१) )( **Pension Commencement Certificate(Amendment-I )** निवृत्तीवेतनधारकास कळविण्यात यावे. अशा प्रकारे वेळोवेळी निर्गमित करण्यात येणा–या निवृत्तीवेतन सुधारित प्रदान प्रमाणपत्रास क्रमांक १, २........... अशा मालिकेत सलग पध्दतीने (उदा.निवृत्तीवेतन प्रमाणपत्र ( सुधारित १), निवृत्तीवेतन प्रदान प्रमाणपत्र (सुधारित २),.........) क्रमांक देण्यात यावे.निवृत्तीवेतनधारकास सदर सुधारित प्रदान पत्राची प्रत माहितीकरिता संबंधित निवृत्तीवेतनधारकास पत्राव्दारे व इ–मेलव्दारे देण्यात यावी. तसेच सदर प्रत संकेतस्थळावर प्रत्येक निवृत्तीवेतनधारकाच्या वैयक्तिक ( **Log in** ) मध्येसुध्दा उपलब्ध करुन देण्यात येईल.

## तात्पुरते निवृत्तीवेतन प्रदान केलेल्या निवृत्तीवेतनधारकांची माहिती –

११. यापुढे तात्पुरते निवृत्तीवेतन प्रदान केलेल्या शासकीय कर्मचा–यांची अद्यावत यादी कोषागार कार्यालयात ठेवण्यात येईल. निवृत्तीवेतनधारकास जेव्हा अंतिम निवृत्तीवेतन प्रदान करण्यात येईल तेव्हा त्यांना देण्यात आलेल्या तात्पुरत्या निवृत्तीवेतनाची वसुली म.ना.से. (निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील नियम १२६(६)(बी) अनुसार करण्याची जबाबदारी त्या कोषागाराची राहील. याकरिता दिनांक १ एप्रिल २00९ नंतर कोणत्याही निवृत्तीवेतनधारकास त्याच्या कार्यालयाकडून ना हरकत प्रमाणपत्र सादर करण्याची आवश्यकता नाही.

१२. तात्पुरते निवृत्तीवेतन घेणा–या निवृत्तीवेतनधारकाची निवृत्तीवेतन विषयक कागदपत्रे महालेखापालांना पाठविताना निवृत्तीवेतनाचे प्रथम प्रदान, ज्या कोषागार कार्यालयाकडून निवृत्तीपूर्वी अंतिम वेतन अदा केले होते, त्याच कोषागारातून घेणे आवश्यक राहील. अशा निवृत्तीवेतनधारकाची निवृत्तीवेतन विषयक कागदपत्रे महालेखापालांना पाठविताना, त्यामध्ये विभागाने वरील बाबींचा आवर्जुन उल्लेख करणे बंधनकारक राहील. तसेच निवृत्तीवेतनधारकास निवृत्तीवेतनाचे प्रथम प्रदान झाल्यानंतर निवृत्तीवेतनधारकाच्या इच्छेनुसार त्याला खालील परिच्छेद २१ ते २३ प्रमाणे कोषागार बदलण्याची मुभा राहील.

## निवृत्तीवेतनधारकाकडून शासनास येणे असलेल्या रकमांची वसुली.

१३. निवृत्तीवेतनधारकास सेवेत असताना किंवा सेवानिवृत्त झाल्यानंतर निवृत्तवेतनाव्दारे, कोणत्याही कारणास्तव जादा रक्कम देण्यात आल्याचे व त्याची वसूली करावयाची आहे असे आढळल्यास अशी रक्कम म.ना.से. (निवृत्तीवेतन)नियम, १९८२ मधील तरतूदींच्या अधिन, त्याला मंजूर करण्यात आलेल्या निवृत्तीवेतनातून वसूल करता येते.निवृत्त होणा–या शासकीय कर्मचा–याच्या निवृत्तीच्या दिनांकास शासनास देय असलेल्या वसुलपात्र रक्कमांची माहिती कार्यालयप्रमुखाने निवृत्तीवेतन प्रकरणासोबत महालेखापालास कळविण्याची असते. शासनास येणे असलेल्या अशा वसूलपात्र रक्कमांची माहिती महालेखापाल यांचेकडून निवृत्तीवेतन प्रदान आदेशामध्ये नमूद करण्यात येते. व तद्नुषंगाने निवृत्तीवेतनधारकाच्या निवृत्तीवेतनलाभातून ती वसूली करण्याची जबाबदारी संबंधित कोषागाराची असते.

१४. महालेखापालांकडून निवृत्तीवेतन प्राधिकृत झाल्यानंतर कार्यालय प्रमुखास काही वसुली आढळल्यास निवृत्तीवेतन प्रकरण पुनश्च: महालेखापालांकडे पाठविण्याची आवश्यकता नाही. कार्यालय प्रमुखाने अशी

वसुली करण्याबाबत संबंधित कोषागारास कळवावे. त्यानुसार संबंधित कोषागाराने सदर वसुली करावी. तथापि, कार्यालय प्रमुखाने जर शासनास येणे असलेली रक्कम निवृत्तीवेतनलाभातून वसुल करणेबाबत संबंधित कोषागारास कळविले नाही तर अशा शासनास येणे असलेल्या रक्कमांच्या वसुलीबाबतची संपूर्ण जबाबदारी संबंधित कार्यालय प्रमुखाची राहील.

**निवृत्तीवेतन बचत खाते ( Pension Savings Account ):**

१५. निवृत्त होणा-या शासकीय कर्मचा-याची निवृत्तीवेतनविषयक अचूक माहिती व निवृत्तीवेतन बचत खात्याचा तपशिल (बँकेचे नाव, शाखा, खाते क्रमांक इ.) निवृत्तीवेतनधारकास संकेतस्थळावर नोंदविता येईल. या माहितीच्या आधारे कार्यालय प्रमुखाने शासन परिपत्रक, वित्त विभाग क्रमांक सेनिवे १००५/१११/सेवा ४ दिनांक १९ सप्टेंबर,२००५ सोबतच्या जोडपत्र-अ मध्ये विभागाकडील माहिती भरुन तसेच निवृत्तीवेतन बचत खात्याचा सविस्तर तपशिल अचूकपणे नमूद करुन निवृत्तीवेतनाच्या कागदपत्रासोबत महालेखापालांना पाठवावा. महालेखापाल कार्यालयाने सदर निवृत्तीवेतन बचत खात्याचा तपशिल निवृत्तीवेतन प्रदान आदेशात नमूद करावा.

१६. राज्यातील सर्व निवृत्तीवेतनधारकांचे निवृत्तीवेतन सोबतच्या परिशिष्ट अ मध्ये नमूद केलेल्या कोणत्याही एका बँकेत उघडलेल्या निवृत्तीवेतन बचत खात्यामार्फत अदा करण्यात येईल. या यादीत समावेश नसलेल्या एखाद्या बँकेत निवृत्तीवेतनधारकास सध्याच्या बँकेव्यतिरिक्त सोयीच्या अन्य बँकेतून निवृत्तीवेतन घ्यावयाचे असेल तर त्याने त्याबाबत कोषागार अधिका-याकडे लेखी अर्ज सादर करणे आवश्यक आहे. संचालक, लेखा कोषागारे यांच्यामार्फत अशा बँकेचे नाव विहित कार्यपध्दती अवलंबून यादीत समाविष्ठ करण्याची कार्यवाही कोषागार कार्यालयामार्फत करण्यात येईल. त्यानुसार बँक बदलासंबंधिची कार्यवाही पूर्ण झाल्यावर कोषागार अधिका-याने उचित नोंद घ्यावी.

१७. निवृत्तीवेतन बचत खाते हे निवृत्तीवेतनधारकाच्या वैयक्तिक नावाने खालील अटींच्या अधिन राहून कुटुंबनिवृत्तीवेतनासाठी पात्र ठरणा-या व्यक्तीसमवेत निवृत्तीवेतनधारकास संयुक्त निवृत्तीवेतन बचत खाते उघडता येईल.

(अ) संयुक्त निवृत्ती वेतन बचत खाते **Former or Survivor** किंवा **Either or Survivor** या तत्वावर चालविता ( operate ) येईल. यासाठी शासनाकडून वेळोवेळी विहित केलेल्या नियमानुसार सोबत जोडलेल्या परिशिष्ट -ब मधील विहित नमुन्यातील शपथपत्राव्दारे सादर करावे. सदर शपथपत्रानुसार निवृत्तीवेतनधारकाच्या मृुत्यूची माहिती, कोषागार अधिकारी तसेच बँकेस विनाविलंब व कोणत्याही परिस्थितीत मृत्यूच्या दिनांकापासून १ महिन्यांच्या आत सहखातेदाराने कळविणे बंधनकारक राहील.

(ब) निवृत्तीवेतनधारकाच्या संयुक्त निवृत्तीवेतन बचत खात्यात निवृत्तीवेतनाची रक्कम जमा केल्यानंतर शासनाची जबाबदारी संपुष्टात येईल. निवृत्तीवेतनधारकाच्या सहखातेदाराने अशा खात्यातून रक्कम काढली तर त्याची जबाबदारी निवृत्तीवेतनधारकाची राहील.

(क) निवृत्तीवेतधारकाच्या हयातीतच निवृत्तीवेतनाची अनुज्ञेय रक्कम वरीलप्रमाणे संयुक्त बचत खात्यात जमा करण्यात येईल. मृत्यूच्या दिनांकानंतर त्याच्या / तिच्या संयुक्त निवृत्तीवेतन बचत खात्यात निवृत्तीवेतनाची रक्कम जमा केली गेल्यास सदर जादा प्रदानाची रक्कम बँकेकडून शासनास परत केली जाईल. तसेच जादा रकमेचे प्रदान झाले तर जादा प्रदानाची रक्कम कुटुंब निवृत्तीवेतनातून, संयुक्त निवृत्तीवेतन बचत खात्यातून किंवा निवृत्तीवेतनधारकाच्य सहखातेदाराच्या नावे असलेल्या बँकेतील वैयक्तिक खात्यातून वसूल करण्यात येईल.

(ड) निवृत्तीवेतनधारकाने हयातकालिन थकबाकीसाठी नामनिर्देशन केले नसेल तर निवृत्तीवेतन धारकाच्या मृत्यूचा दिनांकास सदर नामनिर्देशन हे सहखातेदाराच्या नावे आपोआप(**Deemed Nomination**) झाल्याचे समजण्यात येईल.

१८. सध्या व नव्याने निवत्तीवेतन घेणा-या निवृत्तीवेतनधारकास,त्याचे /तिचे निवृत्तीवेतन संयुक्त निवृत्तीवेतन बचत खात्यामध्ये जमा व्हावे अशी इच्छा असेल तर निवृत्तीवेतनधारकाने सध्या निवृत्तीवेतन घेत असलेल्या कोषागाराच्या कोषागार अधिका-यांकडे उक्त अटी मान्य असल्याबाबत सोबतच्या परिशिष्ट ब मध्ये शपथपत्र देणे बंधनकारक आहे.

१९. निवृत्तीवेतनधारक ज्या बँकेमार्फत निवृत्तीवेतन घेत असेल त्याऐवजी त्याला त्याच्या सोयीच्या बँक/शाखा मार्फत निवृत्तीवेतन घ्यावयाचे असेल तर त्याने पूर्वीच्या (मूळ) बँकेस व कोषागार कार्यालयास लेखी अर्ज सादर करावा व त्याची एक प्रत नवीन बँकेत स्वत:च्या जबाबदारीवर उपरोक्त संदर्भाधिन शासन निर्णयातील अटी शर्तीच्या अधिन राहून खाते उघडावे.याच्या पूर्ततेची माहिती संबंधित कोषागार कार्यालयास पाठवावी.

निवृत्तीवेतनधारकास नियमित निवृत्तीवेतन देण्याची पध्दत:-

२०. निवृत्तीवेतनधारकांना अदा करावयाचे निवृत्तीवेतन प्रत्येक महिन्याच्या शेवटच्या दिवशी इसीएस (**Electronic Clearing System**) एएफटी (**Electronic Fund Transfer**) किंवा रेखांकित धनादेश (**Crossed Cheque**) व्दारे, निवृत्तीवेतनधारकांच्या बँक खाली जमा होण्यासाठी संबंधित कोषागार अधिकारी यांनी बँकेकडे योग्य वेळी पाठवावे. कोषागार अधिकारी यांनी, निवृत्तीवेतनधारकाची यादी बँकेस/शाखेस पाठविताना माहे मार्च महिन्याचे १ एप्रिल रोजी देय असलेले निवृत्तीवेतन वगळता सदर यादीत प्रत्येक निवृत्तीवेतनधारकाच्या नावासमोर महिन्याच्या कामाच्या शेवटच्या दिवशीच निवृत्तीवेतनधारकाच्या खात्यात निवृत्तीवेतन जमा करावे व निवृत्तीवेतनधारकास निवृत्तीवेतनाचे प्रदान पुढील महिन्याच्या एक तारखेला होईल याबाबत दक्षता घेण्यासाठी बँकेस स्पष्ट सूचना द्याव्यात.निवृत्तीवेतनधारकाला निवृत्तीवेतन वेळेवर मिळण्यासंदर्भात उपसंचालक (निवृत्तीवेतन), लेखा व कोषागारे संचालनालय यांचे संनियंत्रण असेल.

२१. वरीलप्रमाणे प्राप्त झालेल्या रकमेबद्दल बँकेने स्वतंत्र पोचपावत्या व निवृत्तीवेतनधारकाच्या बचतखाती ज्या तारखेस निवृत्तीवेतन जमा केले याचा तपशील कोषागार अधिकारी यांना तात्काळ पाठवावा. यासाठी कोषागार अधिकारी यांनी दक्ष राहून अशी पोच व प्रदानासंबंधीत माहिती बँकेकडून प्राप्त करुन घ्यावी.

## निवृत्तीवेतनासाठी कोषागार बदलण्याची कार्यपध्दती:–

२२. वरील परिच्छेद १0 नुसार किंवा अन्य परिस्थितीत निवृत्तीवेतनधारक ज्या कोषागारामार्फत निवृत्तीवेतन घेत असेल त्याऐवजी त्याला त्याच्या सोयीच्या कोषागारामार्फत निवृत्तीवेतन घ्यावयाचे असेल तर त्याने पूर्वीच्या (मूळ) कोषागार कार्यालयास लेखी अर्ज सादर करावा व त्याची प्रत नवीन कोषागार कार्यालयास पाठवावी.

२३. पूवीच्या (मूळ) कोषागार कार्यालयाने असे प्रकरण अंतिम निवृत्तीवेतन प्रमाणपत्रासह ( **Last Pension Payment Certificate** ) नवीन कोषागार कार्यालयाकडे पाठवावे. अंतिम निवृत्तीवेतन प्रमाणपत्रामध्ये निवृत्तीवेतनधारकास अदा केलेल्या सर्व प्रकारच्या प्रदानांचा तपशिल देण्यात यावा. अशा प्रकारे प्राप्त **PPO** च्या आधारे व एकाच महालेखापालांच्या कार्यक्षेत्रात येत असल्यास त्वरील निवृत्तीवेतन सुरु करावे. या आदेशाची एक प्रत महालेखापालांना व एक प्रत जुन्या कोषागारास पाठवावी.

२४. मूळ कोषागार व नवीन कोषागार हे दोन्ही एकाच महालेखापालांच्या कार्यक्षेत्रात येत नसतील तर नवीन कोषागाराने लगेच तात्पुरते निवृत्तीवेतन सुरु करावे. संबंधित महालेखापालांच्या मान्यतेनंतर नवीन कोषागार कार्यालयाने निवृत्तीवेतनधारकास कायम निवृत्तीवेतन प्रदान करण्याची कार्यवाही करावी.

## निवृत्तीवेतनाचे वार्षिक नूतनीकरण :–

२५. महाराष्ट्र कोषागार नियम १९६८ मधील पुढील नमूद तरतूदीनुसार निवृत्तीवेतन/ कुटूंबनिवृत्तीवेतन खंड न पडता चालू राहण्यासाठी निवृत्तीवेतनधारकाने पुढीलप्रमाणे विहित नमुन्यातील नियतकालिक प्रमाणपत्रे विहित कालमर्यादेत कोषागार कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील. सदर प्रमाणपत्रे ही निवृत्तीवेतनधारकाच्या स्वाक्षरीने व राजपत्रित अधिका-याने प्रमाणित करुन देणे आवश्यक आहे.

अ) महाराष्ट्र कोषागार नियम १९६८ च्या नियम ३३५ मधील तरतूदीनुसार १ नोव्हेंबर रोजी हयात असल्याचे प्रमाणपत्र प्रत्येक वर्षीच्या नोव्हेंबर अखेर सादर करावे. हे प्रमाणपत्र दोन भागात असेल. प्रमाणपत्राचा खालील भाग निवृत्तीवेतनधारकाला पोचपावती म्हणून देण्यात यावा. सदर प्रमाणपत्राच्या वरच्या व खालच्या भागावर परिच्छेद ७ मध्ये दर्शविल्याप्रमाणे देण्यात आलेला कर्मचारी संकेतांक नमूद करण्यात यावा.

ब) त्याचप्रमाणे वरील नियमाच्य नियम ३४२ मधील तरतूदीनुसार कुटुंब निवृत्तीवेतनधारकाने ज्यामुळे निवृत्तीवेतन बंद होईल अशी कोणतीही घटना घडलेली नाही असे प्रतिज्ञापत्र महाराष्ट्र कोषागार नियम १९६८ नमुना ४0 मध्ये प्रत्येक वर्षीच्या नोव्हेंबर अखेर सादर करावे.

टीप : ६0 वर्षावरील कुटुंबनिवृत्तीवेतनधारकास हे प्रतिज्ञापत्र सादर करण्याची आवश्यकता नाही.

क) उक्त नियमाच्या नियम ३४३ मधील तरतूदीनुसार लगतच्या पूर्वीच्या वर्षात शासकीय नोकरीत किंवा शासनामार्फत चालविलेली महामंडळे किंवा ज्या संस्थांना शासकीय मदत मिळते अशा संस्थेमध्ये कोणत्याही पदावर सेवा न केल्याबाबत जुलै आणि जानेवारी अशा ६ महिन्यांच्या

कालावधीसाठी प्रमाणपत्र द्यावे लागत होते. त्याऐवजी आता असे प्रमाणपत्र प्रत्येक वर्षीच्या नोव्हेंबरअखेर सादर करावे.

२६. जे निवृत्तीवेतनधारक प्रकृती अस्वास्थ्य/शारीरिक विकलांगतेमुळे (वृध्दत्वामुळे) स्वाक्षरी करण्यास असमर्थ असतील अशा निवृत्तीवेतनधारकांनी नोंदणीकृत वैद्यकीय व्यवसायिकाचे वैद्यकीय प्रमाणपत्र अंगुठा मुद्रा(**Thumb Impression**) साक्षांकित करुन कोषागार अधिका-यास सादर केले तर ते विधीग्राह्य धरण्यात येईल.

२७. निवृत्तीवेतनधारकाने वरील प्रमाणपत्रे कोषागार अधिकारी यांना प्रत्यक्ष किंवा संबंधित बँकेमार्फत/ टपालव्दारे सादर करावीत. कोषागार अधिकारी यांनी वरील प्रमाणपत्रे निवृत्तीवेतनधारकांकडून प्राप्त करुन घेण्यासाठी पाठपुरावा करावा व अशी प्रमाणपत्रे प्राप्त झाल्याशिवाय १ डिसेंबरनंतरचे निवृत्तीवेतनाचे प्रदान करु नये.

२८. वरील प्रमाणपत्र घेताना निवृत्तीवेतनधारकाच्या उपलब्ध अभिलेखामध्ये कोणत्याही उणिवा असल्यास (नामनिर्देशन प्राप्त नाही, अंशदानामुळे ज्यादा प्रदान बंद करण्याचा दिनांक उपलब्ध नाही इत्यादी) त्या उणिवासंबंधीची कागदपत्रे / माहिती उपलब्ध करुन घेण्याची काळजी कोषागार अधिका-यांनी घ्यावी.

## इतर बाबी

२९. कोषागार या संज्ञेत अधिदान व लेखाधिकारी कार्यालय, मुंबई यांचा समावेश आहे.

३०. वरील तरतुदींच्या अनुषंगाने महाराष्ट्र कोषागार नियम १९६८ प्रकरण-६ मधील नियमामध्ये यथावकाश सुधारणा करण्यात येतील. तसेच शासकीय कर्मचा-यांच्या निवृत्तीवेतन प्रदानासंदर्भात यापूर्वी निर्गमित केलेले सर्व शासन निर्णय, परिपत्रके वा अन्य कोणतेही नियम या आदेशानुसार सुधारित झाले असे समजण्यात येईल.

३१. सदर शासन निर्णय तात्काळ प्रभावाने अंमलात येईल व राज्य शासनाच्या कोषागारातून निवृत्तीवेतन घेणा-या सर्व प्रकारच्या निवृत्तीवेतनधारकांना लागू राहिल.

३२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर संगणक संकेतांक क्रमांक २००८०८१८१७३५१७००१ अन्वये उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या नावांने व आदेशानुसार,

सुनिल सोनी,
प्रधान सचिव (वित्तिय सुधारणा)

xxxxx

## परिशिष्ट अ

**( शासन निर्णय क्र.निवेयो १००७/प्र.क्र.१२०/कोषा प्र.५ दिनांक १८ ऑगस्ट,२००८ चे जोडपत्र )**

(निवृत्तवेतनधारकांना निवृत्तीवेतन प्रदान करणा-या /करु इच्छिणा-या बँका )

स्टेट बँक ऑफ इंडिया
सिंडीकेट बँक
युनायटेड कमर्शियल बँक
देना बँक
बँक ऑफ बरोडा
कॉर्पोरेशन बँक
अलाहाबाद बँक
इंडीयन बँक
बँक ऑफ महाराष्ट्र
बँक ऑफ इंडिया
पंजाब नॅशनल बँक
कोल्हापूर मराठा को-ऑप.बँक
श्री.बलभीम को-ऑप.बँक लि.
श्री.शाहू को-ऑप.बँक लि.
मुंबई जिल्हा मध्यवर्ती को-ऑप.बँक लि.
वर्धा नागरी सहकारी अधिकोष (बँक) मर्या.
डेक्कन मर्चंटस को-ऑप.बँक लि.
जयहिंद को-ऑप.बँक लि.
पुना को-ऑप.रुपी बँक लि.
कोकण मर्कटाईल को-ऑप.बँक लि.मुंबई.

स्टेट बँक ऑफ हैद्राबाद
सेंट्रल बँक ऑफ इंडिया
आंध्र बँक
युनियन बँक ऑफ इंडिया
ॲक्सीस बँक ( युटीआय बँक)
आयसीआयसीआय बँक
एचडीएफसी बँक
आयडीबीआय बँक
फेडरल बँक लिमिटेड
रत्नाकर बँक
कोल्हापूर जिल्हा गव्हर्नमेंट सर्व्हटस बँक
श्री.विरशैव को-ऑप.बँक लि.
बँक नॅशनल दी पॅरीस.
जळगाव जिल्हा म.को-आप.बँक लि.
नगर जिल्हा अर्बन मध्यवर्ती को.ऑप.बँक लि.
खामगाव अर्बन को-ऑप.बँक लि.
सातारा जिल्हा मध्यवर्ती को-ऑप.बँक लि.
जनता कमर्शियल को-ऑप.बँक लि.
धुळे जिल्हा गव्हर्नमेंट स.को-ऑप.बँक

( निवृत्तीवेतनधारकांना निवृत्तीवेतन प्रदान करण्यासंदर्भात वरील बँकांकडून क्षतिपूर्ती बंधपत्र**( Indemnity Bond )** घेण्यात येईल.

ककककककक

## परिशिष्ट –ब

( शासन निर्णय क्र.निवेयो १००७/प्र.क्र.१२०/कोषा प्र.५ दिनांक १८ ऑगस्ट,२००८ चे जोडपत्र )

शपथपत्र

मी, श्री/श्रीमती ........................................................ वय............................. . राहणार .............................................................................................. महाराष्ट्र शासनाच्या निवृत्तीवेतनधारक/निवृत्तीवेतनधारीका असून माझे/माझी पती/पत्नी श्री/श्रीमती.................... ......... ...... ... ...............यांना /हिला माझ्या पश्चात मी कुटुंब निवृत्तीवेतनासाठी प्राधिकृत केले आहे.माझे निवृत्तीवेतन ..........................................या बँकेतील खाते क्रमांक................. मध्ये जमा करण्यात येते. वृध्दापकाळामुळे मी प्रत्येकवेळी पैसे काढण्यासाठी बँकेत जाऊ शकत नसल्यामुळे मी माझे/ माझी पती / पत्नी यांना / हिला माझ्या वर नमूद केलेल्या खाते क्रमांक............................ मध्ये सहखातेदार म्हणून अंतर्भूत करुन इच्छितो /इच्छिते.

२. निवृत्तीवेतन हे केवळ हयातीतच देय असल्याने माझ्या मृत्यूची माहिती अधिदान व लेखा अधिकारी/कोषागार अधिकारी तसेच वर नमूद केलेल्या बँकेस जास्तीत जास्त लवकर व कोणत्याही परिस्थितीत मृत्युच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत कळविण्याची जबाबदारी माझ्या पतीची/ पत्नीची राहील.

३. माझ्या मृत्युनंतर चुकीने संयुक्त खात्यात निवृत्तीवेतनाची रक्कम जमा केली गेली किंवा अतिप्रदान झाले तर अतिप्रदानाची रक्कम कुटुंब निवृत्तीवेतनातून, संयुक्त खात्यातून किंवा माझ्या पतीच्या/ पत्नीच्या नावे असलेल्या वैयक्तिक खाात्यातून किंवा कायदेशीर वारसदार यांचेकडून वसूल करण्यात यावी.

४. माझ्या मृत्युनंतर प्राप्त अतिप्रदानाची रक्कम माझ्या पतीने /पत्नीने शासनास तात्काळ भरणा न केल्यास त्याची वसुली त्यांच्या/तिच्या देय होणा–या कुटुंबनिवृत्तीवेतनातून करण्यात यावी.

स्वाक्षरी ( निवृत्तीवेतनधारक )

स्वाक्षरी ( सहखातेदार )

******

विवाम.

## महाराष्ट्र नागरी सेवा ( निवृत्तीवेतन ) नियम १९८२ मधील नियमांबाबतचे स्पष्टीकरण .

वित्त विभाग, परिपत्रक क्रमांक सेनिवे १००८ /९६/सेवा- ४, दि .३ नोव्हेंबर,२००८ .

### परिपत्रक

**महाराष्ट्र नागरी सेवा( निवृत्तीवेतन) नियम, १९८२ मध्ये करण्यात आलेल्या तरतूदीनुसार शासकीय कर्मचा-याचे निवृत्तीवेतन /कुटुंबनिवृत्तीवेतन व अनुषंगीक बाबी विनियमित करण्यात येतात.तथापि, या नियमातील काही तरतूदीतील अभिप्रेत अर्थाबाबत योग्य अर्थविवरा होत नसल्याने या तरतूदींच्या अनुषंगाने अनेक संदर्भ वित्त विभागास प्राप्त होत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे अशा नियमांतील तरतूदींच्या नियमास अभिप्रेत अर्था बाबत शासन खालील प्रमाने स्पष्टीकरण करीत आहे:-**

| अ. क्र. | म.ना.से. ( निवृत्ती वेतन)नियम १९८२ मधील नियम क्रमांक | मुद्दा | स्पष्टीकरण |
|---|---|---|---|
| १ | नियम २६ | कुटुंब निवृत्तीवेतनधारक एखाद्या गंभीर गुन्ह्याबावत किंवा गंभीर गैरवर्तणूकीवद्दल अपराधी ठरला तर त्याचे कुटुंबनिवृत्तीवेतन शासन रोखून वा काढून घेऊ शकते किंवा कसं ? | सदर तरतूदीनुसार प्रत्येक निवृत्तीवेतन देण्यामागे पुढील काळातील चांगली वर्तणूक ही गर्भित शर्त आहे.' निवृत्तीवेतन' या संज्ञेमध्ये कुटुंबनिवृत्तीवेतनाचाही समावेश आहे.एखाद्या निवृत्तीवेतनधारकाच्या पश्चात त्याच्या कुटुंबनिवृत्तीवेतनधारकास न्यायालयाने गंभीर गुन्ह्यावद्दल अपराधी ठरविले असेल तर अशा प्रकरणी न्यायालयाच्या निर्णयानुसार त्याचे कुटुंबनिवृत्तीवेतन शासन रोखून वा काढून घेऊ शकते.तसेच अशा प्रकरणात महाराष्ट्र नागरी सेवा ( निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील नियम ११६ (१३) (ए) (बी) च्या तरतूदी लागू ठरतात. |
| २ | नियम ३३ | आयोग अपुरस्कृत,हंगामी/ कंत्राटी सेवा/संपकालीन सेवा इ.प्रकारे केलेली तात्पुरती सेवा निवृत्तीवेतनार्ह सेवा म्हणून हिशोबात घेण्यात यावी किंवा कसे ? | १) खालील अटींची पूर्तता होत असल्यासच पूर्वीची सेवा निवृत्तीवेतनासाठी विचारात घेता येते.<br>अ) संबंधित सेवा निवृत्तीवेतनार्ह असणे आवश्यक आहे.<br>ब) अशा सेवेवद्दलच्या वेतनाबाबतचे प्रदान राज्याच्या एकत्रित निधीतून झाले असले पाहिजे.<br>क) या सेवेचे निवृत्तीवेतन विषयक दायित्व राज्य शासनाकडे जमा झाले असले पाहिजे.<br>२) फक्त निवृत्तीवेतनार्ह असलेल्या सेवेसाठी या तरतूदी लागु राहतील. त्याचप्रमाणे नियम ५७ मध्ये नमूद केलेल्या सेवांना निवृत्तीवेतन लागू नाही. व याप्रकारच्या पूर्वीच्या सेवा जोडून देता येणार नाही.<br>३) पूर्वीची सेवा नवीन निवृत्तीवेतनार्ह सेवेस जोडून देण्याकरिता खालील अटींची पूर्तता होणेही आवश्यक आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | अ) शासकीय कर्मचा-याची पूर्वीची नियुक्ती नियमित स्वरुपाची असावी, म्हणजेच त्या शासकीय कर्मचा-याची संबंधित पदासाठी विहित करण्यात आलेल्या नियुक्ती नियमाच्या तरतूदींची (उदा. वयोमर्यादा, शैक्षणिक अर्हता, महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत/ निवड मंडळामार्फत नियुक्ती इत्यादीबाबींची) पूर्तता करुन नियुक्ती झालेली असावी.<br><br>ब) शासकीय कर्मचा-याने नवीन पदासाठी केलेला अर्ज संबंधित कार्यालयाव्दारे/ संबंधित प्रशासकीय प्राधिका-याची योग्यरित्या पूर्वपरवानगी घेऊन वा विहित पध्दतीचे पालन करुन केलेला असावा.<br><br>क) उपरोक्त दोन नियुक्त्यांमध्ये जर खंड असेल तर त्या खंडाचा कालावधी बदलीच्या नियमांनूसार अनुज्ञेय असलेल्या पदग्रहण अवधीहून अधिक नसावा. |
| ३ | नियम ४० व ४१ | सैनिकी सेवा निवृत्तीवेतनासाठी हिशोबात घेताना नियम ४० अनुसार तपासावे की नियम ४१ अनुसार तपासावे ? | सैनिकी सेवेबरोबर प्रत्यक्ष युध्द सेवा ( **war service** ) केलेल्या कर्मचा-यांची सेवा नागरी सेवेत निवृत्तीवेतनासाठी जोडून देताना नियम ४० अनुसार तपासणे आवश्यक आहे.<br>नियम ४१ च्या तरतूदी या प्रत्यक्ष युध्द सेवेव्यतिरिक्त सैनिकी सेवा केलेल्या कर्मचा-यांसाठी लागू आहेत. |
| ४ | नियम ४८ | विहित कार्यपध्दतीनुसार निवड न झालेल्या सेवांमधील सेवाखंड या नियमातील तरतूदीनुसार क्षमापित करता येतील किंवा कसे ? | नियम ३३ नुसार पात्र ठरणा-या सेवांमधील सेवाखंड नियम ४८ मधील तरतूदीनुसार क्षमापित करण्याबाबत विचार करता येईल इतर सेवांबाबत हा नियम लागु नाही. |
| ५ | नियम ४८ | सेवाखंडापूर्वीचा सेवा कालावधी व सेवाखंडाचा कालावधी याबाबत नियमतील तरतुदींची पूर्तता होत नसल्यास खंड क्षमापित करता येतो किंवा कसे ? | नियम ४८(१) मध्ये दिलेल्य अटींपैकी अट क्र. (ब) व (क) ची पूर्तता एखाद्या प्रकरणी होत नसल्यास सदर प्रकरण गुणवत्तेनुसार तपासून याबाबत वित्त विभागाच्या सल्ल्याने निर्णय घेता येईल. |
| ६ | नियम ५४ | शासकीय कर्मचा-याच्या सेवेतील कमतरता क्षमापित करणे व सेवेमध्ये भर घालणे कोणत्या परिस्थितीत करणे नियमांस अभिप्रेत आहे. | १.लघेवेतन (चतुर्थश्रेणी) शासकीय कर्मचा-यांची निवृत्तीवेतनासाठी आवश्यक असलेली किमान अर्हता कारी सेवा पूर्ण होण्यासाठीच य नियमातील दोन्ही तरतूदींचा वापर अपेक्षित आहे.<br><br>२. या नियमातील दोन्ही तरतुदींचा लाभ फक्त रुग्णता निवृत्तीवेतनावर किंवा भरपाई निवृत्तीवेतनावर सेवानिवृत्त होणा-या लघुवेतन (चतुर्थश्रेणी) शासकीय कर्मचा-यांना लागू आहे.<br><br>३) रुग्णता व भरपाई निवृत्तीवेतनावर निवृत्त होणारे लघुलेखन (चतुर्थश्रेणी) शासकीय कर्मचारी बगळून इतर कोणत्याही कर्मचा-यासाठी सदर नियमातील तरतूदी लागू नाही. |
| ७ | नियम ६६ | सदर नियमानुसार स्वेच्छा-सेवा निवृत्तीची नोटीस स्वीकारताना सेवा कालावधी संदर्भात करावयाच्या खात्री संदर्भात | सदर नियमातील तरतुदी खालील बाबींची पूर्तता होत असल्यासच लागू ठरतात.<br>१) शासकीय कर्मचा-याची नियुक्ती विहित कार्यपध्दतीची ( नियम ३३ मध्ये दिलेल्या खुलाशाप्रमाणे ) पूर्तता करुन झालेली असावी.<br>२) संबंधित सेवा निवृत्तीवेतनार्ह असणे आवश्यक आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | ३) दि.३१.१.२००१ पर्यन्त असाधारण रजा २० वर्षाच्या अर्हताकारी सेवेसाठी ग्राह्य धरता येईल. दि.१.२.२००१ पासून वैद्यकीय प्रमाणपत्राव्यतिरिक्त घेतलेली असाधारण रजा निवृत्तीवेतनासाठी अर्हताकारी सेवा म्हणून ग्राह्य धरण्यात येणार नाही.<br><br>४) सदर नियमानुसार स्वेच्छा सेवानिवृत्तीसाठी २० वर्षाची पूर्ण होत असल्याची खात्री करुनच नोटीस स्विकारणे अपेक्षित आहे. तसेच या सर्व बाबींची पूर्तता करुन नोटीस देण्याची जबाबदारी संबंधित कर्मचा-याचीही आहे.<br><br>५) सर्व बाबींची पूर्तता होत नसल्यास स्वेच्छासेवानिवृत्तीचा अर्ज अस्विकृत करणे अपेक्षित आहे. |
| ८ | नियम ६८ | तांत्रिक कारणामुळे रुग्णता सेवानिवृत्तीसाठी अपात्र ठरलयास करावयाच्या कार्यवाहीबाबत. | तांत्रिक कारणामुळे रुग्णता सेवानिवृत्ती/रुग्णता निवृत्तीवेतन देय नसेल , त्या प्रकरणात जर संबंधित कर्मचारी नियमित सेवानिवृत्तीस किंवा स्वेच्छा सेवानिवृत्तीस पात्र ठरत असेल तर त्याला नियमित सेवानिवृत्तीचे वा स्वेच्छासेवानिवृत्तीचे लाभ देय करण्यास हरकत नाही. |
| ९ | नियम १११ (५) व ११६ (१६)(बी) | कायदेशीर पत्नी हयात असताना दुसरा विवाह केल्यास त्या पत्नीस कुटूंब निवृत्तीवेतन अनुज्ञेय ठरेल किंवा कसे? | १) म.ना.से.(नि.वे) नियम १९८२ मधील नियम ११६ (१६)(बी) नुसार कायदेशीर पत्नीच कुटुंबनिवृत्तीवेतनासाठी पात्र ठरते. या व्याख्येत नमूद ‘ पती/पत्नी’ म्हणजे “ कायदेशीर पती /पत्नी ” असा अर्थ अभिप्रेत आहे.<br><br>२) उपदान आणि कुटुंब निवृत्तीवेतनाचा लाभ हा संबंधित शासकीय कर्मचा-याच्या पश्चात हयात असणा-या कायदेशीर कुटुंबियांना मिळावा हे नियमांमध्ये अभिप्रेत आहे.दुसरा विवाह बेकायदेशीर असल्यास व्दितीय पत्नीस कायदेशीर पत्नीचा विधीवत दर्जा ( Legal status ) प्राप्त होत नाही. त्यामुळे अशा व्दितीय पत्नीस कुटुंब निवृत्तीवेतन अनुज्ञेय ठरणार नाही. |
| १० | नियम ११६ (६)(ए)(एक) | नियम ११६ (६)(ए)(एक) कोणासाठी लागू ठरतो ? | नियम ११६(६)(ए)(एक) नुसार एकापेक्षा अधिक विधवांना कु.नि.वेतन समाप्रमाणात देय ठरविले असले, तरी अशा विधवांचा दर्जा कायदेशीर असणे नियमास अभिप्रेत आहे. म्हणजेच कायद्याने संमत केलेल्या विवाहानंतर झालेल्या विधवांना सदर नियम लागू ठरतो. सदर नियमानुसार सरसकटपणे एकापेक्षा अधिक विधवांना समप्रमाणात कु.नि.वे.देय नाही. |
| ११ | नियम १११ (५) व ११६ (१६) (बी ) | सेवेत असताना दिलेल्य कौटुंविक माहितीवरच कुटुंब निवृत्तीवेतन अवलंबून असणे | १) सेवेत असताना कर्मचा-यांने त्याच्या कायदेशीर कुटुंबाबद्दल दिलेल्या सेवा तपशीलातील लेखी माहितीनुसारच कुटुंब निवृत्तीवेतन विषयक लाभ देणे नियमानुसार अपेक्षित आहे.<br><br>२) शासकीय कर्मचा-याने शासन सेवेत असताना केलेला बेकायदेशीर विवाह ही गैरवर्तणूक ठरते. नियम २६ नुसार अशा गैरवर्तणुकीच्या परिणामस्वरुप संबंधित कर्मचा-याने निवृत्तीवेतन रोखता येते. सबब सेवेत असताना केलेल्या अशा बेकायदेशीर विवाहकरिता कर्मचा-याच्या मृत्यूनंतर त्याच्या व्दितीय पत्नीस कुटुंब निवृत्तीवेतन विषयक लाभ देय ठरणार नाही. |
| १२ | नियम १११ (५)व ११६ (१६)(बी) | कायदेशीर पत्नी हयात असताना दुसरा विवाह केल्यास दुस-या विवाहाच्या परिणामी जन्मलेल्या संततीस कुटुंबनिवृत्तीवेतन अनुज्ञेय ठरेल किंवा कसे ? | १) या दोन्ही नियमांतील कुटुंबाच्या व्याख्येत नमूद “ मुलगे/मुली ” म्हणजे “ कायदेशीर विवाहाच्या परिणिती जन्मलेले मुलगे/मुली ” असा अर्थ अभिप्रेत आहे.<br>२) उपदान आणि कुटुंब निवृत्तीवेतनचा लाभ हा संबंधित शासकीय कर्मचा-याच्या पश्चात हयात असणा-या कायदेशीर कुटुंबियांनाच मिळावा हे नियमांमध्ये अभिप्रेत आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | ३) शासकीय कर्मचा-याने शासन सेवेत असताना केलेला बेकायदेशीर विवाह ही गैरवर्तणूक ठरते. नियम २६ नुसार अशा गैरवर्तणुकीच्या परिणामस्वरुप संबंधित कर्मचा-याचे निवृत्तीवेतन रोखता येते. सबब सेवेत असताना केलेल्या बेकायदेशीर विवाहाच्या परिणामस्वरुप जन्मलेली संततीही कायदेशीर ठरत नाही व त्यामुळे अशा संततीस कुटुंब निवृत्तीवेतन विषयक लाभ देय ठरणार नाहीत. |
| १३ | नियम ११६ (२)(सी) | ज्या कर्मचा-यास शिक्षा म्हणून निवृत्तीवेतन अनुज्ञेय ठरत नसेल अशा कर्मचा-यांच्या कुटुंबियांना कुटुंबनिवृत्तीवेतन देय ठरते किंवा कसे ? | शासकीय कर्मचा-यास निवृत्तीवेतन देय असेल तरच त्याच्या कुटुंबियांन कुटुंब निवृत्तीवेतन देय आहे. तथापि ज्या प्रकरणी कर्मचा-यास कोणत्याही कारणामुळे निवृत्तीवेतन मंजूर करण्यात आलेले नसेल अशा प्रकरणी त्याच्या कुटुंबास कुटंबनिवृत्तीवेतन मंजूर करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. |
| १४ | नियम ११६ | कुटुंब निवृत्तीवेतनासाठी नामनिर्देशन करण्याची गरज आहे किंवा कसे ? | सदर नियमातील तरतुदीनुसार कुटुंब निवृत्तीवेतन नियमातील नमूद कुटुंबाच्या व्याख्येनुसार देणे अपेक्षित आहे. सबब याकरिता नामनिर्देशन करणे / नामनिर्देशनाची मागणी करणे अपेक्षीत नाही. |
| १५ | नियम १११ | सेवानिवृत्ती उपदान / मृत्यू उपदान वारसा प्रमाणपत्रानुसार देय ठरते किंवा कसे ? | सदर नियमातील तरतुदीनुसार सेवानिवृत्ती उपदान / मृत्यू उपदान वारसा प्रमाणापत्रानुसार देय नसून नियम ११२ मधील तरतुदीनुसारच देणे अपेक्षित आहे. उपदानासाठी नियम ११५ नुसार नामनिर्देशन करणे अपेक्षित आहे. |
| १६ | नियम १३० | विभागीय किंवा न्यायिक कार्यवाही प्रलंबित असेल तर तात्पुरत्या उपदानाचे प्रदान करता येते किंवा कसे ? | सदर नियमानुसार केवळ तात्पुरते निवृत्तीवेतन देणेअपेक्षित आहे. तात्पुरते उपदान देणे अपेक्षित नाही. |

**२. सदर परिपत्रकाव्दारे करण्यात आलेले स्पष्टीकरण विचारात घेऊन विभागांनी कार्यवाही करणे अपेक्षित आहे. या मुद्दयांबाबत वित्त विभागाकडे संदर्भ करण्यांत येऊ नये.**

**३. सदर परिपत्रक शासनाच्या www.maharashtra.gov.in या बेब साईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २००८११०५१२१९१३००१ असा आहे.**

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

**नि.बा.वाडेकर,**
**शासनाचे उप सचिव.**

******

विवाम.

## सेवानिवृत्त शासकीय कर्मचा-यांनी मागणी केल्यास त्यांना वेतन भत्त्याच्या तसेच निवृत्तीवेतनाचा तपशिल देण्याबाबत.

वित्त विभाग,
परिपत्रक क्रमांक संकीर्ण -१००८/प्र.क्र.३९/कोषा प्र-५, दिनांक २५ नोव्हेंबर, २००८.

वाचा: उपलोक आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र.उलोआ/कॉम/१८८७/२००७(टे-१७) दि.१४.४.२००८.

**परिपत्रक:**

सेवानिवृत्त कर्मचा-यांना वेतन आयोगानुसार मंजूर करण्यात आलेली सुधारित वेतनश्रेणी, कालबध्द पदोन्नतीनुसार मंजूर करण्यात आलेली वेतनश्रेणी अथवा इतर कारणांमुळे केलेल्या वेतन निश्चितीमुळे देय असलेली वेतन फरकाची/सेवानिवृत्ती वेतन फरकाची रक्कम अथवा निलंबन कालावधीतील वेतन व भत्त्याची रक्कम अदा करताना त्यांना देय असलेल्या वेतन/निवृत्तीवेतन फरकाच्या रकमेचे विवरणपत्र तयार करुन कोषागार/अधिदान व लेखा कार्यालयात सादर करण्यात येते.

२. सेवानिवृत्त कर्मचा-यांना अदा करण्यात आलेल्या वेतन फरक/सेवानिवृत्ती वेतन फरक/ निलंबन कालावधीतील वेतन व भत्ते इत्यादी रकमांचे विवरणपत्र कार्यालयात उपलब्ध असूनही ते त्यांना उपलब्ध करुन दिले जात नाही अशी तक्रार सेवानिवृत्त कर्मचारी त्यांच्या संबंधित कार्यालयाकडे/शासनाकडे अथवा लोक आयुक्त/उप लोकआयुक्त यांच्याकडे करतात. काही कर्मचारी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ नुसार संबंधित माहिती अधिका-यांकडे अर्ज करतात .यामुळे प्रशासकीय यंत्रणेवर कामाचा बोजा वाढतो.

३. सेवानिवृत्त कर्मचा-याने त्याला त्याच्या वेतन भत्त्याच्या तसेच निवृत्तीवेतनाचा तपशिल /शासनाकडून मिळाला नाही अशी लोक आयुक्त/उपलोक आयुक्त यांच्याकडे तक्रार केली असेल आणि त्या तक्रारीनुषंगाने लोक आयुक्त/ उपलोक आयुक्त यांच्या कार्यालयाने अहवाल मागविला तर अशा प्रकरणी संबंधितांकडून सेवानिवृत्त कर्मचा-यांना आवश्यक तपशिल तात्काळ उपलब्ध करुन दिला जातो. तरीसुध्दा अशा स्वरुपांच्या तक्रारीमध्ये उत्तरोत्तर वाढ होत असल्याचे मा. उपलोक आयुक्त यांच्या निदर्शनास आलेले आहे. म्हणून महाराष्ट्र लोक आयुक्त आणि उपलोक आयुक्त अधिनियम १९७१ चे कलम १२(१) मधील तरतूदीनुसार

उपलोक आयुक्त यांनी शासनास शिफारशी केलेल्या आहेत. त्यानुसार कार्यवाही करण्याबाबत संबंधितांना खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१) सेवानिवृत्त कर्मचा-याला त्याच्या सेवा कालावधीतील वेतन व भत्त्याच्या फरकाची रक्कम आहरण व संवितरण अधिका-याकडून प्रदान करण्यात येते. त्यावेळी संबंधित सेवानिवृत्त कर्मचा-याने त्याच्या वेतन व भत्त्याच्या फरकाच्या तपशिलाचे विवरणपत्र मागितले तर आहरण व संवितरण अधिका-याने त्यास त्याच्या वेतन व भत्त्याच्या फरकाच्या तपशिलाचे विवरणपत्र सोबत जोडलेल्या प्रपत्र अ मध्ये द्यावे.

२) निवृत्तीवेतनधारकाला त्याच्या निवृत्तीवेतनातील फरकाची रक्कम अधिदान व लेखाधिकारी/ कोषागार अधिकारी यांच्याकडून प्रदान करण्यात येते. त्यावेळी संबंधित निवृत्तीवेतनधारकाने त्याच्या निवृत्तीवेतनातील फरकाच्या तपशिलाचे विवरणपत्र मागितले तर अधिदान व लेखाअधिकारी/कोषागार अधिकारी यांनी त्यास त्याच्या निवृत्तीवेतनातील फरकाच्या तपशिलाचे विवरणपत्र प्रपत्र -ब द्यावे.

४. सर्व विभाग/ कार्यालय प्रमुख तसेच सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांनी वरील सूचनांचे काटेकोर पालन करावे. तसेच निवृत्तीवेतनधारकांची वरील मुद्यासंदर्भात तक्रार येणार नाही याबाबत दक्षता घेण्यात यावी.

५. सदर परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २००८११२५१६२०५१००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या नावाने व आदेशानुसार,

स.अ.मु.नक्वी,
उप सचिव.

******

राज्य वेतन सुधारण समिती,२००८
शिफारशी स्विकृत करण्याबाबत.

वित्त विभाग,
शासन निर्णय क्रमांक: वेपुर-१२०९/प्र.क्र.२०/सेवा-९ दिनांक २७ फेब्रुवारी, २००९.

प्रस्तावना :

केंद्र शासनाने सहाव्या केंद्रीय वेतन आयोग्याच्या शिफारशींच्या आधारे केंद्रीय कर्मचा-यांच्या वेतनश्रेणी दिनांक १ जानेवारी,२००६ पासून सुधारणा करण्याचा निर्णय घेतला आहे. केद्र शासनाच्या निर्णयाच्या आधारे राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचा-यांच्या वेतनश्रेणीत सुधारणा करण्याच्या दृष्टीने शिफारशी करण्यासाठी शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक वेपुर १२०८/ प्र.क्र.७२/सेवा-९ दिनांक २३ सप्टेंबर,२००८ अन्वये श्री. पी.एम.ए.हकीम सेवानिवृत्त सचिव, केंद्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली राज्य वेतन सुधारणा समिती,२००८ ची स्थापना करण्यात आली होती. अतिरिक्त मुख्य सचिव( सेवा), सामान्य प्रशासन विभाग व सचिव(व्यय), वित्त विभाग हे या समितीचे सदस्य होते. समितीने आपला अहवाल दिनांक २० डिसेंबर,२००८ रोजी शासनास सादर केला आहे. सदर अहवालातील शिफारशी स्विकृत करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

निर्णय:

शासनाने समितीच्या शिफारशी काही सुधारणांसह स्विकारण्याचा निर्णय घेतला आहे. समितीच्या शिफारशी व त्यावर शासनाने घेतलेले निर्णय याबाबतचा तपशिल सोबतच्या प्रपत्रात नमूद करण्यात आला आहे. प्रस्तुत शिफारशी स्विकृत करण्याच्या परिणामस्वरुप ज्या प्रकरणी सविस्तर आदेश निर्गमित करण्याची आवश्यकता आहे त्याबाबत स्वतंत्रपणे कार्यवाही करण्यात येईल.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या **www.maharashtra.gov.in** या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २००९०२२४१३४२२३००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने ,

विद्याधर कानडे,
शासनाचे सचिव( वित्त ).

ववववववव

विवाम.

*(शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक वेपुर १२०९/प्र.क्र.२०/सेवा-९, दि.२७ फेब्रुवारी,२००९ चे प्रपत्र)*

## प्रपत्र

राज्य वेतन सुधारणा समिती,२००८ च्या अहवालातील शिफारशी व त्यावर शासनाने घेतलेले निर्णय.

**राज्य वेतन सुधारणा समिती, २००८ च्या अहवालातील शिफारशी.**

| अ. क्र. | परिच्छेद क्रमांक | शिफारशी | शासनाने घेतलेला निर्णय |
|---|---|---|---|
| | | **अ) सेवेतील कर्मचा-यांच्या बाबतीत शिफारशी** | |
| १ | ३.१.४ | सहाव्या केंद्रीय वेतन आयोगाने शिफारस केलेली वेतन बँड व ग्रेड वेतनावर आधारित सुधारित वेतन संरचनेची संकल्पना राज्य शासकीय कर्मचा-यांसाठी लागू करण्यात यावी. | स्विकृत |
| २ | ३.२.१ | राज्य वेतन सुधारणा समिती, २००८ च्या शिफारशींनुसार दि.१.१.१९९६ पासून लागू करण्यात आलेल्या २३ वेतनश्रेणींसाठी तक्ता क्र.३.१ प्रमाणे सुधारित वेतन संरचनेत पाच वेतन बँड (१ एस, पीबी -१, पीबी-२, पीबी-३, पीबी-४) व समुचित ग्रेड वेतन लागू करण्यात यावे. | स्विकृत |
| ३ | ३.२.२ | सहाव्या केंद्रीय वेतन आयोगाने रुपये ५०००-८०००, ५५००-९००० व ६५०० - १०५०० या तीन विद्यमान वेतनश्रेणी एकत्र करुन त्यासाठी सुधारित वेतन संरचनेत एकच वेतन बँड (पीबी-२) व रुपये ४२०० हे ग्रेड वेतन मंजूर केले आहे. वरील तीन विद्यमान वेतनश्रेणींसाठी मंजूर रुपये ४२०० या एकच ग्रेड वेतनाऐवजी अनुक्रमे रुपये ४२००, ४३०० व ४४०० हे तीन वेतन ग्रेड मंजूर करण्यात यावे. | स्विकृत |
| ४ | ३.२.३ | विद्यमान वेतनश्रेणींसाठी अनुज्ञेय सुधारित वेतन संरचनेतील वेतन बँड व ग्रेड वेतन काही विशिष्ट संवर्ग पदासंदर्भात केलेल्या शिफारशींच्या अधीन राहतील. | स्विकृत |
| ५ | ३.३.३ | सहाव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार गट-ड मधील कर्मचा-यांच्या गट-क मधील श्रेणीवर्धनासाठी त्यांना कुशल कारागीरांचे प्रशिक्षण देणारा कार्यक्रम अशा कर्मचा-यांनी धारण केलेली शैक्षणिक अर्हता व त्यांची कार्यकुशलता यांचे स्तर विचारात घेवून आखण्यात यावा. दरम्यानच्या कालावधीत विहित शैक्षणिक अर्हताधारक गट-ड मधील कर्मचा-यांना शक्य तितक्या लवकर गट-क मधील कनिष्ठ पदावर (किंवा इतर समतुल्य पदावर) सामावून घेण्यात यावे. असे करताना आवश्यकतेनुसार | यापुढे गट-ड मध्ये (गट-क मधील पदावर नियुक्तीसाठी योग्य नसलेल्या उमेदवारांच्या अनुकंपा तत्वावरील नियुक्ती खेरीज) कर्मचा-यांची नवीन नियुक्ती करण्यात येऊ नये ही शिफारस अमान्य |

| | | | |
|---|---|---|---|
| | | एका विभागातून दुस-या विभागात नियुक्तीचाही विचार करण्यात यावा. गट-ड मधील कर्मचा-यांना कनिष्ठ लिपिक किंवा समतुल्य पदावर अथवा योग्य प्रशिक्षणानंतर कुशल कारागीर सहायक या पदावर समावेशापर्यन्त गट-ड मध्ये व - १ एस या वेतन बँडमध्येच ठेवण्यात यावे. व विहित शैक्षणिक अर्हता धारण केल्यानंतर अथवा योग्य प्रशिक्षणानंतर त्यांना कनिष्ठ लिपिक किंवा कुशल कारागीर सहाय्यक या गट-क मधील पदावर सामावून घेण्यात यावे. यापुढे गट-ड मध्ये ( गट-क मधील पदावर नियुक्तीसाठी योग्य नसलेल्या उमेदवारांच्या अनुकंपा तत्वावरील नियुक्तीखेरीज ) कर्मचा-यांची नवीन नियुक्ती करण्यात येऊ नये. | करण्यात आली. या परिच्छेदातील इतर शिफारशींबाबत सामान्य प्रशासन विभागामार्फत स्वतंत्रपणे कार्यवाही करण्यात येईल. |
| ६ | ३.५.१ | सुधारित वेतन संरचेनेत रुपये १0000 - १५२00 व रुपये १0६५0-१५८५0 या विद्यमान वेतनश्रेणींसाठी पीवी-३ वेतन बँड व रुपये ६६00 हे एकच ग्रेड वेतन मंजूर करण्यात आले आहे. तथापि, काही प्रकरणी रुपये १0६५0 - १५८५0 या विद्यमान वेतनश्रेणीतील पदे रुपये १0६५0 - १५८५0 या विद्यमान वेतनश्रेणीतील पदे १0000 - १५२00 या वेतनश्रेणींतील पदांची पदोन्नतीची पदे आहेत; त्यामुळे अशा दोन पदांच्या वेतन संरचनेत फरक ठेवण्यासाठी रुपये १0६५0 - १५८५0 या वेतनश्रेणीतील पदास रु.६९00 हे ग्रेड वेतन मंजूर करण्यात यावे. | स्विकृत |
| ७ | ३.६.१ | रुपये ८000 - १३५00 या विद्यमान वेतनश्रेणीतील गट- अ(पूर्वी चे वर्ग—२) मधील पदाधारकांना पीवी-२ वेतन बँड व रुपये ५४00 ग्रेड वेतन तसेच रुपये ८000 - १३५00 या विद्यमान वेतनश्रेणीतील गट-अ (पूर्वीचे वर्ग -१) मधील पदधारकांना पीवी-३ व वेतन बँड व रुपये ५४00 ग्रेड वेतन मंजूर करण्यात यावे. | स्विकृत |
| ८ | ३.६.२ | तहसिलदार, पोलीस निरीक्षक व विवक्षितपणे उचित आदेशाव्दारे पूर्वी वर्ग -१ म्हणून घोषित केलेल्या सध्याच्या गट-अ मधील रुपये ७४५0-११५00 किंवा रुपये ७५00-१२000 या विद्यमान वेतनश्रेणीतील अधिका-यांना पीवी-२ वेतन बँड व रुपये ५000 ग्रेड वेतन मंजूर करण्यात यावे. | तहसिलदार यांना पीवी-२ ऐवजी पीवी-३ या वेतन बँडमध्ये अंतर्भूत करण्यात यावे या सुधारणेसह स्विकृत |
| ९ | ३.७.१ व ३.७.२ | पदोन्नतीच्या पदास व निम्न पदास एकच विद्यमान वेतनश्रेणी मंजूर करण्यात आलेल्या प्रकरणी तक्ता क्र.३.२ मध्ये दर्शविल्याप्रमाणे सुधारित वेतन संरचनेत वेतन बँड व ग्रेड वेतन मंजूर करण्यात यावे. तक्ता क्र.३.२ मध्ये नमूद पदांशिवाय एकाच विद्यमान वेतनश्रेणीत पदोन्नतीचे व निम्न पद असल्यास सुधारित वेतनसंरचनेत दोन्ही पदास तक्ता क्र ३.१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे वेतन बँड अनुज्ञेय राहील.मात्र, खाली नमूद केल्याप्रमाणे | स्विकृत |

<table>
<tr>
<td></td>
<td></td>
<td>पदोन्नतीच्या पदाच्या ग्रेड वेतनात वाढ मंजूर करण्यात यावी .<br>
<table>
<tr><td>(अ)</td><td>विद्यमान वेतनश्रेणीतील रुपये ५००० पेक्षा कमी किमान वेतनापर्यन्त</td><td>रुपये १००</td><td></td></tr>
<tr><td>(ब)</td><td>विद्यमान वेतनश्रेणीतील रुपये ५००० व त्यापेक्षा जास्त व रुपये ८००० पेक्षा कमी किमान वेतनापर्यन्त</td><td>रुपये २००</td><td></td></tr>
<tr><td>(क)</td><td>विद्यमान वेतनश्रेणीतील रुपये ८००० व त्यापेक्षा जास्त व रुपये १२००० किमान वेतनापर्यन्त</td><td>रुपये ३००</td><td></td></tr>
<tr><td>(ड)</td><td>विद्यमान वेतनश्रेणीतील रुपये १२००० पेक्षा जास्त किमान वेतनापर्यन्त</td><td>रुपये १००</td><td></td></tr>
</table>
</td>
<td></td>
</tr>
<tr>
<td>१०</td>
<td>३.८.१</td>
<td>अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, प्रकल्प संचालक( ग्राम विकास)तसेच विभागीय आयुक्त कार्यालयातील उपायुक्त(प्रशासन व विकास) या पदधारकांना पीबी-३ वेतन बँड व रुपये ७६०० ग्रेड वेतन मंजूर करण्यात यावे .</td>
<td>स्विकृत</td>
</tr>
<tr>
<td>११</td>
<td>३.९.३<br>व<br>३.९.४</td>
<td>विद्यमान रकस्तर वेतनश्रेणीतील शिक्षकांना सुधारित वेतनसंरचनेत परिच्छेद क्रमांक ३.९.३ मध्ये दर्शविल्याप्रमाणे वेतन बँड व ग्रेड वेतन तसेच, विशिष्ट वर्षाच्या सेवेनंतर अनुज्ञेय वेगवेगळया विद्यमान वेतनश्रेणींतील शिक्षकांना परिच्छेद क्रमांक ३.९.४ मधील तक्ता क्र.३.३ मध्ये दर्शविल्याप्रमाणे वेतन बँड व ग्रेड वेतन मंजूर करण्यात यावे .</td>
<td>स्विकृत</td>
</tr>
<tr>
<td>१२</td>
<td>३.१०.१</td>
<td>शिक्षण संचालनालयातील महाराष्ट्र शिक्षण सेवा (प्रशासन शाखा) गट क मधील १४ संवर्ग पदांना वेतन बँड पीबी-२+ ग्रेड वेतन रुपये ४४०० आणि गट ब मधील २८ पदांना वेतन बँड पीबी-२ + ग्रेड वेतन रुपये ४८०० मंजूर करण्यात यावे .</td>
<td>शासन निर्णय , शालेय शिक्षण विभाग आणि क्रीडा विभाग, क्रमांक शिसंमा १०००/(१०३/ २०००) /प्रशा-५ दिनांक ५.११ २००८ मध्ये नमूद महाराष्ट्र शिक्षण सेवा गट -क मधील १४ आणि गट ब मधील २२ पदांच्या बाबत ही शिफारस स्विकारण्यात आली आहे .</td>
</tr>
<tr>
<td>१३</td>
<td>३.११.१</td>
<td>परिवहन विभागातील अधिकारी/कर्मचा-यांसाठी परिच्छेद क्रमांक ३.११.१ मधील तक्ता क्रमांक ३.४ प्रमाणे सुधारित वेतन संरचना मंजूर करण्यात यावी .</td>
<td>स्विकृत</td>
</tr>
</table>

| | | | |
|---|---|---|---|
| १४ | ३.१२.१ | आरोग्य संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय आणि राज्य कामगार विमा योजना येथील शुश्रुषा सेवा कर्मचा-यांसाठी सुधारित वेतन संरचना परिच्छेद क्रमांक ३.१२.१ मधील तक्ता क्रमांक ३.५ प्रमाणे राहील. | **अस्विकृत.** शुश्रुषा सेवेतील कर्मचा-यांना तक्ता क्र.३.१ प्रमाणे अनुज्ञेय वेतन बँड व ग्रेड वेतन मंजूर करण्यात यावे. |
| १५ | ३.१३ | जिल्हा परिषदांतील जिल्हा तांत्रिक सेवा( वैद्यकीय) वर्ग ३ या संवर्गातील विविध पदनामाने कार्यरत व रुपये ८000-१३५00 या विद्यमान वेतनश्रेणीतील वैद्यकीय अधिकारी वर्ग ३ यांची सुधारित वेतन संरचनेत वेतननिश्चिती करण्यापूर्वी प्रथम रु.६५00-१0५00 या विद्यमान वेतनश्रेणीत वेतननिश्चिती करण्यात यावी. त्यानंतर सुधारित वेतन संरचनेत त्यांना पीबी २ वेतन बँड व रु.४४00 ग्रेड वेतन मंजूर करण्यात यावे. वैद्यकीय अधिकारी गट-अ (पूर्वीचे वर्ग २) यांना पीबी २ वेतन बँड व रुपये ५४00 ग्रेड वेतन तसेच गट-ब ( पूर्वीचे वर्ग ३) मधील वैद्यकीय अधिका-यांना पीबी २ वेतन बँड व रु.४४00 ग्रेड वेतन मंजूर करण्यात यावे. | स्विकृत. मात्र जिल्हा परिषदांतील जिल्हा तांत्रिक सेवा ( वैद्यकीय) वर्ग ३ या संवर्गातील पदधारकांची विद्यमान रुपये ६५00-१0५00 या वेतनश्रेणीत वेतननिश्चिती करण्याच्या समितीच्या शिफारशीच्या स्विकृतीमुळे झालेल्या अतिप्रदानाची वसुली करण्यात येऊ नये. |
| १६ | ३.१४.१ | महसूल विभागामधील मंडळ अधिका-यांना पीबी-१ वेतन व रुपये ३५00 ग्रेड वेतन मंजूर करण्यात यावे. | स्विकृत. |
| १७ | ३.१५.१ | भू-विज्ञान व खनिकर्म संचालनालयातील अधिका-यांसाठी परिच्छेद क्र.३.१५.१ प्रमाणे सुधारित वेतन संरचना मंजूर करण्यात यावी. | स्विकृत |
| १८ | ३.१६.१ | एकात्मिक बालविकास प्रकल्पातील मुख्य सेविका/ पर्यवेक्षिका यांना पीबी १ वेतन बँड व रुपये ३000 ग्रेड वेतन मंजूर करण्यात यावे. | पीबी १ वेतन बँड व रुपये २८00 ग्रेड वेतन मंजूर करण्यात यावे. |
| १९ | ३.१७.१ | दिनांक १.१.१९९६ नंतर पुन:सुधारित करण्यात आलेल्या वेतनश्रेणींच्या बाबतीत सुधारित वेतन संरचनेत मंजूर करावयाच्या वेतन बँड व ग्रेड वेतनाबाबत स्वतंत्रपणे विवेचन करण्यात आले नसल्यास या पदधारकांना अहवालातील तक्ता क्रमांक ३.१. मध्ये नमूद केल्याप्रमाणे वेतन बँड व ग्रेड वेतन मंजूर करण्यात यावे. | स्विकृत. |
| २0 | ३.१८.१ | एकत्रित वेतनावर कार्यरत सैनिकी शाळेतील संगणक निदेशक व शिक्षण निदेशकांना तीन वर्षाच्या सेवेनंतर अनुक्रमे पीबी २ वेतन बँड + रु.४३00 ग्रेड वेतन व पीबी १ वेतन बँड + रु.२४00 ग्रेड वेतन मंजूर करण्यात यावे. | स्विकृत |

| | | | |
|---|---|---|---|
| २१ | ३.१९ | मुख्य वास्तुशास्त्रज्ञ कार्यालयातील कनिष्ठ वास्तुशास्त्रज्ञ व वास्तुशास्त्रीय आरेखक यांना परिच्छेद क्रमांक ३.१९.१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सुधारित वेतन संरचना मंजूर करण्यात यावी. | स्विकृत |
| २२ | ३.२०.१ | काही संवर्ग पदांच्या वेतन संरचनेबाबत विशेष शिफारशी तक्ता क्र.३.६ मध्ये नमूद केल्याप्रमाणे राहील. | स्विकृत |
| २३ | ३.२१ | सुधारित वेतन संरचनेत प्रारंभिक वेतन निश्चिती दिनांक १.१.२००६ रोजीच्या विद्यमान वेतनश्रेणीतील वेतनास १.८६ ने गुणून येणा-या वेतनाच्या पुढील १० च्या पटीतील वेतन टप्प्यावर करण्यात यावी. या रकमेत अनुज्ञेय ग्रेड वेतन मिळाल्यावर येणारी रक्कम सुधारित वेतन संरचनेतील मूळ वेतन होईल. विद्यमान वेतनश्रेणीत वेगवेगळया वेतन टप्प्यांवर वेतन घेणा-या कर्मचा-यांचे वेतन सुधारित वेतन संरचनेत अनुज्ञेय वेतन बँडमध्ये एकवटल्याच्या प्रकरणी विद्यमान वेतनश्रेणीतील दोन टप्प्यांसाठी एक वेतनवाढ ( वेतनाच्या ३ टक्के ग्रेड वेतनाशिवाय) देय होईल. विद्यमान वेतनश्रेणींच्याबाबतीत ज्या वेतन टप्प्यांना १.८६ ने गुणून व पुढील १० च्या पटीतील रक्कम विचारात घेऊन करण्यात येणारी वेतननिश्चिती लागू होत नाही त्या वेतन टप्प्यांसाठी तक्ता क्र.३.७ मध्ये दिल्याप्रमाणे सुधारित वेतन बँडमध्ये वेतन अनुज्ञेय होईल. | स्विकृत |
| २४ | ३.२२.१ | दिनांक १.१.२००६ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त झालेल्या कर्मचा-यांची वेतननिश्चिती तक्ता क्रमांक ३.८ मध्ये दिल्याप्रमाणे करण्यात यावी. | स्विकृत |
| २५ | ३.२३.१ | कर्मचा-यांना देय असलेली वार्षिक वेतनवाढ मूळ वेतनाच्या ३ टक्के प्रमाणे ( येणारी रक्कम आवश्यकतेनुसार १० च्या पटीत विचारात घेऊन) परिगणित करुन दरवर्षी १ जुलै रोजी देण्यात याावी. सदर वेतनवाढीची रक्कम वेतन बँडमधील विद्यमान मुळ वेतनात मिळविण्यात यावी. | स्विकृत |
| २६ | ३.२३.२ | सुधारित वेतन संरचनेत दिनांक १ जुलै रोजी ज्या कर्मचा-यांची ६ महिने किंवा त्यापेक्षा जास्त सेवा पूर्ण होईल त्यांना दिनांक १ जुलै २००६ रोजी वेतनवाढ देय राहील. ज्या कर्मचा-यांना दिनांक २.१.२००५ ते दिनांक १.१.२००६ या कालावधीत विद्यमान वेतनश्रेणीत वेतनवाढ मिळाली आहे अशा सर्व कर्मचा-यांना दिनांक १ जुलै २००६ रोजी पुढील वेतनवाढ देय राहील. ज्या कर्मचा-यांना विद्यमान वेतनश्रेणीत दिनांक १.१.०५ रोजी वेतनवाढ मिळाली आहे ( आणि परिणामी ज्यांना दिनांक १.१.२००६ रोजी पुढील वेतनवाढ देय आहे) अशा कर्मचा-यांना सुधारित वेतन संरचनेत वेतननिश्चिती करण्यापूर्वी दिनांक | स्विकृत |

| | | | |
|---|---|---|---|
| | | १.१.२००६ रोजी विद्यमान वेतनश्रेणीत वेतनवाढ देय होईल आणि त्यांना दिनांक १ जुलै २००६ रोजी सुधारित वेतन संरचनेत पुढील वेतनवाढ देय होईल. सन २००७ पासून पुढे सर्व कर्मचाऱ्यांना त्या-त्या वर्षी दिनांक १ जुलै रोजी वार्षिक वेतनवाढ देय राहील. | |
| २७ | ३.२४ | पीबी ४ व्यतिरिक्त इतर वेतन बँड मधील ५ टक्के अधिकारी/कर्मचाऱ्यांना अत्युकृष्ट कामासाठी ३ टक्के या साधारण दराने देण्यात येणाऱ्या वेतनवाढीऐवजी ४ टक्के दराने वेतनवाढ मंजूर करावी. अशी वेतनवाढ संबंधित कर्मचाऱ्याला ५ वर्षातून एकदा मंजूर करण्यात यावी. यापुढे वरीलप्रमाणे उच्च दराने वेतनवाढ मंजूर करण्यात येणार असल्यामुळे सध्याची एक किंवा दोन आगाऊ वेतनवाढी मंजूर करण्याची पध्दती बंद करण्यात यावी. | सामान्य प्रशासन विभागामार्फत स्वतंत्रपणे कार्यवाही करण्यात येईल. |
| २८ | ३.६.३ व ३.२५.१ | काही पदांना सेवाप्रवेशाच्यावेळी देण्यात येणारे उच्च प्रारंभिक वेतन तसेच शैक्षणिक अर्हतेच्या आधारावर मंजूर करण्यात येणाऱ्या वेतनवाढी यापुढे अनुज्ञेय असणार नाहीत. | स्विकृत |
| २९ | ३.२५.२ | पोलीस शिपाई, पोलीस नाईक व पोलीस हवालदार यांना मिळणारे विशेष वेतन वगळून अन्य सर्व पदास मिळणारे विशेष वेतन बंद करण्यात यावे. | स्विकृत |
| ३० | ३.२६.१ | एखाद्या कर्मचाऱ्याची एकाच वेतन बँड मधील एका पदावरुन दुसऱ्या पदावर पदोन्नती झाल्यास पदोन्नतीनंतरचे त्याचे वेतन, वेतन बँडमधील वेतन व ग्रेड वेतनाच्या ३ टक्के वाढ देऊन व येणारी रक्कम पुढील १० च्या पटीत घेऊन निश्चित करण्यात यावे. अशा प्रकारे येणारी रक्कम ( वेतन बँड मधील वेतन व ग्रेड वेतनावर ३ टक्के वाढ मिळवून येणारी रक्कम) त्या कर्मचाऱ्याचे पदोन्नतीनंतरचे वेतन होईल. या वेतनावर पदोन्नतीच्या पदास लागू ग्रेड वेतनसुध्दा अनुज्ञेय राहील.पदोन्नतीनंतर वेतन बँड बदलत असल्यावरही वरील प्रमाणे ३ टक्के वाढ देऊन पदोन्नतीच्या पदाचे वेतन निश्चित करण्यात यावे. ही रक्कम जर पदोन्नतीच्या पदाच्या वेतन बँड मधील किमान व कमाल वेतनाच्या मध्ये असल्यास ती रक्कम संबंधित कर्मचाऱ्याचे पदोन्नतीनंतरचे वेतन होईल. तथापि, ही रक्कम पदोन्नतीच्या पदाच्या वेतन बँड मधील किमान वेतनापेक्षा कमी असल्यास वेतन बँड मधील किमान वेतन हे संबंधित कर्मचाऱ्याचे पदोन्नतीनंतरचे वेतन होईल. | स्विकृत |
| ३१ | ३.२८.१ | केंद्र शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे दिनांक १.१.२००६ पासून वेळोवेळी लागू करण्यात आलेला /येणारा महागाई भत्त्याचा दर राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना लागू करण्यात यावा. | सध्यस्थिती केंद्र शासनाने मंजूर केलेल्या दरांनुसार स्विकृत. |
| ३२ | ३.२९.१ | अंशकालीन कर्मचाऱ्यांचे सध्याचे नियत /एकत्रित दरमहा वेतन दुप्पट करण्यात यावे; ही वाढीव रक्कम किमान रुपये ६०० व | स्विकृत. सुधारित वेतनाचा लाभ |

| | | | |
|---|---|---|---|
| | | कमाल रुपये १२०० च्या मर्यादित राहील. रुपये १२०० पेक्षा जास्त नियत/एकत्रित वेतन घेत असलेल्या अंशकालीन कर्मचा-यांच्या वेतनात कोणताही बदल होणार नाही. | दिनांक १.४.२००९ पासून देण्यात यावा. |
| ३३ | ३.३०.१ | समितीच्या कार्यकक्षेतील कार्यालयांतील/संस्थांमधील कर्मचा-यांना समितीच्या शिफारशी लागू करण्यात याव्यात. | स्विकृत |
| | | **ब) निवृत्तीवेतनधारकांबाबतच्या शिफारशी** | |
| ३४ | ४.२.१ | सहाव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार दिनांक १.१.२००६ पूर्वी सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-यांना मूळ निवृत्तीवेतनाच्या ४० टक्के वाढीचा लाभ देण्यात यावा. | स्विकृत |
| ३५ | ४.३.१ | सध्या अस्तित्वात असलेली रुपये ३.५ लक्ष उपदानाची मर्यादा रुपये ५ लक्ष करण्यात यावी. | स्विकृत |
| ३६ | ४.३.२ | निवृत्तीवेतनाच्या अंशराशीकरणासाठी सहाव्या केंद्रीय वेतन आयोगाने प्रस्तावित केलेला सुधारित अंशराशीकरण्याच्या तक्त्याचा वापर राज्यात भावी प्रभावाने करण्यात यावा. | या आदेशाच्या दिनांकापासून स्विकृत |
| ३७ | ४.५.१ | निवृत्तीवेतनार्ह वेतनाच्या ५० टक्के रक्कम निवृत्तीवेतन म्हणून मिळण्यासाठी आवश्यक असलेला ३३ वर्षाचा अर्हताकारी सेवेचा कालावधी २० वर्षे इतका करण्याची सहाव्या केंद्रीय वेतन आयोगाने केलेली शिफारस राज्यातही लागू करण्यात यावी. अशा प्रकारे २० वर्षाची अर्हताकारी सेवा पूर्ण करणा-या कर्मचा-यांना सेवानिवृत्तीच्या शेवटच्या १० महिन्यांत अर्जित केलेल्या सरासरी वेतनाच्या किंवा शेवटच्या महिन्यात घेतलेल्या वेतनाच्या ५० टक्के , यापैकी जी रक्कम कर्मचा-यास लाभदायक ठरेल, ती रक्कम निवृत्तीवेतन म्हणून अनुज्ञेय होईल.तसेच सध्याची २८ वर्षाच्या अर्हताकारी सेवेत ५ वर्षाच्या सेवेची भर घालण्याची तरतूद रद्द करण्यात यावी. ही शिफारस भावी प्रभावाने लागू करण्यात यावी. | या आदेशाच्या दिनांकापासून स्विकृत. |
| ३८ | ४.६.१ | सेवेत असताना मृत्यू पावलेल्या कर्मचा-यांच्या वारसांना ७ वर्षा पर्यन्त उच्च दराने मिळणा-या निवृत्तीवेतनाचा कालावधी १० वर्षापर्यन्त भावी प्रभावाने वाढविण्यात यावा. | या आदेशाच्या दिनांकापासून स्विकृत. |
| ३९ | ३.२०.१ (तक्ता क्र.३.६ | राज्य सैनिक कल्याण मंडळातील सर्व अधिकारी/कर्मचा-यांचे दुर्लक्षित निवृत्तीवेतन दरमहा रु.१०००/- इतके करण्यात यावे. | स्विकृत. |

| | | | |
|---|---|---|---|
| | मधील क्र.३(२) | | |
| ४० | ६.१.१ | सुधारित वेतन संरचना व निवृत्तीवेतनाबाबतच्या शिफारशींची अंमलबजावणी दिनांक १.१.२००६ पासून करण्यात यावी. | भावी प्रभावाने लागू करण्याच्या शिफारशी वगळून स्विकृत. मात्र दिनांक १.१.२००६ पासून सुधारित वेतन संरचनेत वेतन निश्चिती करुन वेतन निश्चितीचा प्रत्यक्ष लाभ दिनांक १.४.२००९ पासून देण्यात यावा. शासन निर्णय, वित्त विभाग क्र.वेपुर १२०८/ प्र. क्र. ७२/सेवा ९ दि.६ ऑक्टोबर २००८ अन्वये मंजूर केलेल्या अग्रिमाची रक्कम दिनांक १.१.२००६ ते ३१.३.२००९ या कालावधीतील अनुज्ञेय थकबाकीच्या रकमेतून सुरवातीच्या वर्षात समायोजित केल्यानंतर उर्वरित थकबाकीची रक्कम समान हप्त्यात पुढील पाच वर्षात भविष्य निर्वाह निधीमध्ये जमा करण्यात यावी. ही रक्कम जमा केलेल्या दिनांकापासून पाच वर्षे काढून घेता येणार नाही.नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू असलेल्या कर्मचा-यांची थकबाकी या योजनेच्या खात्यात जमा करण्यात यावी. .मात्र,थकबाकीच्या रकमेवर शासनाचे कोणतेही अंशदान जमा करण्यात |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | येणार नाही. निवृत्तीवेतनधारकांच्या निवृत्तीवेतनात दिनांक १.१.२००६ पासून सुधारणा करण्यात यावी. मात्र, सुधारित निवृत्ती वेतनाचा प्रत्यक्ष लाभ दिनांक १.४.२००९ पासून अदा करण्यात यावा. त्यापूर्वीच्या थकबाकीच्या रकमेतून शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक १००८/ प्र.क्र.९९ सेवा ४ दिनांक २७ ऑक्टोबर २००८ अन्वये मंजूर केलेल्या अग्रिमाची रक्कम सुरवातीच्या वर्षात समायोजित करण्यात यावी .उर्वरित थकबाकीची पुढील पाच वर्षात समान हप्त्यात रोखीने अदा करण्यात यावी. |

## क) कार्यक्षम आणि प्रतिसादात्मक प्रशासन

| | | | |
|---|---|---|---|
| ४१ | ५.२.१ ते ५.४.१ | कार्यक्षम आणि प्रतिसादात्मक प्रशासनासंदर्भातील समितीच्या अहवालातील प्रकरण क्रमांक ५ मधील शिफारशी. | सामान्य प्रशासन विभागामार्फत स्वतंत्रपणे कार्यवाही करण्यात येईल. |

| ड) सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना | | | |
|---|---|---|---|
| ४२ | ३.२७.५ | सध्याच्या सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेत सुधारणा करण्याच्या दृष्टीने योजनेतील विद्यमान तरतुदी, केंद्र शासनाने मान्य केलेली सुधारित वेतन योजना तसेच संघटनांमार्फत निदर्शनास आणण्यात आलेल्या त्रुटी याचा काळजीपूर्वक विचार करुन खालीलप्रमाणे सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेची समिती शिफारस करीत आहे :-<br>शिफारस क्रमांक १ ते ४- . .<br>शिफारस क्रमांक ५- . . . . .<br>एकाकी पदधारकांसाठी या योजनेखालील तरतूदी प्रस्तावित करताना उदार दृष्टीकोन स्विकारण्यात आला आहे. पदोन्नतीची संधी उपलब्ध असलेल्या कर्मचा-यांना योजनेचा लाभ मिळाल्यानंतरही त्यांना त्यांच्या मूळ पदाचे काम करावे लागते. त्याचप्रमाणेच पदोन्नतीची संधी उपलब्ध नसणा-या कर्मचा-यांना या योजनेचा लाभ मिळाल्यावर त्यांच्या कामात कोणताही फरक होत नाही. तथापि, अशा कर्मचा-यांना पहिल्या व दुस-या लाभानंतर त्यांच्या सध्याच्या पदनामानंतर अनुक्रमे वरिष्ठ व निवडश्रेणी असा शब्दप्रयोग करण्यात यावा. | स्विकृत.<br>सुधारित स्वरुपात स्विकृत पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नसलेल्या कर्मचा-यांना वित्तीय लाभाबरोबरच या शिफारशीमुळे पदनामातही बदल होणार आहे. पदनामातील वरिष्ठ व निवडश्रेणी या उल्लेखामुळे त्यांना उच्च दर्जा प्राप्त झाल्याची भावना निर्माण होईल . त्यामुळे सदर शिफारस स्विकृत करण्यात यावी. त्याचबरोबर पहिला व दुसरा लाभ मिळाल्यानंतर पदनामात अनुक्रमे वरिष्ठ व निवडश्रेणी असा शब्दप्रयोग करण्यात आल्यानंतर अशा पदधारकांना त्यांचा वेतन बँड / ग्रेड वेतन व ज्येष्ठता विचारात घेवून त्यांच्या पदस्थापनेसाठी कार्यालयांतील पदे प्रशासकीय विभागांनी निश्चित करावी, जेणेकरून सेवाजेष्ठ आणि उच्च वेतन घेणा-या कर्मचा-यांना त्यांच्या वेतन बँड /ग्रेड वेतन व दर्जानुसार महत्वाच्या व अधिक जबाबदारीच्या पदांवर |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | पदस्थापना मिळू शकेल, तसेच पदे निश्चित करताना प्रशासकीय सोय देखील विचारात घेण्यात यावी. |
| ४३ | ३.२७.६ ते ३.२७.८ | कालवध्द पदोन्नती योजना/सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मिळालेल्या तसेच दिनांक १ जानेवारी २००६ नंतर सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ अनुज्ञेय होणा-या कर्मचा-यांच्या सुधारित वेतन संरचनेमधील वेतननिश्चिती संदर्भातील शिफारशी. | स्विकृत. |

******

# महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम २००९.

वित्त विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक २२ एप्रिल,२००९.

**: अधिसूचना :**

भारताचे संविधान,

क्रमांक वेपुर १२०९/प्र.क्र.२७/सेवा—९: भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्राचे राज्यपाल पुढील नियम करीत आहेत :-

१. संक्षिप्त नाव आणि प्रारंभ–

(१) या नियमांस महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम,२००९ असे संबोधण्यात यावे.
(२) ते दिनांक १ जानेवारी,२००६ पासून अंमलात आले आहे असे मानण्यात येईल.

२. हे नियम लागू होणा–या शासकीय कर्मचा–यांचे प्रवर्ग –

(१) या नियमांव्दारे किंवा तद्नुसार अन्यथा तरतूद केली असेल ती खेरीज करुन, हे नियम महाराष्ट्राच्या राज्यपालांच्या नियमकारी नियंत्रणाखालील सर्व व्यक्तींना लागू होतील.

(२) हे नियम खालील शासकीय कर्मचा–यांना लागू होणार नाहीत –

(अ) पूर्णकालीक कामावर नसलेले शासकीय कर्मचारी;
(ब) एकत्रित वेतनदरांवरील शासकीय कर्मचारी;
(क) कंत्राटात अन्यथ तरतूद केली असेल ती खेरीज करुन कंत्राटी कामावर असलेले शासकीय कर्मचारी;
(ड) आकस्मिक खर्चामधून ज्यांना वेतन दिले जाते असे शासकीय कर्मचारी;
(इ) जे नियमित समयश्रेणीवर नाहीत आणि ज्यांच्या वेतनश्रेणी नियमित आस्थापनेवरील तत्सम पदांच्या वेतनश्रेणीशी समान नाहीत असे कार्यव्ययी आस्थापनेवरील शासकीय कर्मचारी;
(फ) रोजंदारीवरील कर्मचारी;
(ग) जे दिनांक ३१ डिसेंबर,२००५ रोजी किंवा तत्पूर्वी सेवानिवृत्त झाले आणि ज्यांना सेवानिवृत्तीनंतर त्या दिनांकास पुन्हा नियुक्त करण्यात आले आणि ज्यांना सेवानिवृत्तीनंतरच्या पुनर्नियुक्तीचा कालावधी त्या दिनांकानंतर वाढवून दिलेला आहे असे शासकीय कर्मचारी ;

(ह) ज्यांना या नियमांच्या प्रवर्तनापासून राज्यपालांनी खास करुन पूर्णत: किंवा अंशत: वगळले आहे असे शासकीय कर्मचारी.

३. **व्याख्या :-**

संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, या नियमांत–

(१) " जोडपत्र " म्हणजे या नियमांसोबत जोडलेली जोडपत्रे,

(२) सुधारित वेतन संरचतनेतील " मूळ वेतन" म्हणजे विहित वेतन बँडमध्ये आहरित करीत असलेले वेतन अधिक अनुज्ञेय ग्रेड वेतन परंतु त्यामध्ये " विशेष वेतन " इत्यादी सारख्या वेतनाचा समावेश नसेल. उच्च प्रशासकीय श्रेणी + ( एचएजी +) वेतनश्रेणीतील शासकीय कर्मचा-यांच्या बाबतीत " मूळ वेतन " म्हणजे विहित श्रेणीतील वेतन.

(३) " विद्यमान मूळ वेतन" म्हणजे विहित करण्यात आलेल्या वेतनश्रेणीत आहरित करीत असलेले वेतन ज्यामध्ये कुंठीत वेतनवाढ अथवा वेतनवाढीचाही समावेश असेल परंतु ज्यामध्ये " विशेष वेतन " इत्यादी सारख्या वेतनाचा समावेश नसेल.

(४) " विद्यमान वित्तलब्धी " मध्ये –

(i) विद्यमान मूळ वेतन,

(ii) मूळ वेतनावरील समुचित महागाई वेतन आणि

(iii) मूळ वेतन आणि महागाई वेतनावरील समुचित महागाई भत्ता यांचा समावेश असेल.

(५) " विद्यमान श्रेणी " म्हणजे १ जानेवारी २००६ रोजी शासकीय कर्मचा-याने , कायम असो किंवा स्थानापन्न नात्याने असो धारण केलेल्या पदाला लागू असलेली सध्याची श्रेणी (किंवा यथास्थिती,त्याला लागू असलेली वैयक्तिक श्रेणी ).

**स्पष्टीकरण :-** जो शासकीय कर्मचारी १ जानेवारी २००६ रोजी भारताबाहेर प्रतिनियुक्तीवर किंवा रजेवर किंवा स्वीयेतर सेवेत होता, किंवा जो वरच्या पदावर स्थानापन्न नसता तर त्या तारखेस एका किंवा अधिक खालच्या पदांवर स्थानापन्न म्हणून काम करीत राहिला असता अशा कर्मचा-यांच्या बाबतीत " विद्यमान श्रेणीत" तो भारताबाहेर प्रतिनियुक्तीवर किंवा रजेवर किंवा स्वीयेतर सेवेत नसता किंवा यथास्थिती वरच्या पदावर स्थानापन्न म्हणून नसता तर त्याने जे पद धारण केले असते त्या पदास लागू असलेल्या श्रेणीचा समावेश होतो.

**टीप:-** विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वेतनश्रेणी वगळून अंमलात असलेल्या विद्यमान श्रेणींची सूची जोडपत्र-एक मध्ये ( इंग्रजी भाषांतरासोबत) दिली आहे.

(६) “ ग्रेड वेतन ” म्हणजे अनुसूचीच्या स्तंभ ५ मध्ये सुधारणापूर्व वेतनश्रेणी/अथवा पदासमोर नमुद केलेली नियत रक्कम.

(७) “ वेतन बँड मधील वेतन” म्हणजे अनुसूचीच्या स्तंभ ४ मध्ये नमूद केलेल्या वेतन बँडमध्ये घेत असलेले वेतन.

(८) “ सध्याची श्रेणी ” म्हणजे अनुसूचीच्या स्तंभ २ मध्ये नमूद केलेल्या कोणत्याही पदाच्या संबंधात या अनुसूचीच्या स्तंभ ३ मध्ये त्या पदासमोर नियत किंवा अन्यथा उल्लेखिलेली वेतनश्रेणी.

(९) “ सुधारित वित्तलब्धी ” म्हणजे सुधारित वेतन संरचेनत शासकीय कर्मचा-यास अनुज्ञेय असलेल्या वेतन बँडमधील वेतन अधिक ग्रेड वेतन किंवा उच्च प्रशासकीय श्रेणी + (एचएजी +) वेतनश्रेणीतील मूळ वेतन.

(१०) एखाद्या पदासंदर्भात वेगळयाने सुधारित वेतन बँड आणि ग्रेड वेतन किंवा वेतनश्रेणी अधिसूचीत करण्यात आली असेल ती खेरीज करुन कोणत्याही पदाची “ सुधारित वेतन संरचना ” म्हणजे अनुसूचीच्या स्तंभ २ मध्ये नमूद केलेल्या पदासमोर स्तंभ ४ आणि स्तंभ ५ मध्ये दर्शविण्यात आलेले वेतन बँड आणि ग्रेड वेतन.

टीप:- सुधारित वेतन संरचनेची सूची जोडपत्र दोन मध्ये (इंग्रजी भाषांतरासोबत) दिली आहे.

(११) “ अनुसूची ” म्हणजे या नियमाणा जोडलेली अनुसूची.

४. पदांची वेतनश्रेणी किंवा वेतन संरचना :- या नियमांच्या दिनांकापासून, अनुसूचीच्या स्तंभ २ मध्ये नमूद केलेल्या प्रत्येक पदाचा वेतन बँड आणि ग्रेड वेतन स्तंभ ४ आणि ५ मध्ये त्या पदासमोर नमूद केल्याप्रमाणे असेल.

५. सुधारित वेतन संरचनेमध्ये वेतन काढणे :- या नियमांत, अन्यथा तरतूद केली असेल ती खेरीज करुन शासकीय कर्मचारी, ज्या पदावर त्यास नेमले असेल त्या पदाला लागू असलेल्या सुधारित वेतन संरचनेत वेतन घेईल.

परंतु ,ज्या दिनांकास विद्यमान वेतनश्रेणीतील लगतनंतरची किंवा पुढची कोणतीही वेतनवाढ त्याला देय होईल त्या तारखेपर्यन्त किंवा तो आपले पद रिक्त करेपर्यन्त किंवा त्या श्रेणीत वेतन घेणे बंद होईपर्यन्त, विद्यमान श्रेणीमध्ये वेतन चालू ठेवण्याचा शासकीय कर्मचा-यास विकल्प देता येईल.

परंतु, आणखी असे की, दिनांक १ जानेवारी २००६ आणि या नियमांच्या अधिसूचनेचा दिनांक या दरम्यान पदोन्नती, पदाची श्रेणीवाढ इत्यादींमुळे उच्च वेतनश्रेणी घेणा-या शासकीय कर्मचा-यास पदोन्नतीच्या, पदाच्या श्रेणीवाढीच्या दिनांकापासून सुधारित वेतन संरचेनेची निवड करण्याचा विकल्प देता येईल.

स्पष्टीकरण-१: या नियमांच्या परंतुकांनुसार विद्यमान श्रेणी ठेवण्याचा विकल्प केवळ एका विद्यमान श्रेणीबाबत अनुज्ञेय राहील.

विवाम.

स्पष्टीकरण–२ :  दिनांक १ जानेवारी २००६ रोजी किंवा त्यानंतर एखाद्या पदावर, शासकीय सेवेत प्रथमच किंवा दुस–या पदावरुन बदली करुन नेमलेल्या कोणत्याही कर्मचा–यास उपरोक्त विकल्प अनुज्ञेय असणार नाही आणि त्याला केवळ सुधारित वेतन संरचनेनुसारच वेतन मिळेल.

स्पष्टीकरण – ३ : जेव्हा शासकीय कर्मचारी, नियमितपणे स्थानापन्न म्हणून त्याने धारण केलेल्या पदाच्या बाबतीत, त्या पदाला लागू असलेल्या कोणत्याही अन्य नियमान्वये किंवा आदेशानुसार विद्यमान श्रेणीतील वेतनाच्या विनियमनासाठी या नियमाच्या परंतुकानुसार ती श्रेणी कायम ठेवण्याचा विकल्प देत असेल तेव्हा, ज्या कायम पदावर त्याचा धारणाधिकार असेल किंवा धारणाधिकार तहकुब झाला नसता तर त्याचा धारणाधिकार राहिला असता, त्या पदाच्या बाबतीत त्याने विद्यमान श्रेणी कायम ठेवली असती तर त्याने घेतले असते ते कायम वेतन, किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही आदेशानुसार कायम वेतनाचे स्वरुप प्राप्त झालेले स्थानापन्न पदाचे वेतन , यापैकी जे अधिक असेल ते त्याचे कायम वेतन राहील.

६. विकल्प देणे :–

(१) नियम ५ च्या परंतुकानुसार द्यावयाचा विकल्प, या नियमांना जोडलेल्या नमुन्यात ( जोडपत्र–चार) लेखी द्यावा लागेल. हा विकल्प पोटनियम (२) मध्ये नमूद केलेल्या अधिका–यास, ही अधिसूचना निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत किंवा या नियमांस केलेल्या कोणत्याही सुधारणेमुळे विद्यमान श्रेणी सुधारण्यात आली असेल तेव्हा त्या प्रकरणी अशा सुधारणेच्या आदेशाच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत पोहचेल अशा बेताने पाठविण्यात यावा.

परंतु,–

(एक) अशा प्रसिध्दीच्या दिनांकास किंवा यथास्थिती अशा आदेशाच्या दिनांकास शासकीय कर्मचारी भारताबाहेर रजेवर, किंवा प्रतिनियुक्तीवर किंवा स्वीयेतर सेवेत किंवा युध्दसेवेत असेल तेव्हा त्या बाबतीत अशा कर्मचा–याने भारतात आपल्या पदाचा कार्यभार घेण्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत उक्त प्राधिका–यास पोहचेल अशा रीतीने उक्त विकल्प द्यावा, आणि

(दोन) १ जानेवारी २००६ रोजी शासकीय कर्मचारी निलंबनाधीन असेल तेव्हा त्याची कामावर परत येण्याचा दिनांक या पोटनियमांत विहित केलेल्या दिनांकानंतरचा असेल तर त्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत त्यास विकल्प देता येईल.

(२) शासकीय कर्मचारी हे आपला विकल्प कार्यालय प्रमुखास कळवतील.

(३) विकल्पासंबंधीची सूचना पोटनियम (१) मध्ये नमूद केलेल्या कालावधीत मिळाली नाही तर, शासकीय कर्मचा–याने १ जानेवारी २००६ रोजी व त्याच दिवसापासून सुधारित वेतन संरचनेची निवड केली आहे असे समजण्यात येईल.

(४) एकदा दिलेला विकल्प अंतिम असेल.

टीप:- १.	१ जानेवारी २००६ रोजी किंवा त्यानंतर ज्यांच्या सेवा समाप्त करण्यात आल्या आणि मृत्यू, मंजूर पदांच्या समाप्तीनंतरची कार्यमुक्ती, राजीनामा, शिस्तभंगाच्या कारणावरुन बडतर्फी किंवा कार्यमुक्ती यामुळे विहित कालमर्यादेत ज्यांना विकल्प देता आला नाही अशा व्यक्ती या नियमांचे लाभ मिळण्यास पात्र आहेत.

टीप:- २.	१ जानेवारी २००६ रोजी किंवा त्यानंतर मृत्यू पावल्यामुळे ज्यांना विहित कालमर्यादेत विकल्प देता आला नाही, त्यांनी १ जानेवारी २००६ रोजी व त्याच दिवसापासून किंवा सुधारित वेतन संरचना अधिक अनुकूल असल्यास त्यांच्या अवलंबितांना जास्तीत जास्त लाभदायक असेल अशा नंतरच्या तारखेपासून सुधारित वेतन संरचनेची निवड केली आहे, असे मानले जाईल. अशा प्रकरणात थकबाकी प्रदान करण्याची आवश्यक कार्यवाही कार्यालय प्रमुखाने करावी.

टीप:- ३.	१ जानेवारी २००६ रोजी अर्जित रजेवर किंवा रजा वेतन प्रदेय असणा-या कोणत्याही रजेवर असलेले शासकीय कर्मचारी या नियमांचा लाभ मिळण्यास पात्र असतील.

७.	<u>सुधारित वेतन संरचनेत प्रारंभिक वेतन निश्चिती</u>:-

(१) दिनांक १ जानेवारी २००६ पासून सुधारित वेतन संरचना लागू करण्याबाबत ज्याने विकल्प दिला आहे किंवा नियम ६ च्या पोटनियम (३) अनुसार विकल्प दिल्याचे मानण्यात आले आहे, अशा शासकीय कर्मचा-याच्या बाबतीत, राज्यपालांनी विशेष आदेशाव्दारे अन्यथ आदेश दिले नसल्यास , त्याचे प्रारंभिक वेतन, ज्या कायम पदावर त्याचा धारणाधिकार आहे किंवा तो धारणाधिकार तहकूब झाला नसता तर तो राहिला असता, त्या पदाच्या कायम वेतनाच्या बाबतीत आणि त्याने धारण केलेल्या स्थानापन्न पदाच्या बाबतीत, खालीलप्रमाणे स्वतंत्रपणे निश्चित केले जाईल :-

(अ) सर्व कर्मचा-यांच्या बाबतीत :-

(एक) दिनांक १ जानेवारी २००६ रोजी सुधारित वेतन बँड अथवा वेतनश्रेणीमधील वेतननिश्चिती, विद्यमान वेतनश्रेणीतील मूळ वेतनास १.८६ ने गुणून येणा-या रकमेच्या पुढील दहाच्या पटीतील रकमेवर करण्यात येईल.

(दोन) जर वरील (एक) प्रमाणे येणारे वेतन सुधारित वेतन बँड अथवा वेतनश्रेणीतील किमान टप्प्याहून कमी असेल तर सुधारित वेतन बँड अथवा वेतनश्रेणीतील किमान टप्प्यावर वेतन निश्चित केले जाईल.

परंतू आणखी असे की:-

वरीलप्रमाणे वेतननिश्चिती करताना विद्यमान वेतनश्रेणीत लागोपाठ दोन किंवा त्याहून अधिक टप्प्यांवर वेतन घेणा-या शासकीय कर्मचा-यांचे वेतन जेव्हा एकवटते म्हणजेच, सुधारित वेतन संरचनेमध्ये एकाच टप्प्यावर निश्चित होते, तेव्हा हे टाळण्यासाठी, विद्यमान वेतनश्रेणीतील एकवटणा-या प्रत्येक दोन

टप्प्यांना सुधारित वेतन बँडमध्ये एक वेतनवाढ देण्यात यावी. सदर वेतनवाढ वेतन बँडमधील वेतनावर देण्यात येईल; त्यामध्ये ग्रेड वेतनाचा समावेश असणार नाही.

पीबी-४ वेतन बँडमधील उच्च प्रशासकीय श्रेणींमध्ये (एचएजी) वेतन एकवटल्याच्या परिणामी, या वेतनश्रेणींतील सर्व वेतन टप्प्यांचा विचार करुन वेतनवाढीचा फायदा देण्यात येईल. उच्च प्रशासकीय श्रेणी + (एचएजी+) या सुधारित वेतनश्रेणीच्या बाबतीत सुधारणापूर्व वेतनश्रेणीतील एकवटणा-या प्रत्येक दोन टप्प्यांना सुधारित वेतन बँडमध्ये एक वेतनवाढ देण्यात येईल.

जर वर नमूद केल्याप्रमाणे वेतन वाढवून दिल्यामुळे एखाद्या शासकीय कर्मचा-याचे वेतन सुधारित वेतन बँडमधील अथवा वेतन श्रेणीतील ज्या टप्प्यावर निश्चित होत असेल तो टप्पा, जर त्याच विद्यमान वेतनश्रेणीत पुढील वरच्या टप्प्यावर वेतन घेत असलेल्या दुस-या शासकीय कर्मचा-याचे वेतन सुधारित वेतन बँड अथवा वेतनश्रेणीमध्ये निश्चित करण्यात आले असेल त्या टप्प्यापेक्षा वरचा असेल तर अशा दुस-या शासकीय कर्मचा-याचे वेतन पहिल्या शासकीय कर्मचा-याच्या वेतनापेक्षा जेवढया रकमेने कमी असेल फक्त तेवढयाच रकमेने वाढवून देण्यात येईल.

(तीन) वरील प्रमाणे वेतन बँडमधील वेतन निश्चित करण्यात येईल. वेतन बँडमधील या वेतनाबरोबरच विद्यमान वेतनश्रेणीसाठी विहित केलेले समुचित ग्रेड वेतनही अनुज्ञेय राहील.

(ब) विद्यमान वेतनश्रेणीतील वेतनाबरोबर विशेष वेतन अथवा भत्ता मिळणा-या कर्मचा-यांच्या बाबतीत, जेथे सुधारित वेतन बँड आणि ग्रेड वेतनाबरोबर विशेष वेतन अथवा भत्ता अनुज्ञेय करण्यात आला नाही, त्या प्रकरणी सुधारित वेतन संरचनेतेत वरील खंड (अ) च्या तरतुदीनुसार वेतन निश्चित करण्यात येईल.

(क) विद्यमान वेतनश्रेणीतील वेतनाबरोबर अन्य कोणत्याही नामाभिधानाने विशेष वेतन अथवा भत्ता मिळत असेल आणि सुधारित वेतन संरचनेत विशेष वेतन अथवा भत्ता पूर्वीच्याच अथवा सुधारित दराने अनुज्ञेय करण्यात आला असेल तर, त्याप्रकरणी सुधारित वेतन संरचनेत वरील खंड (अ) च्या तरतुदीनुसार वेतन निश्चित करण्यात येईल.

टीप: १- दिनांक १ जानेवारी २००६ रोजी रजा वेतन प्रदेय रजेवर असलेल्या शासकीय कर्मचा-यास सुधारित वेतन संरचना दिनांक १ जानेवारी २००६ अथवा विकल्पानुसार सुधारित वेतन संरचना स्विकृतीच्या दिनांकापासून लागू होईल. तसेच दिनांक १ जानेवारी २००६ रोजी अध्ययन रजेवर असलेल्या शासकीय कर्मचा-यास या नियमांचा लाभ दिनांक १ जानेवारी २००६ अथवा विकल्पानुसार सुधारित वेतन संरचना स्विकृतीच्या दिनांकापासून लागू होईल.

टीप: २-निलंबनाधीन असलेला शासकीय कर्मचारी विद्यमान वेतनश्रेणीमध्येच निर्वाह निधी भत्ता आहरित करील आणि सुधारित वेतन संरचनेतील त्याचे वेतन, त्याच्या विरुध्द सुरु असलेल्या शिस्तभंगाच्या कार्यवाहीवरील अंतिम निर्णयाच्या अधिन राहील.

टीप: ३ -जेव्हा, कायम पद धारण करणारा शासकीय कर्मचारी नियमितपणे वरच्या पदावर स्थानापन्न म्हणून काम करीत असेल आणि या दोन्ही पदांना लागू असलेल्या श्रेणी एकाच वेतन संरचनेत विलीन झाल्या

असतील तेव्हा या पोटनियमानुसार केवळ स्थानापन्न पदाच्या संदर्भात वेतन निश्चित केले जाईल आणि असे निश्चित केलेले वेतन कायम वेतन म्हणून मानले जाईल.

वेगवेगळया विद्यमान श्रेणींना एकच सुधारित वेतन संरचना लागू असलेली पदे स्थानापन्न नात्याने धारण करणा-या शासकीय कर्मचा-यांना, या टीपेच्या तरतुदी योग्य त्या फेरफारांसह लागू होतील.

टीप: ४- जेव्हा, शासकीय कर्मचा-याच्या विद्यमान वित्तलब्धी सुधारित वित्तलब्धीपेक्षा अधिक होत असतील , तेव्हा फरकाची रक्कम वैयक्तिक वेतन म्हणून दिली जाईल आणि ती वेतनातील पुढील वाढींमध्ये सामावून घेतली जाईल.

टीप: ५- पोटनियम (१)अन्वये वेतन निश्चित करताना, जो शासकीय कर्मचारी १ जानेवारी २००६ च्या लगतपूर्वी, त्याच संवर्गातील आपल्या कनिष्ठ शासकीय कर्मचा-यापेक्षा विद्यमान श्रेणीत जास्त वेतन घेत होता त्याचे वेतन सुधारित वेतन संरचनेत अशा कनिष्ठ कर्मचा-याच्या वेतनापेक्षा कमी वेतनावर निश्चित होत असेल तर त्या बाबतीत त्याचे वेतन कनिष्ठ कर्मचा-याच्या वेतनापर्यन्त वाढविण्यात येईल.

टीप: ६ -ज्या शासकीय कर्मचा-यास १ जानेवारी २००६ रोजी वैयक्तिक वेतन मिळत असेल त्या कर्मचा-याच्या बाबतीत त्याच्या वैयक्तिक वेतनासहीत विद्यमान वित्तलब्धी सुधारित वित्तलब्धीपेक्षा अधिक होत असतील तर अशी फरकाची जादा रक्कम शासकीय कर्मचा-यास वैयक्तिक वेतन म्हणून देण्यात येईल आणि ती वेतनातील पुढील वाढीत सामावून घेतली जाईल.

टीप: ७- १ जानेवारी २००६ पूर्वी वरच्या पदावर बढती दिलेला वरिष्ठ शासकीय कर्मचारी सुधारित वेतन संरचनेत १ जानेवारी २००६ रोजी किंवा त्यानंतर वरच्या पदावर बढती मिळालेल्या त्याच्या कनिष्ठाहून कमी वेतन घेत असेल तेव्हा अशा प्रकरणी वरिष्ठ शासकीय कर्मचा-याचे वेतन त्याच्या कनिष्ठ कर्मचा-याच्या सुधारित वेतन बॅंडमध्ये निश्चित केलेल्या वेतनाच्या रकमेइतके वाढविण्यात यावे. ही वाढ कनिष्ठ शासकीय कर्मचा-याच्या बढतीच्या तारखेपासून लागू करण्यात यावी. मात्र, त्यासाठी पुढील शर्ती पूर्ण कराव्या लागतील :-

(अ) कनिष्ठ व वरिष्ठ शासकीय कर्मचारी हे दोघेही एकाच संवर्गातील असावेत आणि ज्या पदांवर त्यांना बढती देण्यात आली असेल ती पदे त्याच संवर्गात समरुप असावीत;

(ब) ज्या खालच्या व वरच्या पदांवर वेतन मिळण्यास ते पात्र असतील त्या पदाच्या सुधारणापूर्व वेतनश्रेणी व सुधारित वेतन संरचनेतील वेतन बॅंड व ग्रेड वेतन समरुप असावेत;

(क) वरिष्ठ शासकीय कर्मचारी बढतीच्यावेळी कनिष्ठ शासकीय कर्मचा-याइतके किंवा त्यापेक्षा अधिक वेतन आहरित करीत असला पाहिजे;

(ड) अशा बढतीनंतर सुधारित वेतनसंरचनेमध्ये वेतन विनियमित करण्यास लागू होणा-या महाराष्ट्र नागरी सेवा ( वेतन) नियम १९८१ च्या नियम ११ च्या तरतूदी किंवा कोणताही

दुसरा नियम किंवा आदेश याचा प्रत्यक्ष परिणाम म्हणून अशी विसंगती उद्‌भवलेली असावी. जर कनिष्ठ कर्मचारी खालच्या पदावर सुधारणापूर्व श्रेणीमध्ये त्याला दिलेल्या आगाऊ वेतनवाढीमुळे वरिष्ठ कर्मचा-यापेक्षा अधिक वेतन घेत असेल तर वरिष्ठ कर्मचा-याचे वेतन वाढविण्यासाठी या टीपेच्या तरतूदींचा आधार घेता येणार नाही.

(२)पोटनियम (१) अन्वये स्थानापन्न पदाचे निश्चित केलेले वेतन कायम पदाच्या निश्चित केलेल्या वेतनाहून कमी असल्यास, नियम ५ च्या तरतूदीच्या अधिन राहून स्थानापन्न पदाचे वेतन कायम पदाच्या वेतन टप्प्याइतक्या वेतनावर निश्चित करण्यात येईल.

## ८. दिनांक १ जानेवारी २००६ रोजी किंवा त्यानंतर नियुक्ती झालेल्या कर्मचा-यांची सुधारित वेतन संरचनेत वेतन निश्चिती –

दिनांक १ जानेवारी २००६ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त झालेल्या कर्मचा-यांच्या बाबतीत नवीन नियुक्तीच्या वेळेचे वेतनबँडमधील प्रारंभिक वेतन अनुज्ञेय ग्रेड वेतनासह या नियमांतील जोडपत्र – ३ मध्ये (इंग्रजी भाषांतरासोबत) दर्शविल्यानुसार राहील.

ही तरतूद दिनांक १ जानेवारी २००६ आणि सदर अधिसूचना निर्गमित झाल्याच्या दिनांकादरम्यान नियुक्त झालेल्या कर्मचा-यांनाही लागू राहील. अशा प्रकरणी सुधारणापूर्व वेतनश्रेणीतील वित्तलब्धी सुधारित वेतन संरचनेनुसार निश्चित होणारे वेतन आणि त्यावरील महागाई भत्त्यापेक्षा अधिक असेल तर सदर फरकाची रक्कम वैयक्तिक वेतन म्हणून दिली जाईल आणि ती वेतनातील पुढील वाढींमध्ये सामावून घेतली जाईल.

९. **सुधारित वेतन संरचनेमधे वेतनवाढीचा दर** :– सुधारित वेतन संरचनेत वेतन बँडमधील वेतन व ग्रेड वेतनावर ३ टक्के दराने वेतनवाढ देय राहील; ही रक्कम पुढील दहाच्या पटीत देण्यात यावी. सदर वेतनवाढीची रक्कम वेतन बँडमधील विद्यमान वेतनात मिळविण्यात येईल.

१०. **सुधारित वेतन संरचनेमध्ये पुढील वेतनवाढीचा दिनांक**:– सर्व कर्मचा-यांना दरवर्षी दिनांक १ जुलै या एकाच दिनांकास वार्षिक वेतनवाढ मंजूर करण्यात येईल. दिनांक १ जुलै रोजी ज्या कर्मचा-यांची सुधारित वेतन संरचनेमध्ये ६ महिने किंवा त्यापेक्षा अधिक सेवा पूर्ण होईल ते कर्मचारी दिनांक १ जुलै रोजी वेतनवाढ मिळण्यास पात्र राहतील. सुधारित वेतन संरचनेत दिनांक १ जानेवारी २००६ रोजी वेतननिश्चिती केल्यानंतर पहिली वेतनवाढ दिनांक १ जुलै २००६ रोजी देय होईल. ज्या कर्मचा-यांना दिनांक २ जानेवारी २००५ ते दिनांक १ जानेवारी २००६ या कालावधीत विद्यमान वेतनश्रेणीत वेतनवाढ मिळाली आहे अशा सर्व कर्मचा-यांना दिनांक १ जुलै २००६ रोजी पुढील वेतनवाढ देय राहील.

आणखी असे की, ज्या कर्मचा-यांना विद्यमान वेतनश्रेणीत दिनांक १ जानेवारी २००६ रोजी वेतनवाढ देय आहे अशा कर्मचा-यांना दिनांक १ जानेवारी २००६ रोजी विद्यमान वेतनश्रेणीत वेतनवाढ देऊन या नियमांनुसार सुधारित वेतन संरचनेत वेतन निश्चिती करण्यात येईल. अशा प्रकारणी पुढील वेतनवाढ दिनांक १ जुलै २००६ रोजी देय होईल.

.
.

आणखी असे की, जे कर्मचारी विद्यमान वेतनश्रेणीतील कमाल वेतन दिनांक १ जानेवारी २००६ रोजी एक वर्ष किंवा त्याहून अधिक कालावधीपर्यन्त घेत आहेत त्यांच्याबाबतीत सुधारित वेतन संरचनेत दिनांक १ जानेवारी २००६ रोजी पुढील वेतनवाढ देय होईल. त्यानंतर नियम १० मधील तरतूदी लागू राहतील.

आणखी पुन्हा असे की, सुधारित वेतन बँडमध्ये कमाल टप्प्यावर एक वर्ष वेतन घेणा-या कर्मचा-यास लगतचा उच्च वेतन बँड मंजूर करण्यात यावा हा वेतन बँड मंजूर करताना त्याला एका वेतनवाढीचा फायदा देण्यात यावा. त्यानंतर सदर कर्मचारी पीबी -४ वेतन बँडमधील कमाल टप्प्यावर पोहोचेपर्यन्त अशा प्रकारे लगतच्या उच्च वेतन बँड मंजूर करण्यात यावा. त्यानंतर त्यास वेतनवाढीचा फायदा अनुज्ञेय राहणार नाही.

टीप:- दोन विद्यमान श्रेणींपैकी एक बढतीची श्रेणी असून या दोन्ही श्रेणी विलीन झाल्या असतील आणि खालच्या श्रेणीत निम्न अथवा समान वेतन घेणारा कनिष्ठ शासकीय कर्मचारी सुधारित वेतन संरचनेमुळे विद्यमान वरच्या श्रेणीतील वरिष्ठ शासकीय कर्मचा-याच्या वेतनापेक्षा अधिक वेतन घेत असेल अशा बाबतीत वरिष्ठ शासकीय कर्मचा-याचे सुधारित वेतन संरचनेतील वेतन त्याच्या कनिष्ठ कर्मचा-याच्या वेतनापर्यन्त त्याच दिनांकापासून वाढविण्यात येईल आणि नियम १० नुसार त्याला पुढील वेतनवाढ मिळेल.

११. **दिनांक १ जानेवारी २००६ च्या नंतर सुधारित वेतन संरचनेतील वेतन निश्चिती** :-जो शासकीय कर्मचारी वार्षिक वेतनवाढ घेतो आणि जो दिनांक १ जानेवारी २००६ रोजी त्याने धारण केलेल्या पदाच्या बाबतीत दिनांक १ जानेवारी २००६ नंतर त्याच्या पुढील वेतनवाढीच्या दिनांकापासून सुधारित वेतन संरचनेची निवड करतो, त्याची त्या दिनांकास सुधारित वेतन संरचनेतील वेतन निश्चिती खालीलप्रमाणे करण्यात येईल :-

वेतन निश्चितीच्या दिनांकास विद्यमान वेतनश्रेणीत अनुज्ञेय मूळ वेतनात महागाई वेतन व दिनांक १ जानेवारी २००६ रोजी विद्यमान वेतनश्रेणीस लागू असलेला महागाई भत्ता मिळवून परिगणित करण्यात यावे. ही रक्कम पुढील १० च्या पटीत घेऊन येणारी रक्कम सुधारित वेतन संरचनेतील अनुज्ञेय वेतन बँड मधील मूळ वेतन होईल. याव्यतिरिक्त, विद्यमान वेतनश्रेणीस अनुज्ञेय समुचित ग्रेड वेतन देय होईल. विशेष वेतन घेणा-या कर्मचा-यांच्या बाबतीत यथास्थिती नियम ७(१)(ब) किंवा (क) मधील पध्दत अनुसरण्यात येईल. मात्र वेतननिश्चितीसाठी विचारात घेण्यात येणारे मूळ वेतन व महागाई वेतन हे वेतन निश्चितीच्या दिनांकास अनुज्ञेय असलेले मूळ वेतन व महागाई वेतन असेल आणि महागाई भत्ता दिनांक १ जानेवारी २००६ रोजी अनुज्ञेय असलेल्या दरानुसार परिगणित करण्यात येईल.

१२. **दिनांक १ जानेवारी २००६ या दिनांकापूर्वी धारण केलेल्या पदावर त्या दिनांकानंतर पुनर्नियुक्ती झाल्यावर वेतन निश्चिती :-** ज्या शासकीय कर्मचा-याने दिनांक १ जानेवारी २००६ पूर्वी एखाद्या पदावर स्थानापन्न म्हणून काम केले असेल पण त्या दिनांकास ते पद धारण करीत नसेल आणि जो त्या पदावर नंतर नेमणूक झाल्यावर सुधारित वेतन संरचनेत वेतन घेत असेल, त्या कर्मचा-यास महाराष्ट्र नागरी सेवा ( वेतन ) नियम १९८१ च्या नियम ११ च्या परंतूकाचा लाभ देण्यात येईल. हा लाभ दिनांक १ जानेवारी २००६ रोजी त्याने पद धारण केले असते आणि त्या दिनांकापासून सुधारित वेतन संरचनेची निवड केली असती तर अनुज्ञेय होणा-या लाभाच्या मर्यादेइतका असेल.

विवाम.

१३.	दिनांक १ जानेवारी २००६ रोजी किंवा त्यानंतरच्या पदोन्नतीच्या अनुषंगाने वेतननिश्चिती :-

(अ) सुधारित वेतन संरचनेत एका ग्रेड वेतनातून दुस-या ग्रेड वेतनात पदोन्नती मिळालेल्या प्रकरणी खालीलप्रमाणे वेतननिश्चिती करण्यात येईल:-

(१) वेतन बँडमधील वेतन अधिक ग्रेड वेतनाच्या ३ टक्के वाढ देऊन येणारी रक्कम पुढील १० च्या पटीत घेण्यात यावी. ही रक्कम वेतन बँडमधील विद्यमान वेतनात मिळविण्यात यावी. या वेतनावर पदोन्नतीच्या पदास लागू असलेले ग्रेड वेतन मंजूर करण्यात यावे. पदोन्नतीनंतर वेतन बँड बदलत असलेल्या प्रकरणीही वरीलप्रमाणे वेतननिश्चिती करण्यात येईल. तथापि, वरीलप्रमाणे वेतनवाढ मिळवूनही पदोन्नतीच्या पदावरील वेतन, पदोन्नतीच्या पदाच्या वेतन बँड मधील किमान वेतनापेक्षा कमी असल्यास त्या वेतन बँड मधील किमान वेतन हे संबंधित कर्मचा-याचे पदोन्नतीनंतरचे वेतन होईल.

(२) पीबी-४ वेतन बँड मधून उच्च प्रशासकीय श्रेणी +(एचएजी +) मध्ये पदोन्नती मिळाल्यावर नियम ९ मध्ये विहित केल्यानुसार वेतन बँड मधील वेतनात एक वेतनवाढ देऊन आणि त्यात समुचित विद्यमान ग्रेड वेतनाची रक्कम मिळवून येणारी रक्कम उच्च प्रशासकीय श्रेणी +( एचएजी +) मधील मूळ वेतन असेल.ही रक्कम रुपये ८०,००० पेक्षा अधिक असता कामा नये.

(ब) एका श्रेणीतून दुस-या श्रेणीत पदोन्नती मिळालेल्या शासकीय कर्मचा-यास पदोन्नतीच्या दिनांकापासून अथवा त्याच्या पुढील वेतनवाढीच्या दिनांकास म्हणजे त्या वर्षातील १ जुलै रोजी वेतन निश्चिती करण्याचा विकल्प देण्याची तरतूद महाराष्ट्र नागरी सेवा ( वेतन)नियम, १९८१ च्या नियम ११ मध्ये आहे; अशा प्रकरणी खालीलप्रमाणे वेतन निश्चिती करण्यात येईल:-

(१) पुढील वेतनवाढीच्या दिनांकास वेतन निश्चिती करण्याचा विकल्प दिलेल्या शासकीय कर्मचा-याच्या बाबतीत पदोन्नतीच्या दिनांकास त्याच्या वेतन बँडमध्ये बदल होणार नाही. मात्र, त्यास पदोन्नतीच्या पदाचे ग्रेड वेतन मंजूर करण्यात यावे. त्यानंतर पुढील वेतनवाढीच्या दिनांकास म्हणजे १ जुलै रोजी त्याची पुनर्वेतन निश्चिती करण्यात यावी. त्या दिवशी त्यास प्रथम वार्षिक वेतनवाढ आणि दुसरी पदोन्नतीची वेतनवाढ अशा दोन वेतनवाढी देण्यात याव्यात. या वेतनवाढी परिगणित करताना पदोन्नतीपूर्वी मिळत असलेले मूळ वेतन विचारात घेण्यात यावे.

(२) पदोन्नतीच्या दिनांकास वेतन निश्चिती करण्याचा विकल्प दिलेल्या शासकीय कर्मचा-यांच्या बाबतीत तो जर २ जुलै ते १ जानेवारी या कालावधीत पदोन्नत झाला असल्यास त्यास वरिष्ठश्रेणीमध्ये पहिली वेतनवाढ पुढील १ जुलै रोजी देण्यात यावी. परंतु , तो जर संबंधित वर्षाच्या २ जानेवारी ते ३० जुलै दरम्यान पदोन्नत झाला असल्यास त्यास पुढील वर्षाच्या १ जुलै रोजी वेतनवाढ मिळेल.

१४.	दिनांक १ जानेवारी २००६ पूर्वी कालबध्द पदोन्नती अथवा सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मिळालेल्या कर्मचा-यांची वेतननिश्चिती:-

(१) दिनांक १ जानेवरी २००६ पूर्वी कालबध्द पदोन्नती अथवा सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मिळाल्यानंतर दिनांक१ जानेवारी २००६ पूर्वी प्रत्यक्ष पदोन्नती मिळाली असेल, अशा कर्मचा–यांची वेतन निश्चिती अनुज्ञेय वेतन बँड व ग्रेड वेतनानुसार यथास्थिती नियम ७ किंवा नियम ११ नुसार करण्यात यावी.

(२) दिनांक १ जानेवारी २००६ पूर्वी कालबध्द पदोन्नती किंवा सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मिळाल्यानंतर पदोन्नतीच्या संधी उपलब्ध असूनही प्रत्यक्ष पदोन्नती न मिळालेल्या कर्मचा–यास पदोन्नतीच्या पदाचा वेतन बँड अनुज्ञेय राहील आणि सदर वेतन बँड मधील वेतन निश्चिती यथास्थिती नियम ७ किंवा नियम ११ नुसार करण्यात यावी. मात्र, त्यास कालबध्द पदोन्नती किंवा सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मिळण्यापूर्वीच्या वेतनश्रेणीस अनुज्ञेय ग्रेड वेतन अधिक सदर ग्रेड वेतन आणि पदोन्नतीच्या पदाचे ग्रेड वेतन यामधील फरकाच्या ५० टक्के किंवा रुपये १०० यापैकी जे जास्त असेल ते ग्रेड वेतन अनुज्ञेय राहील. उर्वरित ग्रेड वेतन, अनुज्ञेय असल्यास,प्रत्यक्ष पदोन्नतीच्या वेळेस अनुज्ञेय होईल; मात्र पुन्हा वेतनवाढीचा लाभ अनुज्ञेय होणार नाही.

(३) दिनांक १ जानेवारी २००६ पूर्वी कालबध्द पदोन्नती अथवा सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मिळालेल्या व पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नसलेल्या कर्मचा–याना या योजनेचा लाभ मिळण्यापूर्वी च्या विद्यमान वेतनश्रेणीस अनुज्ञेय वेतन बँड व ग्रेड वेतन मंजूर करण्यात येईल व त्यांची वेतन निश्चिती यथास्थिती नियम ७ किंवा नियम ११ नुसार करण्यात यावी. तसेच, त्यांना खाली दिल्याप्रमाणे अतिरिक्त ग्रेड वेतनही अनुज्ञेय राहील :–

(अ) उक्त योजनेचा लाभ मिळण्यापूर्वीच्या विद्यमान वेतनश्रेणीस अनुज्ञेय ग्रेड वेतन रुपये २००० पर्यन्त असल्यास — अतिरिक्त ग्रेड वेतन रुपये १००;

(ब) उक्त योजनेचा लाभ मिळण्यापूर्वीच्या विद्यमान वेतनश्रेणीस अनुक्रमे ग्रेड वेतन रुपये २००० पेक्षा जास्त व ४००० पेक्षा कमी असल्यास— अतिरिक्त ग्रेड वेतन रुपये ३००;

(क) उक्त योजनेचा लाभ मिळण्यापूर्वीच्या विद्यमान वेतनश्रेणीस अनुज्ञेय ग्रेड वेतन रुपये ४००० पेक्षा व ५००० पेक्षा कमी असल्यास— अतिरिक्त ग्रेड वेतन रुपये ४००;

(ड) उक्त योजनेचा लाभ मिळण्यापूर्वीच्या विद्यमान वेतनश्रेणीस अनुज्ञेय ग्रेड वेतन रुपये ५००० पेक्षा असल्यास— अतिरिक्त ग्रेड वेतन रुपये ५००;

१५. **वेतनाची थकबाकी प्रदान करण्याची पध्दती**:– या नियमांनुसार दिनांक १ जानेवारी २००६ ते ३१ मार्च २००९ ( दोन्ही दिवस धरुन) या कालावधीत शासकीय कर्मचारी वेतनाची थकबाकी मिळण्यास पात्र असल्यास, सदर रक्कम पुढील पाच वर्षात समान हप्त्यात भविष्य निर्वाह निधीमध्ये जमा करण्यात यावी. तत्पूर्वी शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक वेपुर १२०८/प्र.क्र.७२/सेवा ९ दिनांक ६ ऑक्टोबर २००८ अन्वये मंजूर केलेल्या अग्रिमाची रक्कम पहिल्या हप्त्यातून समायोजीत करुन उर्वरित रक्कमच भविष्य निर्वाह निधीमध्ये जमा करण्यात यावी.

१६.   **नियमांचा अधिभावी परिणाम** : या नियमांत अन्यथा तरतूद केली असेल ती खेरीज करुन जेथे या नियमांनुसार वेतनाचे विनियमन करण्यात आले असेल त्या प्रकरणांना महाराष्ट्र नागरी सेवा ( वेतन) नियम, १९८१ च्या तरतूदी या नियमांशी विसंगत ठरत असतील त्या मर्यादेपर्यन्त लागू होणार नाहीत.

१७.   **नियम शिथिल करण्याचा अधिकार**:–कोणत्याही विशिष्ट प्रकरणांत या नियमांच्या सर्व किंवा कोणत्याही तरतुदी अकारण त्रासदायक होतील अशी राज्यपालांची खात्री झाली असेल ते प्रकरण न्याय्य व रास्त पध्दतीने हाताळण्यासाठी राज्यपालांस आवश्यक वाटेल अशा मर्यादेच्या व अशा शर्तीच्या अधीन राहून तो नियम लागू करु नये किंवा त्या नियमानुसार आवश्यक म्हणून ठरविलेल्या बाबी शिथिल कराव्या असा आदेश राज्यपाल काढू शकतील.

१८.   **निर्वचन** :–या नियमांच्या कोणत्याही तरतुदींच्या निर्वचनासंबंधी कोणताही प्रश्न उपस्थित झाल्यास तो महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाकडे निर्दिष्टकरण्यात येईल आणि वित्त विभागाचा त्यावरील निर्णय अंतिम राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने ,

विद्याधर कानडे,
शासनाचे प्रधान सचिव.

ववववववव

(शासन अधिसूचना, वित्त विभाग क्रमांक वेपूर १२०९/प्र.क्र.२७/सेवा-९,
दिनांक २२ एप्रिल २००९ चे सहपत्र)

## जोडपत्र चार

## विकल्पाचा नमुना

[ पहा नियम ६ (१)]

१. (अ) कर्मचा-याचे नांव * श्री/श्रीमती/कुमारी ..................................................................

(ब) धारण केलेले पद ...............................................................* कायम / स्थानापन्न

(क) विद्यमान वेतनश्रेणी रुपये ..........................................................

(ड) सुधारित वेतन संरचना वेतन बँड रुपये .....................................ग्रेड वेतन रुपये ..............

२. मी, * श्री/श्रीमती/ कुमारी .........................................................................याव्दारे-

* (१) १ जानेवारी २००६ पासून सुधारित वेतन संरचनेची निवड करतो/करते.

*(२) मी धारण करीत असलेल्या पदाची विद्यमान वेतनश्रेणी पुढीलप्रमाणे चालू ठेवण्याची निवड करतो/करते.

* माझ्या पुढील वेतनवाढीच्या दिनांकापर्यन्त.

* माझे वेतन रुपये .................... पर्यन्त वाढवणा-या नंतरच्या वेतनवाढीच्या दिनांकापर्यन्त.

* मी पद रिक्त करेपर्यन्त किंवा विद्यमान वेतनश्रेणीत वेतन घेण्याचे बंद करेपर्यन्त.

३. हा विकल्प अंतिम असून, त्यामध्ये या दिनांकानंतर सुधारणा करण्यात येणार नाही.

ठिकाण : सही

दिनांक : नांव .....................................

.......................................................................................................................................................

(केवळ कार्यालयाने भरावयाचे )

प्रमाणित करण्यात येते की, कायम/स्थानापन्न पद धारण करीत असलेल्या * श्री/श्रीमती/कुमारी... . ...............
.............................यांनी हा विकल्प, यथोचितरित्या स्वाक्षरीसह व विहित दिनांकापूर्वी मला सादर केला आहे.

ठिकाण : सही

दिनांक : नांव ......................................

कार्यालय प्रमुख..........................

* लागू नसेल ते खोडावे.

.

(Acompaniment to the Government Notification, Finance Department No. RPS1209 /CR 27/ SER 9 dated the 22 nd April,2009 )

## ANNEXURE – I

[( seee Note below Rule 3 (5) ]
List of existing scales of pay in operation excluding UGC Scales.

| Sr. No. | Pay Scale |
|---|---|
| 1 | 2550 (Fixed) |
| | 2550 – 55 – 2660 – 3200 |
| 2 | 2610 – 60 - 2910 – 65 – 3300 -70 - 4000 |
| 3 | 2650 – 65 - 3300 - 70 – 4000 |
| 4 | 2750 – 70 – 3800 – 75 – 4400 |
| 5 | 3050 – 75 – 3950 – 80 – 4590 |
| 6 | 3200 – 85 – 4900 |
| 7 | 4000 – 100 – 6000 |
| 8 | 4500 – 125 – 7000 |
| 9 | 5000 – 150 – 8000 |
| 10 | 5500 – 175 – 9000 |
| 11 | 6000 – 175 – 9850 – 150 – 10000 |
| 12 | 6500 – 200 – 10500 |
| 13 | 7225 – 225 – 11050 |
| 14 | 7450 – 225 – 11050 |
| 15 | 7450 – 225 – 11500 |
| 16 | 7500 – 250 – 12000 |
| 17 | 8000 – 275 – 13500 |
| 18 | 9125 – 275 – 14075 |
| 19 | 10000 – 325 – 15200 |
| 20 | 10650 – 325 – 15850 |
| 21 | 12000 – 375 – 16500 |
| 22 | 14300 – 400 – 18300 |
| 23 | 15100 – 400 – 18300 |
| 24 | 16400 – 450 – 20000 |
| 25 | 16400 – 450 – 20900 |
| 26 | 18400 – 500 – 22400 |
| 27 | 22400 – 525 – 24500 |

(Acompaniment to the Government Notification, Finance Department
No. RPS1209 /CR 27/ SER 9 dated the 22 nd April,2009 )

## ANNEXURE – II

[ ( See Note below Rule 3(10)]

**Pay Bands and Grade Pays in Revised Pay Structure.**

| Sr.No. | Revised Pay Structure Name of Pay Band/Scale | Corresponding Band/Scale | Gorresponding GradePay |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| 1. | - 1 S | 4440 - 7440 | 1300 |
| 2. | - 1 S | 4440 – 7440 | 1400 |
| 3. | - 1 S | 4440 – 7440 | 1600 |
| 4. | - 1 S | 4440 – 7440 | 1650 |
| 5. | - 1 S | 4440 – 7440 | 1700 |
| 6. | PB -1 | 5200 – 20200 | 1800 |
| 7. | PB -1 | 5200 – 20200 | 1900 |
| 7. | PB -1 | 5200 – 20200 | 2000 |
| 8. | PB -1 | 5200 – 20200 | 2400 |
| 9. | PB -1 | 5200 – 20200 | 2500 |
| 10. | PB -1 | 5200 – 20200 | 2800 |
| 11. | PB -1 | 5200 – 20200 | 2900 |
| 12. | PB -1 | 5200 – 20200 | 3000 |
| 13. | PB -1 | 5200 – 20200 | 3500 |
| 14. | PB- 2 | 9300 – 34800 | 4200 |
| 15. | PB- 2 | 9300 – 34800 | 4300 |
| 16. | PB- 2 | 9300 – 34800 | 4400 |
| 17. | PB- 2 | 9300 – 34800 | 4500 |
| 18. | PB- 2 | 9300 – 34800 | 4600 |
| 19. | PB- 2 | 9300 – 34800 | 4800 |
| 20. | PB- 2 | 9300 – 34800 | 4900 |
| 21. | PB- 2 | 9300 – 34800 | 5000 |
| 22. | PB- 2 | 9300 – 34800 | 5400 |
| 23. | PB- 3 | 15600 – 39100 | 5000 |
| 24. | PB- 3 | 15600 – 39100 | 5400 |
| 25. | PB- 3 | 15600 – 39100 | 5500 |
| 26. | PB- 3 | 15600 – 39100 | 5700 |
| 27. | PB -3 | 15600 – 39100 | 5800 |
| 28. | PB –3 | 15600 – 39100 | 6600 |
| 29. | PB -3 | 15600 – 39100 | 6900 |
| 30. | PB -3 | 15600 – 39100 | 7600 |
| 31. | PB -3 | 15600 – 39100 | 7900 |
| 32. | PB -4 | 37400 – 67000 | 8700 |
| 33. | PB -4 | 37400 – 67000 | 8800 |
| 34. | PB -4 | 37400 – 67000 | 8900 |
| 35. | PB -4 | 37400 – 67000 | 10000 |
| 36. | PB- 4 | 37400 - 67000 | 12000 |

ववववववव

(Acompaniment to the Government Notification, Finance Department
No. RPS1209 /CR 27/ SER 9 dated the 22 nd April,2009 )

## ANNEXURE – III

[( seee Rule 8 ]

**Entry pay in the revised pay structure for direct recruits appointed on or after 1.1.2006.**

**( 1 ) Rs. 4440 – 7440 –( 1 S )**

| Sr.No. | Grade Pay | Pay in the Pay Band | Total (Rs.) |
|---|---|---|---|
| 1 | 1300 | 4400 | 5740 |
| 2 | 1400 | 4440 | 5840 |
| 3 | 1600 | 4840 | 6450 |
| 4 | 1650 | 4920 | 6570 |
| 5 | 1700 | 4920 | 6620 |

**( 2 ) Rs. 6200 – 20200 (PB- 1)**

| Sr. No | Grade Pay | Pay in the Pay Band | Total Rs. |
|---|---|---|---|
| **1** | 1800 | 5200 | 7000 |
| **2** | 1900 | 5830 | 7730 |
| **3** | 2000 | 6460 | 8460 |
| **4** | 2400 | 7510 | 9910 |
| **5** | 2500 | 7770 | 10270 |
| **6** | 2800 | 8560 | 11360 |
| **7** | 2900 | 8620 | 11520 |
| **8** | 3000 | 8680 | 11680 |
| **9** | 3500 | 8920 | 12420 |

**( 3 ) Rs. 9300 – 34800 (PB – 2)**

| Sr. No. | Grade Pay | Pay in the Pay Band | Total Rs. |
|---|---|---|---|
| **1** | 4200 | 9300 | 13500 |
| **2** | 4300 | 10100 | 14400 |
| **3** | 4400 | 10900 | 15300 |
| **4** | 4500 | 11700 | 16200 |
| **5** | 4600 | 12540 | 17140 |
| **6** | 4800 | 13350 | 18150 |
| **7** | 4900 | 13530 | 18430 |
| **8** | 5000 | 13710 | 18710 |
| **9** | 5400 | 14450 | 19850 |

**( 4) Rs. 15600 - 39100 (PB- 3)**

| Sr. No | Grade Pay | Pay in the Pay Band | Total Rs. |
|---|---|---|---|
| **1** | 5000 | 15600 | 20600 |
| **2** | 5400 | 15600 | 21000 |
| **3** | 5500 | 15870 | 21370 |
| **4** | 5700 | 16390 | 22090 |
| **5** | 5800 | 16660 | 22460 |
| **6** | 6600 | 18750 | 25350 |
| **7** | 6900 | 19700 | 26600 |
| **8** | 7600 | 21900 | 29500 |
| **9** | 7900 | 22850 | 30750 |

**( 5 ) Rs.37400 – 67000 (PB – 4)**

| Sr. No. | Grade Pay | Pay in the Pay Band | Total Rs. |
|---|---|---|---|
| **1** | 8700 | 37400 | 46100 |
| **2** | 8800 | 38800 | 47600 |
| **3** | 8900 | 40200 | 49100 |
| **4** | 10000 | 43000 | 53000 |
| **5** | 12000 | 47100 | 59100 |

……..

## महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम,२००९.
## वेतननिश्चिती संबंधी सूचना.

वित्त विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक वेपुर १२०९/प्र.क्र.६९/सेवा-९, दिनांक २९ एप्रिल, २००९.

<u>परिपत्रक:-</u>

शासन अधिसूचना, वित्त विभाग क्रमांक वेपुर १२०९/प्र.क्र.२७/सेवा-९, दिनांक २२ एप्रिल,२००९ अन्वये दिनांक १ जानेवारी २००६ पासून सुधारित वेतन संरचना व त्यामधील प्रारंभिक वेतन निश्चिती बाबतचे महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम,२००९ प्रसिध्द करण्यात आलेले आहेत. या नियमांच्या नियम ६ नुसार शासकीय कर्मचा-यांना सदर नियमांना जोडलेल्या जोडपत्र चार प्रमाणे विहित नमुन्यात विकल्प द्यावयाचा आहे. शासकीय कर्मचारी एक महिन्याच्या विहित कालावधीत वेगवेगळया दिनांकाला विकल्प देण्याची शक्यता आहे. कार्यालय प्रमुखांनी शासकीय कर्मचा-यांकडून जसे जसे विकल्प प्राप्त होतील तशी तशी प्रत्येक कर्मचा-याची प्रारंभिक वेतन निश्चित करण्याची कार्यवाही करावी. ज्या शासकीय कर्मचा-यांचे विकल्प विहित मुदतीत म्हणजे दिनांक २१ मे, २००९ पूर्वी प्राप्त होणार नाहीत, अशांच्या बाबतीत सुधारित वेतन संरचनेत प्रारंभिक वेतन निश्चिती करण्याची कार्यवाही त्यानंतर त्वरीत करण्यात यावी. शासकीय कर्मचा-यांच्या सेवापुस्तकांमध्ये वेतन निश्चिती बाबतची योग्यती नोंद कार्यालय प्रमुखांच्या दिनांकीत स्वाक्षरीने घेण्यात यावी.

२. एकाहून अधिक कार्यालय प्रमुखांकडे सेवा केलेल्या शासकीय कर्मचा-यांच्या बाबतीत, महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम,२००९ च्या नियम ६ अन्वये विकल्प सादर करण्याच्या दिवशी तो ज्या कार्यालय प्रमुखांकडे कार्यरत असेल, त्यांनी वेतन निश्चितीसाठी लागणारी आवश्यक ती माहिती, संबंधित शासकीय कर्मचा-याने पूर्वी ज्या कार्यालय प्रमुखांकडे सेवा केली असेल त्यांच्याकडून मागवावी व वेतन निश्चिती करावी.

३. सुधारित वेतन संरचनेत प्रारंभिक वेतन निश्चित करण्याबाबतचे विवरणपत्र (जोडपत्र एक) यासोबत जोडण्यात आले आहे. त्यानुसार विहित नमुन्यातील वेतन निश्चितीबाबतचे विवरणपत्र तीन प्रतींत तयार करण्यात यावे. त्यातील एक प्रत शासकीय कर्मचा-यांच्या सेवापुस्तकात चिकटविण्यात यावी. दुसरी प्रत कार्यालयीन अभिलेखासाठी व तिसरी प्रत वेतन देयकाबरोबर उत्तर परिक्षणासाठी संबंधित अधिदान व लेखा अधिकारी / कोषागार अधिकारी यांना पाठविण्यात यावी.

महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम,२००९ मधील तरतुदींचा अर्थबोध अधिक स्पष्टपणे होण्यासाठी नियमांतील तरतुदींचे स्पष्टीकरण पुढे देण्यात आले आहे.

४. नियम १ ते ४ ... या नियमांतील तरतुदी स्वयंस्पष्ट आहेत.

५. नियम:५:- सुधारित वेतन संरचनेत वेतन काढणे:- विद्यमान श्रेणीत वेतन घेण्याचा विकल्प देणारे कर्मचारी वगळून इतर सर्व शासकीय कर्मचा-यांना सुधारित वेतन संरचनेत आणणे हा नियम ५ चा उद्देश आहे. जे कर्मचारी विद्यमान श्रेणी चालू ठेवण्याचा विकल्प देतील ते दिनांक १ जानेवारी २००९ रोजी देय महागाई वेतन व देय असलेल्या दराने महागाई भत्ता आणि असल्यास, इतर अनुज्ञेय भत्ते घेत राहतील आणि निवृत्तीवेतन इत्यादीकरिता महागाई वेतन व महागाई भत्ता उक्त दिनांकाला परिगणित केल्याच्या मर्यादेत वेतन म्हणून गणण्यात येईल. जर एखाद्या शासकीय कर्मचारी स्थायी पद कायमपणे धारण करीत असेल आणि एका वरच्या पदावर स्थानापन्न म्हणून काम करीत असेल किंवा तो जर प्रतिनियुक्ती इत्यादींवर नसता तर एक किंवा अधिक पदांवर स्थानापन्न म्हणून काम करीत राहीला असता, अशा वेळी त्याला एकाच श्रेणीबाबत विद्यमान श्रेणी चालू ठेवण्याचा विकल्प राहील. असा शासकीय कर्मचारी एका स्थायी पदास लागू असलेली किंवा स्थानापन्न पदांपैकी एका पदास लागू असलेली विद्यमान श्रेणी चालू ठेवू शकेल. इतर पदांच्या बाबतीत त्याला सुधारित वेतन संरचनेतच आणावे लागेल.

६. नियम ६ : विकल्प देणे.

६.१ या नियमामध्ये सुधारित वेतन संरचना स्विकारण्याचा विकल्प कोणत्या प्रकारे व कुठल्या प्राधिका-यास सादर करावा या विषयीची पध्दती विहित करण्यात आली आहे. सदर विकल्प नियमांच्या जोडपत्र-चार मधील विहित नमुन्यात व विहित कालावधीत, विकल्प सादर करण्याच्या दिवशी शासकीय कर्मचारी ज्या कार्यालय प्रमुखांकडे कार्यरत असेल त्याच्याकडे सादर करणे आवश्यक आहे. अशा प्रकारे विहित मुदतीत प्राप्त झालेले विकल्प, कार्यालय प्रमुख वेतन निश्‍चिती करण्यास सक्षम नसल्यास, वेतन निश्‍चितीसाठी योग्य त्या सक्षम प्राधिका-याकडे तात्काळ पाठविण्याची जबाबदारी कार्यालय प्रमुखाची राहील. जेथे, शासकीय कर्मचारी, या नियमांच्या प्रसिध्दीच्या दिनांकास भारताबाहेर असेल, त्यांच्या बाबतीत विकल्पाची मुदत, त्यांनी भारतात आपल्या पदाचा कार्यभार घेण्याच्या दिनांकापासून एक महिना इतकी असेल.

६.२ दिनांक १ जानेवारी २००६ ते या नियमांच्या प्रसिध्दीच्या दिनांकास म्हणजे २२ एप्रिल २००९ या कालावधीत सेवानिवृत्त झालेले कर्मचारीही विकल्प सादर करण्यास पात्र असतील.

६.३ विद्यमान श्रेणीतील वेतनवाढीच्या दिनांकास विकल्प दिलेल्या कर्मचा-यांच्या बाबतीत प्रस्तुत विकल्प हा विद्यमान श्रेणीतील नेहमीच्या वेतनवाढीच्या दिनांकास देणे आवश्यक आहे. आगाऊ वेतनवाढ ही नेहमीची वेतनवाढ नसल्यामुळे, त्या दिनांकास सुधारित वेतन संरचनेत येण्याचा विकल्प देता येणार नाही.

६.४ दिनांक १ जानेवारी २००६ नंतरच्या अद्याप नियमित न झालेल्या निलंबन कालावधीमध्ये येणा-या वेतनवाढीच्या दिनांकापासून सुधारित वेतन संरचनेत देण्याचा विकल्प देता येणार नाही.

६.५ विद्यमान श्रेणीतील वेतनवाढ दिनांक १ जानेवारी २००६ येत असलेल्या आणि दिनांक १ जानेवारी २००६ पासून सुधारित वेतन संरचनेत वेतन निश्‍चिती करण्याचा विकल्प दिलेल्या अथवा नियम ६(३) नुसार विकल्प दिल्याचे समजलेल्या कर्मचा-यांच्या बाबतीत शासकीय कर्मचा-यांची दिनांक १ जानेवारी २००६ रोजी अनुज्ञेय असलेली वेतनवाढ विद्यमान वेतनश्रेणीवर काढण्यात यावी व त्यानंतर नियम ७ मधील तरतूदी विचारात घेऊन सुधारित वेतन संरचनेत वेतन निश्‍चिती करण्यात यावी व त्यानंतर नियम ७ मधील

तरतुदी विचारात घेऊन सुधारित वेतन संरचनेत वेतन निश्चिती करण्यात यावी. त्यांना सुधारित वेतन संरचनेत पुढील वेतनवाढ दिनांक १ जुलै २००६ रोजी मंजूर करण्यात यावी.

## ७. नियम ७ : सुधारित वेतन संरचनेत प्रारंभिक वेतन निश्चित करणे.

७.१ हा नियम, दिनांक १ जानेवारी २००६ रोजी करावयाच्या सुधारित वेतन संरचनेतील प्रत्यक्ष वेतन निश्चिती संबंधात आहे. विद्यमान श्रेणीतील वेगवेगळया टप्प्यांवरील वेतनास नियमांच्या नियम – ७(एक) नुसार सुधारित वेतन संरचनेमध्ये देय असलेले वेतन दर्शविणारी विवरणपत्रे विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुखांच्या मार्गदर्शनासाठी या परिपत्रातील जोडपत्र-३ मध्ये देण्यात आली आहेत.

७.२ नियम ७(२) मधील तरतुदीचा लाभ ज्या प्रकरणी एखाद्या शासकीय कर्मचा-याने स्थायी पदाच्या बाबतीत सुधारित वेतन संरचनेची निवड केली आहे, परंतु स्थानापन्न पदाच्या बाबतीत विद्यमान वेतनश्रेणी चालू ठेवली आहे, त्या प्रकरणी अनुज्ञेय असणार नाही.

७.३ सुधारित वेतन संरचनेत वेतन निश्चिती करताना शासकीय कर्मचा-याचे वेतन, वेतन बँडच्या कमाल टप्प्याच्या पुढील रकमेवर निश्चित होत असल्यास त्याचे वेतन, वेतन बँडच्या कमाल टप्प्यावर निश्चित करण्यात यावे.

७.४ महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ च्या नियम ११ आणि १७ अनुसार मूळ वेतन संरक्षित करण्यासाठी मंजूर केलेले वैयक्तिक वेतन महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम,२००९ च्या नियम ७(१) च्या प्रयोजनार्थ मूळ वेतनाचा भाग म्हणून समजण्यात यावे आणि ते प्रारंभिक वेतनाच्या निश्चितीसाठी धरण्यात यावे.

७.५ नियम ७ खालील टीप १ नुसार शासकीय कर्मचारी दिनांक १ जानेवारी २००६ रोजी वेतन प्रदेय रजेवर असल्यास, त्यास दिनांक १ जानेवारी,२००६ किंवा विकल्पानुसार सुधारित वेतन संरचनेची निवड केल्याच्या दिनांकापासून सुधारित वेतन संरचनेत वेतन मिळू शकेल. परंतू, शासकीय कर्मचारी दिनांक १ जानेवारी २००६ पूर्वीच्या दिनांकापासून वेतन प्रदेय रजेवर असेल आणि प्रत्यक्ष सेवेत रुजू न होताच दिनांक १ जानेवारी २००६ नंतर सेवानिवृत्त झाला असेल, अशा कर्मचा-याच्या बाबतीत, तो रजेवर जाण्यापूर्वी घेत असलेल्या मूळ वेतनानुसार सुधारित वेतन संरचनेतील वेतन निश्चिती नियम ७ नुसार करण्यात यावी. त्याला महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ च्या नियम ३६ व ३९ अथवा महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन)नियम,२००९ च्या नियम १० अन्वये वेतनवाढ मिळणार नाही.

७.६ नियम ७(१)(अ)(एक) नुसार दिनांक १ जानेवारी २००६ रोजी सुधारित वेतन संरचनेतील वेतननिश्चिती, दिनांक १ जानेवारी २००६ रोजी विद्यमान श्रेणीत वेतन घेत असलेल्या मूळ वेतनास १.८६ ने गुणून व येणारी रक्कम पुढील १० च्या पटीत घेऊन करण्यात यावी. मात्र, १.८६ ने गुणून येणारी रक्कम १० च्या पटीत असल्यास त्या रकमेवरच वेतन निश्चिती करण्यात यावी; अशा प्रकारची पुढील १० च्या पटीतील रक्कम विचारात घेण्याची आवश्यकता नाही.

| उदा.१ | दिनांक १.१.२००६ रोजी सुधारित वेतन संरचनेत प्रारंभिक वेतन निश्चिती. (रक्कम रुपयांत) | |
|---|---|---|
| १. | विद्यमान वेतनश्रेणी ... | ५५०० - १७५ - ९००० |
| २. | अनुज्ञेय सुधारित वेतन संरचना ... | पीबी-२ वेतन बँड ९३०० - ३४८०० व ग्रेड वेतन ४३०० |
| ३. | दिनांक १ जानेवारी २००६ रोजी विद्यमान वेतन श्रेणीतील मूळ वेतन (महागाई वेतनाशिवाय) | ६२०० |
| ४. | मूळ वेतनास १.८६ ने गुणून येणारे वेतन.. | ६२००×१.८६= ११५३२ (पुढील १० च्या पटीतील वेतन ११५४०) |
| ५. | वेतन बँड (पीबी-२)मधील वेतन.. | ११५४० |
| ६. | विद्यमान वेतनश्रेणीतस अनुज्ञेय ग्रेड वेतन.. | ४३०० |
| ७. | सुधारित वेतन संरचनेतील मूळ वेतन.. (वेतन बँड मधील वेतन + ग्रेड वेतन) | १५८४० |

| उदा.२. | | |
|---|---|---|
| १. | विद्यमान वेतनश्रेणी. .... | ४५०० - १२५ - ७००० |
| २. | अनुज्ञेय सुधारित वेतन संरचना | पीबी-१ वेतन बँड ५२००-२०२०० व ग्रेड वेतन २८०० |
| ३. | दिनांक १ जानेवारी २००६ रोजी विद्यमान वेतन श्रेणीतील मूळ वेतन (महागाई वेतनाशिवाय) | ५००० |
| ४. | मूळ वेतनास १.८६ ने गुणून येणारे वेतन.. | ५००० × १.८६ = ९३०० (सदर रक्कम १० च्या पटीत असल्यामुळे, अशा प्रकरणी पुढील १० च्या पटीतील रक्कम विचारात घेऊ नये.) |
| ५. | वेतन बँड (पीबी-२)मधील वेतन.. | ९३०० |
| ६. | विद्यमान वेतनश्रेणीतस अनुज्ञेय ग्रेड वेतन.. | २८०० |
| ७. | सुधारित वेतन संरचनेतील मूळ वेतन.. (वेतन बँड मधील वेतन + ग्रेड वेतन) | १२१०० |

७.७ नियम ७ च्या पोटनियम (१)(अ)(ii) च्या परंतुकामध्ये विद्यमानश्रेणीत सलग दोनपेक्षा अधिक टप्प्यांवर वेतन घेणा-या ज्या कर्मचा-यांना सुधारित वेतनश्रेणीत एकच वेतन देय होते( वेतने एकवटतात), त्यांच्या बाबतीत अशी एकवटता दूर करण्यासाठी विद्यमान वेतनश्रेणीतील एकवटणा-या प्रत्येक दोन टप्प्यांसाठी सुधारित वेतन बँडमध्ये एक वेतनवाढ देण्याची तरतुद करण्यात आली आहे. सोबतच्या जोडपत्र तीन मधील विवरणपत्रे तयार करताना लागू असेल तेथे ही तरतुद विचारात घेण्यात आली आहे.

७.८. दिनांक १ जानेवरी २००६ रोजी किंवा त्यानंतर सेवेत नियुक्त झालेले किंवा त्या दिनांकास किंवा त्यानंतर पदोन्नतीमुळे बदली होऊन दुस-या पदावर नियुक्त झालेले शासकीय कर्मचारी या नियमांच्या नियम ५ खालील परंतुकान्वये अनुज्ञेय असलेला विद्यमान वेतनश्रेणी ठेवण्याबाबतचा विकल्प देण्यास पात्र नाहीत. ते फक्त सुधारित वेतन संरचनेतच वेतन घेण्यास पात्र राहतील. अशा काही प्रकरणी सुधारित वेतन संरचनेमध्ये पूर्वलक्षी प्रभावाने वेतननिश्चिती केल्यामुळे वित्तलब्धीमध्ये घट होण्याची शक्यता आहे. सुधारित वेतन संरचना पूर्वलक्षी प्रभावाने लागू केल्यामुळे होणारे प्रतिकूल परिणाम टाळण्याच्या दृष्टीने अशा प्रकरणी,

वेतनश्रेणी सुधारल्याच्या आदेशाच्या दिनांकाला विद्यमान वेतनश्रेणीमध्ये प्रत्यक्षात घेतलेली विद्यमान वित्तलब्धी आणि सुधारित वित्तलब्धी यामधील फरक वैयक्तिक वेतन म्हणून देण्यात यावे आणि वेतनाच्या पुढील वाढीमध्ये ते सामावून घेण्यात यावे.

७.९ शासकीय कर्मचा-याने १ जानेवारी २००६ ते महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम,२००९ अधिसूचित होण्याच्या दिनांका दरम्यान महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम,१९८१ च्या नियम ११ अन्वये वेतन निश्चितीसाठी विकल्प दिला असल्यास संबंधित कर्मचा-यास सुधारित विकल्प देण्यास मुभा राहील. दिनांक १ जानेवारी २००६ पूर्वी कर्मचा-यास पदोन्नती अथवा सेवांतर्गत आश्र्वासित प्रगती योजनेचा लाभ मिळाल्यानंतर त्याने महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम ११(१)(दोन) किंवा (११)(२)(दोन) नुसार वेतन निश्चितीचा विकल्प दिला असेल आणि त्याचा निम्न पदावरील/निम्न वेतन श्रेणीतील वेतनवाढ दिनांक १ जानेवारी २००६ नंतर येत असेल तर अशा कर्मचा-यास सुध्दा सुधारित विकल्प देण्याची मुभा देण्यात यावी.

८. नियम ८: दिनांक १ जानेवारी २००६ रोजी व त्यानंतर सेवेत नव्याने नियुक्त झालेल्या कर्मचा-यांची सुधारित वेतन संरचनेत वेतननिश्चिती:

दिनांक १ जानेवारी २००६ रोजी व त्यानंतर सेवेत नियुक्त झालेले कर्मचारी केवळ सुधारित वेतन संरचनेत वेतन घेण्यास पात्र राहतील. आता स्विकृत केलेल्या वेतन बँड आणि ग्रेड वेतनाच्या सुधारित वेतन संरचनेच्या संकल्पनेत विविध विद्यमान वेतनश्रेणींसाठी (जी सुधारित वेतन संरचना लागू झाल्यानंतर विद्यमान वेतनश्रेणीच्या संबंधित ग्रेड वेतनाने ओळखले जाईल) एकच वेतन बँड विहित केला असल्यामुळे विद्यमान वेगवेगळया वेतनश्रेणीतीत नव्याने नियुक्ती झालेल्या कर्मचा-यांच्या वेतननिश्चितीची पध्दती समजून घेणे आवश्यक आहे. एखाद्या कर्मचा-याची संबंधित वेतन बँड मधील सर्वात कमी विद्यमान वेतनश्रेणी (उदा. पीबी-२ वेतन बँडमधील रुपये ५०००-८००० किंवा पीबी-३ वेतन बँडमधील रुपये ८०००-१३५०० ही विद्यमान वेतनश्रेणी) नियुक्ती झाली असेल, त्यावेळेस त्याचे वेतन बँडमधील वेतन संबंधित वेतन बँडच्या किमान टप्प्यावर (वरील प्रकरणी अनुक्रमे रुपये ९३०० व १५६००) निश्चित करता येईल. तथापि, वेतन बँडमधील विद्यमान वेतन श्रेणीतील सर्वात कमी वेतनश्रेणी ऐवजी अन्य वरच्या वेतन श्रेणीत नियुक्ती झाल्यास, अशा प्रकरणी वेतन बँडमध्ये निश्चित केलेले वेतन (वेतन बँडच्या किमान वेतनापेक्षा) वेगळे असणे आवश्यक आहे आणि ते ज्या पदावर नियुक्ती झाली असेल त्या पदाच्या ग्रेड वेतनावरुन ओळखता येईल. अशा कर्मचा-यांचे नवीन नियुक्तीच्या वेळेचे प्रारंभिक वेतन परिगणित करुन नियमांच्या जोडपत्र तीन मध्ये देण्यात आले आहे.

| उदा. सेवेत नव्याने नियुक्त झालेल्या कर्मचा-यांची सुधारित वेतन संरचनेत प्रारंभिक वेतन निश्चिती. (रक्कम रुपयांत) | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र | तपशील | सेवेत नवीन नियुक्त कर्मचारी -अ | सेवेत नवीन नियुक्त कर्मचारी-ब |
| १ | असुधारित वेतनश्रेणी .... | ५००० - १५० - ८००० | ६५०० - २०० - १०५०० |
| २ | कर्मचा-याच्या नवीन नियुक्तीच्या वेळेचा वेतन बँड | पीबी-२ : ९३०० -३४८०० | पीबी-२: ९३०० - ३४८०० |
| ३ | अनुज्ञेय वेतन | ४२०० | ४४०० |
| ४ | वेतन बँडमधील वेतन. (पहा: नियमाच्या जोडपत्र - तीन मधील तक्ता ३) | ९३०० | १०९०० |
| ५ | सुधारित वेतन संरचनेतील मूळ वेतन (वरील अ.क्र.३ + ४ ) | १३५०० | १५३०० |

९.   नियम ९:सुधारित वेतन संरचनेतील वेतनवाढीचा दर :

या नियमातील तरतुदी स्वयंस्पष्ट आहेत. तथापि, वेतनवाढीची परिगणना केलेली रक्कम पुढील १0च्या पटीत घेताना, वरील परिच्छेद ७.६ मधील स्पष्टीकरण विचारात घ्यावे.

उदा.

(रक्कम रुपयांत)

| | | |
|---|---|---|
| १ | वेतन बँड ... . ... | पीबी – १ : ५२00 – २0२00 |
| २ | वेतन वाढीपूर्वी वेतन बँडमधील वेतन .. ... | ६६00 |
| ३ | ग्रेड वेतन .. .. .. | २४00 |
| ४ | वेतन बँडमधील वेतन आणि ग्रेड वेतनाची बेरीज (वरील अ.क्र. २ + ३) | ९000 |
| ५ | वेतनवाढीची रक्कम (वरील अ.क्र.४ मधील रक्कमेच्या ३ टक्के ) | २७0 (ही रक्कम १0 च्या पटीत असल्याने पुढील १0 च्या पटीत रक्कम घेण्याची आवश्यकता नाही.) |
| ६ | वेतनवाढीनंतर वेतन बँडमधील वेतन (वरील अ.क्र. २ + ५) | ६६00 + २७0 = ६८७0 |
| ७ | वेतनवाढीनंतर सुधारित वेतन संरचनेतील मूळ वेतन [(वेतन बँडमधील वेतन (वरील अ.क्र.६ ) + ग्रेड वेतन (वरील अ.क्र.२)] | ६८७0 + २४00 = ९२७0 |

१0.   नियम–१0   सुधारित वेतन संरचनेमध्ये पुढील वेतनवाढीचा दिनांक.

सुधारित वेतन संरचनेमध्ये पुढील वेतनवाढ कशाप्रकारे विनियमित करावी याची पध्दती या नियमामध्ये विहित केली आहे. या नियमाच्या मुख्य भागाच्या अंमलबजावणीमुळे निर्माण होणारी कनिष्ठ कर्मचा–याने वरिष्ठ कर्मचा–यापेक्षा जास्त वेतन घेणे,ही त्रुटी दूर करणे तसेच विद्यमान वेतनश्रेणीत दिनांक १ जानेवारी २00६ रोजी एक वर्षाहून अधिक काळ कमाल वेतन घेणारे शासकीय कर्मचारी आणि विद्यमान वेतनश्रेणीत कमाल टप्प्यावर कुंठीत झालेले कर्मचारी अशांची काळजी घेणे हे या नियमातील तरतुदीचे उद्दीष्ट आहे.

या नियमानुसार दिनांक १ जुलै २00६ रोजी देय वेतनवाढ तसेच त्यापुढील वेतनवाढी महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम,१९८१ च्या नियम ३६ व ३९ मधील तरतुदींच्या अधीन राहतील.

११.   नियम–११ दिनांक १ जानेवारी २00६ च्या नंतर सुधारित वेतन संरचनेत वेतन निश्चिती.

या नियमातील तरतुदी स्वयंस्पष्ट आहेत. तथापि, खालील उदाहरण या नियमातील तरतुदींचे आकलन होण्यास उपयुक्त ठरेल.

| उदा. | | ( रक्कम रुपयांत ) |
|---|---|---|
| १ | विद्यमान वेतनश्रेणी .. .. | ३२०० - ८५ - ४९०० + विशेष वेतन ५०० |
| २ | सुधारित वेतन संरचना .. .. | वेतन बँड पीबी-१ : ५२००- २०२०० + ग्रेड वेतन- २००० |
| ३ | दिनांक १ जानेवारी २००६ रोजी अनुज्ञेय महागाई भत्ता (२१ टक्के) | ११६९ |
| ४ | वेतनवाढीचा दिनांक .. .. | १ मार्च २००६ |
| ५ | नियमित वेतनवाढ दिल्यानंतर वेतनवाढीच्या दिनांकास ( दिनांक १ मार्च २००६ ) विद्यमान मूळ वेतन | ३७१० |
| ६ | दिनांक १ मार्च २००६ रोजी विद्यमान वेतनश्रेणीतील महागाई वेतन (वरील अ.क्र.५ च्या ५० टक्के ) | १८५५ |
| ७ | सुधारित वेतन संरचना स्विकृतीचा दिनांक | दिनांक १ मार्च २००६ |
| ८ | दिनांक १ मार्च २००६ रोजी वेतन बँडमधील वेतन [( दिनांक १ मार्च २००६ रोजी विद्यमान मूळ वेतन ( वरील अ.क्र.५) + दिनांक १ मार्च २००६ रोजी विद्यमान वेतनश्रेणीतील महागाई वेतन ( वरील अक्र. ६ ) + दिनांक १ जानेवारी २००६ रोजी अनुज्ञेय महागाई भत्ता ( अ.क्र.५+ ६ च्या २१ टक्के )] | ३७१० + १८५५ + ११६९ = ६७२४ म्हणजेच ६७३० ( पुढील १० च्या पटीतील रक्कम ) |
| ९ | सुधारित वेतन संरचनेतील मूळ वेतन [ वेतन बँडमधील वेतन. ( वरील अ.क्र.८ )+ ग्रेड वेतन ] | ६७३० + २००० = ८७३० |
| १० | सुधारित वेतन संरचनेतील पुढील वेतनवाढीचा दिनांक .... | दिनांक १ जुलै २००७. |

टीप. १- नियम ७(१)(ब) आणि (क) मध्ये नमूद केल्याप्रमाणे विशेष वेतन / भत्ता किंवा कोणतेही नामाभिधान असलेले विशेष वेतन सुधारित वेतन संरचनेत वेतन निश्चिती करताना विचारात घेऊ नये.
२.- सदर विकल्प स्विकारल्यामुळे १ जुलै २००६ ची वेतनवाढ अनुज्ञेय होणार नाही.

## १२. नियम - १२ आणि १३ : दिनांक१ जानेवारी २००६ पूर्वी धारण केलेल्या पदावर त्या दिनांका नंतर पुनर्नियुक्ती झाल्यानंतर वेतन निश्चिती आणि १ जानेवारी २००६ रोजी व त्यानंतर पदोन्नती झाल्यानंतर वेतननिश्चिती.

या नियमांतील तरतुदी स्वयंस्पष्ट आहेत. तथापि, नियमांनुसार परिगणित केलेली रक्कम पुढील १० च्या पटीत घेताना वरील परिच्छेद ७.६ मध्ये दिलेले स्पष्टीकरण विचारात घेण्यात यावे.

**दिनांक १ जानेवारी २००६ अथवा त्यानंतर पदोन्नती मिळाल्यास वेतन संरचनेत वेतन निश्चिती.**

| उदा. १. | | (रक्कम रुपयांत ) |
|---|---|---|
| १ | पदोन्नतीपूर्वीची वेतन संरचना | पीबी-२: ९३०० - ३४८०० + ग्रेड वेतन ४४०० |
| २ | पदोन्नतीपूर्वीचे वेतन बँड मधील वेतन | १५८१० |
| ३ | पदोन्नतीपूर्वीचे मूळ वेतन ( वेतन बँडमधील वेतन + ग्रेड वेतन ) | १५८१० + ४४०० = २०२१० |
| ४ | पदोन्नतीचा दिनांक | ११ एप्रिल २००६ |
| ५ | पदोन्नतीच्या पदावरील वेतन निश्चितीच्या विकल्पाचा दिनांक | ११ एप्रिल २००६ |
| ६ | पदोन्नतीच्या पदाची वेतन संरचना | पीबी-२ : ९३०० - ३४८०० + ग्रेड वेतन ४६०० |
| ७ | वेतनवाढीची रक्कम ( अ.क्र.३ च्या ३टक्के ) | ६०६.३० म्हणजेच ६१० ( पुढील १० च्या पटीतील रक्कम ) |
| ८ | पदोन्नतीच्या पदाच्या वेतन बँड मधील वेतन ( अ.क्र.२ +अ.क्र.७) | १५८१० + ६१० = १६४२० |
| ९ | पदोन्नतीनंतरचे मूळ वेतन(अ.क्र.८ + पदोन्नतीच्या पदाचे ग्रेड वेतन) | १६४२० + ४६०० = २१०२० |
| १० | पुढील वेतनवाढीचा दिनांक | १ जुलै २००७ |
| ११ | वेतनवाढीनंतर म्हणजे दिनांक १ जुलै २००७ रोजी मूळ वेतन [(अ.क्र. ८ + अ.क्र.९ च्या ३ टक्के ) + पदोन्नतीच्या पदाचे ग्रेड वेतन ] | १६४२० + ६४० = १७०६० ( वेतन बँड मधील वेतन + ४६०० ( ग्रेड वेतन ) = २१६६० |

**टीप : सदर विकल्प स्विकारल्यामुळे १ जुलै २००६ ची वेतनवाढ अनुज्ञेय होणार नाही.**

| उदा.२. | | (रक्कम रुपयांत) |
|---|---|---|
| १ | पदोन्नतीपूर्वीची वेतन संरचना | पीबी-१: ५२००-२०२००+ ग्रेड वेतन २८०० |
| २ | पदोन्नतीपूर्वीचे वेतन बँडमधील वेतन | १०२०० |
| ३ | पदोन्नतीपूर्वीचे मूळ वेतन (वेतन बँडमधील वेतन+ ग्रेड वेतन) | १०२०० +२८०० = १३००० |
| ४ | पदोन्नतीचा दिनांक | १७ मे २००६ |
| ५ | सुधारित वेतन संरचनेत वेतनवाढीचा दिनांक | १ जुलै २००६ |
| ६ | पदोन्नतीच्या पदावरील वेतन निश्चितीच्या विकल्पाचा दिनांक | १ जुलै २००६ |
| ७ | पदोन्नतीच्या पदाची वेतन संरचना | पीबी-२ : ९३००-३४८००+ ग्रेड वेतन ४२०० |
| ८ | पदोन्नतीच्या दिनांकास (दि.१७ मे २००६) वेतन निश्चिती | |
| | अ) अनुज्ञेय वेतन बँड (अ.क्र.१ प्रमाणे) | पीबी-१: ५२००-२०२०० |
| | ब) वेतन बँड मधील वेतन (अ.क्र.२ प्रमाणे) | १०२०० |
| | क) अनुज्ञेय ग्रेड वेतन (अ.क्र.७ प्रमाणे) | ४२०० |
| | ड) मूळ वेतन (ब + क) | १४४०० |
| ९ | विकल्पानुसार दिनांक १ जुलै २००६ रोजी वेतन निश्चिती | |
| | अ) नियमित वेतनवाढीनंतर वेतन बँडमधील वेतन (अ.क्र.२ + अ.क्र.३ च्या ३ टक्के) | १०२०० + ३९० = १०५९० |
| | ब) पदोन्नतीच्या अनुषंगाने अनुज्ञेय वेतनवाढ (अ +२८०० च्या ३ टक्के) | (१०५९०+२८००) च्या ३ टक्के = ४१० |
| | क) अनुज्ञेय वेतन बँड व ग्रेड वेतन (अ.क्र.७ प्रमाणे) | पीबी -२: ९३०० - ३४८००+ ग्रेड वेतन ४२०० |
| | ड) वेतन बँड मधील वेतन (अ + ब) | १०५९० + ४१० = ११००० |
| | इ) मूळ वेतन (ड + ग्रेड वेतन) | ११००० +४२०० =१५२०० |
| १० | पुढील वेतनवाढीचा दिनांक .. .. .. | १ जुलै २००७ |
| ११ | वेतनवाढीनंतर म्हणजेच दिनांक १ जुलै २००७ रोजी मूळ वेतन (अ.क्र.९(ड) + अ.क्र.९(इ) च्या ३ टक्के)+ पदोन्नतीच्या पदाचे ग्रेड वेतन | ११००० +४६० = ११४६० (वेतन बँडमधील वेतन) +४२०० (ग्रेड वेतन) = १५६६० |

| उदा. ३ | | (रक्कम रुपयांत) |
|---|---|---|
| १ | पदोन्नतीपूर्वीची वेतन संरचना ... .... | पीबी-२: ९३०० - ३४८०० + ग्रेड वेतन ४४०० |
| २ | पदोन्नतीपूर्वीचे वेतन बँडमधील वेतन .. ... | १५८१० |
| ३ | पदोन्नतीपूर्वीचे मूळ वेतन (वेतन बँड मधील वेतन + ग्रेड वेतन) | १५८१० + ४४०० = २०२१० |
| ४ | पदोन्नतीचा दिनांक ... ... .... | ११ सप्टेंबर,२००६ |
| ५ | पदोन्नतीच्या पदावरील वेतन निश्चितीच्या विकल्पाचा दिनांक | ११ सप्टेंबर,२००६ |
| ६ | पदोन्नतीच्या पदाची वेतन संरचना | पीबी-२: ९३०० - ३४८०० + ग्रेड वेतन ४६०० |
| ७ | वेतनवाढीची रक्कम (अ.क्र.३ च्या ३ टक्के) | ६०६.३० म्हणजेच ६१० (पुढील १० च्या पटीतील रक्कम) |
| ८ | पदोन्नतीच्या पदाच्या वेतन बँड मधील वेतन (अ.क्र.२ + अ.क्र.७) | १५८१० + ६१० = १६४२० |
| ९ | पदोन्नतीनंतरचे मूळ वेतन (अ.क्र.८ + पदोन्नतीच्या पदाचे ग्रेड वेतन) | १६४२० + ४६०० = २१०२० |
| १० | पुढील वेतनवाढीचा दिनांक .. .. .. | १ जुलै २००७ |
| ११ | वेतनवाढीनंतर म्हणजेच दिनांक १ जुलै २००७ रोजी मूळ वेतन [(अ.क्र.८ + अ.क्र.९ च्या ३ टक्के )+ पदोन्नतीच्या पदाचे ग्रेड वेतन] | १६४२० + ६४० = १७०६० (वेतन बँड मधील वेतन + ४६००(ग्रेड वेतन) = २१६६० |

**१३. नियम १४- दिनांक १ जानेवारी २००६ पूर्वी कालबध्द पदान्नती योजना/सेवांतर्गत प्रगती योजनेचा लाभ मिळालेल्या कर्मचा-यांची वेतन निश्चिती:-**

**या नियमातील तरतुदी स्वयंस्पष्ट आहेत. तथापि, खालील उदाहरण या नियमातील तरतुदींचे आकलन होण्यास उपयुक्त ठरेल.**

उदा.

(अ) चौथ्या वेतन आयोगातंर्गत रुपये ९५० – १५०० या वेतनश्रेणीमध्ये वेतन घेणा–या कर्मचा–यास दिनांक १.१.१९९६ पूर्वी कालबध्द पदोन्नतीचा लाभ मिळाला आहे तथापि प्रत्यक्ष पदोन्नती मिळाली नाही. तसेच पदोन्नतीच्या पदाची वेतनश्रेणी रुपये १२०० –२०४० अशी होती. रुपये ९५० – १५०० व रुपये १२०० – २०४० या वेतनश्रेणींसाठी पाचव्या वेतन आयोगात अनुक्रमे रुपये ३०५०–४५९० आणि रुपये ४००० – ६००० अशा वेतनश्रेणी मंजूर करण्यात आलेल्या आहेत. चौथ्या वेतन आयोगातील रुपये ९५० – १५०० या वेतनश्रेणी करिता ( किंवा पाचव्या वेतन आयोगातील रुपये ३०५० – ४५६० या वेतनश्रेणीकरिता) सहाव्या वेतन आयोगांतर्गत पीबी –१ वेतन बँड रु. १९०० ग्रेड वेतन अनुज्ञेय होईल व रुपये १२०० – २०४० या वेतनश्रेणीकरिता ( किंवा पाचव्या वेतनआयोगातील रुपये ४००० – ६००० या वेतनश्रेणीकरिता) सहाव्या वेतन आयोगांतर्गत पीबी–१ वेतन बँड रुपये २४०० ग्रेड वेतन अनुज्ञेय होईल. सुधारित वेतन संरचनेत दिनांक १.१.२००६ रोजी व त्यानंतर वेतननिश्चिती करताना त्या कर्मचा–यास पीबी–१ वेतन बँड ( कालबध्द पदोन्नती योजनेअंतर्गत मिळालेल्या रुपये १२०० – २०४० या प्रत्यक्ष पदोन्नतीच्या वेतनश्रेणीला अनुज्ञेय असलेला) आणि रुपये १९०० + २५०(२४०० – १९०० = ५०० च्या ५० टक्के अथवा रुपये १०० यापैकी जे जास्त असेल ते म्हणजेच रुपये २५०) म्हणजेच रुपये २१५० इतके ग्रेड वेतन अनुज्ञेय होईल.

(ब) पाचव्या वेतन आयोगानुसार रुपये २७५० – ४४०० या वेतनश्रेणीत वेतन घेणा–या कर्मचा–यास दिनांक १.१.१९९६ नंतर कालबध्द पदोन्नती योजना/सेवांतर्गत आश्र्वासित प्रगति योजनेचा लाभ मिळाला असल्यास त्यांना समजा, पदोन्नतीच्या पदाची रुपये ३०५० – ४५९० ही वेतनश्रेणी लागू होईल. रुपये २७५० – ४००० व रुपये ३०५० –४५९० या वेतनश्रेणींना सहाव्या वेतन आयोगानुसार अनुक्रमे पीबी–१ वेतन बँड + १८०० ग्रेड वेतन आणि पीबी –१ + रुपये १९०० ग्रेड वेतन अनुज्ञेय होईल. सुधारित वेतन संरचनेत दिनांक १.१.२००६ रोजी व त्यानंतर वेतननिश्चिती करताना संबंधित कर्मचा–यास पीबी–१ वेतन बँड ( कालबध्द पदान्नती योजना/ सेवांतर्गत आश्र्वासित प्रगती योजनेंतर्गत मिळालेल्या रुपये ३०५० – ४५९० या प्रत्यक्ष पदोन्नतीच्या पदास अनुज्ञेय असलेला) आणि रुपये १८०० + (१९०० – १८०० = १०० च्या ५० टक्के किमान १०० रुपयेच्या अधिन) रुपये १०० म्हणजे रुपये १९०० इतके ग्रेड वेतन अनुज्ञेय होईल.

(क) पाचव्या वेतन आयोगानुसार रुपये ४५०० – ७००० या वेतनश्रेणीत वेतन घेणा–या कर्मचा–यास समजा, दिनांक १.१.१९९६ नंतर कालबध्द पदोन्नती योजना/सेवांतर्गत आश्र्वासीत प्रगती योजनेतर्गत पदोन्नतीच्या पदाची रुपये ५००० – ८००० ही वेतनश्रेणी लागू होईल. या दोन्ही वेतनश्रेणींना सहाव्या वेतन आयोगानुसार अनुक्रमे पीबी–१ वेतन बँड + रुपये २८०० ग्रेड वेतन आणि पीबी–२ + रुपये ४२०० ग्रेड वेतन अनुज्ञेय होईल. सुधारित वेतन संरचनेत दिनांक १.१.२००६ रोजी व त्यानंतर वेतननिश्चिती करताना संबंधित कर्मचा–यास पीबी–२ वेतन बँड ( कालबध्द पदोन्नती योजना/सेवांतर्गत आश्र्वासित प्रगती योजनेंतर्गत मिळालेल्या रुपये ५००० – ८००० या प्रत्यक्ष पदोन्नतीच्या पदास अनुज्ञेय असलेला वेतन बँड) आणि रुपये २८०० +(४२०० – २८०० = १४०० च्या ५० टक्के) रुपये ७०० म्हणजे रुपये ३५०० इतके ग्रेड वेतन अनुज्ञेय होईल.

.

.

विश्राम.

(ड) पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नसलेल्या व चौथ्या वेतन आयोगानुसार रुपये ९५० - १५०० या वेतनश्रेणीत वेतन घेणा-या कर्मचा-यास दिनांक १.१.१९९६ पूर्वी कालबध्द पदोन्नती योजनेंतर्गत रुपये १२०० - २०४० ही वेतनश्रेणी अनुज्ञेय होती. पाचव्या वेतन आयोगानुसार या वेतनश्रेणींना अनुक्रमे रुपये ३०५० - ४५९० आणि रुपये ४००० - ६००० या समकक्ष वेतनश्रेणी अनुज्ञेय ठरतात. चौथ्या वेतन आयोगातील रुपये ९५० - १५०० या वेतनश्रेणीकरिता ( पाचव्या वेतन आयोगातील रुपये ३०५० - ४५९० या वेतनश्रेणीकरिता) सहाव्या वेतन आयोगानुसार पीबी-१ वेतन बँड + रुपये १९०० ग्रेड वेतन अनुज्ञेय होईल. दिनांक १.१.२००६ व त्यानंतर सुधारित वेतन संरचनेत वेतननिश्चिती करताना सदर कर्मचा-यास पीबी-१ वेतन बँड ( कालबध्द पदोन्ती पूर्वी म्हणजे रुपये ९५० - १५०० या त्याच्या मूळ वेतनश्रेणीस अनुज्ञेय असलेला) आणि रुपये १९०० +२०० म्हणजेच रुपये २१०० ग्रेड वेतन देय होईल.

(इ) पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नसलेल्या व पाचव्या वेतन आयोगानुसार रुपये ३०५० -४५९० या वेतनश्रेणीत वेतन घेणा-या कर्मचा-यास दिनांक १.८.२००१ व त्यानंतर सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मिळाल्यास रुपये ३२०० - ४९०० ही वेतनश्रेणी अनुज्ञेय होते.पाचव्या वेतन आयोगातील रुपये ३०५० - ४५०० या वेतनश्रेणीकरिता सहाव्या वेतन आयोगानुसार पीबी-१ वेतन बँड + १९०० ग्रेड वेतन अनुज्ञेय होईल. सुधारित वेतन संरचनेत दिनांक १.१.२००६ रोजी व त्यानंतर वेतननिश्चिती करताना सदर कर्मचा-यास पीबी-१ वेतन बँड (सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मिळण्यापूर्वी रुपये ३०५०-४५९० या त्याच्या मूळ वेतनश्रेणीस अनुज्ञेय असलेला ) आणि रुपये १९०० +२०० म्हणजेच रुपये २१०० इतके ग्रेड वेतन अनुज्ञेय होईल.

१४. <u>नियम १५ वेतनाची थकबाकी प्रदान करण्याची पध्दती</u>.

१५.१ सुधारित वेतन संरचनेतील वेतन दिनांक १ एप्रिल २००९ पासून रोखीने देय आहे. दिनांक १ जानेवारी २००६ ते दिनांक ३१ मार्च २००९ पर्यन्तच्या कालावधीतील थकबाकी, शासन निर्णय वित्त विभाग, क्रमांक वेपुर १२०८/ प्र.क्र. ७२/सेवा-९, दिनांक ६ ऑक्टोबर,२००८ अन्वये मंजूर केलेल्या अग्रीमाची रक्कम समायोजित करुन पुढील ५ वर्षात ५ हप्त्यात संबंधित शासकीय कर्मचा-याच्या भविष्य निर्वाह निधी खात्यात जमा करावयाची आहे. या संदर्भातील तपशिलवार कार्यपध्दती खालीलप्रमाणे विहित करण्यात येत आहे.

(अ) दिनांक १ जानेवारी २००६ ते ३१ मार्च २००९ पर्यन्तच्या कालावधीसाठी ज्या प्रकरणी शासकीय कर्मचा-याने भविष्य निर्वाह निधी खात्यामध्ये अगोदरच दिलेली वर्गणी सुधारित वेतन संरचनेत निश्चित केलेल्या वेतनाच्या आधारे भविष्य निर्वाह निधी नियमांनुसार विहित केलेल्या किमान वर्गणीपेक्षा कमी पडत असेल तर ती थकबाकीच्या रकमेतून वसूल करण्यात यावी.

(ब) भविष्य निर्वाह निधी खात्यात जमा करावयाची थकबाकीची निव्वळ रक्कम खालील प्रमाणे रकमा वजा/ समायोजित करुन काढण्यात यावी:-

(१) वेतनाच्या सुधारित रकमेवर देय असलेली व्यवसाय कराची थकबाकीची रक्कम.

(२) शासकीय निवासस्थानामध्ये राहणा-या शासकीय कर्मचा-यांच्या बाबतीत सुधारित वेतनावर देय असणा-या अनुज्ञप्ती शुल्काची रक्कम;

(३) दिनांक १ जानेवारी २००६ ते दिनांक ३१ मार्च २००९ या कालावधीत शासकीय कर्मचा-यांकडून काही रक्कम देय असल्यास तिचे समायोजन.

(क) वेतनाच्या थकबाकीच्या जमा रकमेचा हिशेब ठेवण्यासाठी कर्मचा-यांना वेगळा खाते क्रमांक देण्यात येणार नाही. यासाठी वर्गणीदारास देण्यात आलेला पूर्वीचाच भविष्य निर्वाह निधी खाते क्रमांक उपयोगात आणला जाईल. ही रक्कम प्रत्यक्ष जमा केल्यापासून ५ वर्षापर्यन्त काढून घेता येणार नसल्यामुळे या रकमांचा हिशेब नियमित भविष्य निधी खात्यापासून वेगळा ठेवण्यात येईल.

उदा.: जर थकबाकीच्या पहिला हप्ता जून २००९ मध्ये भविष्य निर्वाह निधीत जमा करण्यात आला असेल तर ती रक्कम काढून घेण्याचा प्रतिबंधीत कालावधी दिनांक ३० जून २०१४ संपुष्टात येईल आणि त्यानंतर जमा करण्यात येणा-या हप्त्यांच्या बाबतीत देखील अशीच कार्यपध्दती राहील.

(ड) दिनांक १ जानेवारी २००६ ते दिनांक ३१ मार्च २००९ या कालावधीत सेवानिवृत्ति अथवा अन्य कोणत्याही कारणास्तव ज्या कर्मचा-यांच्या सेवा समाप्त झाल्या असतील, अशा कर्मचा-यांना दिनांक १ जानेवारी २००६ पासून ते सेवेत असलेल्या दिनांकापर्यन्तच्या कालावधीतील वेतनाची थकबाकी अनुज्ञेय असल्यास, सदर थकबाकी, वरील खंड (अ) व (ब) मध्ये नमूद केलेल्या रकमा वजा/ समायोजित करुन पाच समान हप्त्यात पाच वर्षात रोखीने अदा करण्यात यावी.

(इ) थकबाकीचा एक अथवा अधिक हप्ते भविष्य निर्वाह निधी खात्यात जमा केल्यानंतर सेवानिवृत्ती अथवा अन्य कारणास्तव सेवा समाप्त झालेल्या कर्मचा-यांच्या बाबतीत, थकबाकीची जमा झालेली रक्कम त्यांच्या नेहमीच्या भविष्य निर्वाह निधी वर्गणीच्या रकमेसोबत प्रचलित कार्यपध्दतीनुसार अदा करण्यात यावी. अशा प्रकरणी भविष्य निर्वाह निधीमध्ये जमा करावयाच्या बाकी असलेल्या हप्त्यांची रक्कम (असल्यास), वरील खंड (अ) व (ब) मध्ये नमूद केलेल्या रकमा वजा/ समायोजित करुन समान हप्त्यात उर्वरित वर्षात रोखीने अदा करण्यात यावी.

(फ) दिनांक १ जानेवारी २००६ ते दिनांक ३१ मार्च २००९ या कालावधीत मृत्यू झालेल्या कर्मचा-यांच्या बाबतीत त्याच्या मृत्यूच्या दिनांकापर्यन्तच्या कालावधीतील वेतनाच्या थकबाकीची रक्कम अनुज्ञेय असल्यास सदर थकबाकीची रक्कम वरील खंड (ब) मध्ये नमूद केलेल्या रकमा जमा वजा/ समायोजित करुन एकाच हप्त्यात त्याच्या कायदेशीर वारसास रोखीने अदा करण्यात यावी. त्याचप्रमाणे थकबाकीचा एक किंवा अधिक हप्ते भविष्य निर्वाह निधी खात्यात जमा केल्यानंतर मृत्यू पावलेल्या कर्मचा-यांच्या बाबतीत भविष्य निर्वाह निधीत जमा केलेली व जमा करावयाची बाकी असलेल्या हप्त्याची रक्कमही त्याच्या कायदेशीर वारसास वरील, खंड (ब) मध्ये नमूद केलेल्या रकमा वजा /समायोजित करुन एकाच हप्त्यात रोखीने अदा करण्यात यावी.

| उदा. | दि. १ जानेवारी २००६ ते दि. ३१ मार्च २००९ या कालावधीतील थकबाकीची रक्कम भविष्य निर्वाह निधी खात्यात जमा करणे. | |
|---|---|---|
| १ | थकबाकीची रक्कम | रुपये २५0000 |
| २ | अग्रीमाची रक्कम | रुपये २५000 |
| ३ | वरील खंड (अ) व (ब) नुसार वजा करावयाची रक्कम... | समजा, रुपये १५000 |
| ४ | थकबाकीची उर्वरित रक्कम (अ.क्र.१ - अ.क्र.२ - अ.क्र. ३) | रुपये २१0000 |
| ५ | वार्षिक हप्त्याची रक्कम (अ.क्र. ४ ÷ ५) ... | रुपये ४२000 |
| ६ | रुपये ४२,000 ही थकबाकीची रक्कम दरवर्षी भविष्य निर्वाह निधी खात्यामध्ये जून २00९, जून २0१0, जून २0११, जून २0१२ आणि जून २0१३ या पाच वर्षात जमा करण्यात यावी. | |
| ७ | एखादा कर्मचारी सन २00९ ते सन २0१३ या कालावधीत, समजा ऑगस्ट २0१0 मध्ये, थकबाकीची दोन हप्ते भविष्य निर्वाह निधी खात्यामध्ये जमा केल्यानंतर सेवानिवृत्त झाला तर, भविष्य निर्वाह निधी खात्यामध्ये जमा करावयाची बाकी असलेले थकबाकीचे तीन हप्ते सन २0११, २0१२, व २0१३ या वर्षात समान हप्त्यात रोखीने अदा करण्यात यावी. अशा प्रकरणी भविष्य निर्वाह निधी खात्यामध्ये अगोदरच जमा केलेली रक्कम त्यांना देय असलेल्या भविष्य निर्वाह निधीतील अन्य रकमेबरोबरच प्रचलित कार्यपध्दतीनुसार अदा करण्यात यावी. | |

१५.२ ज्या शासकीय कर्मचा-यांना परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजना लागू आहे अशा कर्मचा-यांच्या बाबतीत, थकबाकीची रक्कम त्यांच्या परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजनेच्या खात्यात जमा करण्यात यावी. मात्र, त्या रकमेवर शासनाचे अंशदान अनुज्ञेय असणार नाही.

१५.३ आहरण व संवितरण अधिका-यांने थकबाकीच्या हप्त्याची रक्कम सन २00९ पासून दरवर्षी जून महिन्यात भविष्य निर्वाह निधी खात्यामध्ये जमा करावी. भविष्य निर्वाह निधी खात्यामध्ये जमा करावयाची थकबाकीची रक्कम प्रत्यक्षात कोणत्याही दिनांकास जमा केली असली तरी, ज्यावर्षी थकबाकीची रक्कम भविष्य रक्कम भविष्य निर्वाह निधी खात्यामध्ये जमा करावयाची आहे; त्या वर्षाच्या १ जून पासून त्यावर व्याज देय राहील. थकबाकीच्या रकमेवर देय होणारे व्याज थकबाकी प्रमाणेच पाच वर्षापर्यन्त काढून घेता येणार नाही. म्हणजेच जून २00९ मध्ये जमा केलेल्या थकबाकीवरील व्याज दिनांक ३0 जून २0१४ पर्यन्त काढून घेता येणार नाही.

वर नमूद केल्याप्रमाणे भविष्य निर्वाह निधी खात्यामध्ये थकबाकीची रक्कम प्रत्यक्ष कोणत्याही दिनांकास जमा केली असली तरी, ज्यावर्षी थकबाकीची रक्कम भविष्य निर्वाह निधी खात्यामध्ये जमा करावयाची आहे त्या वर्षाच्या १ जून पासून त्यावर व्याज देय असल्याने थकबाकीची रक्कम भविष्य निर्वाह निधी खात्यामध्ये संबंधित वर्षात वेळीच जमा केली जाईल याची विभागप्रमुख/ कार्यालय प्रमुखांनी दक्षता घ्यावी. या संदर्भात विलंब झाल्यास त्याची गंभीर दखल घेण्यात येईल.

१५.४ राज्य शासकीय कर्मचा-यांना सुधारित वेतन संरचना मंजूर केल्यामुळे होणारा अतिरिक्त खर्च संबंधित कर्मचा-यांच्या वेतन व भत्त्यावरील खर्च ज्या लेखाशीर्षाखाली खर्ची घालण्यात येतो, त्याच लेखाशीर्षा खाली खर्ची घालण्यात यावा व त्या खालील मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा. सर्व विभाग प्रमुखांनी आपले अर्थसंकल्पीय अंदाज तयार करताना या निमित्ताने येणारा अरिरिक्त खर्च विचारात घ्यावा. ही तरतुद योग्य व त्या फेरफारांसह जिल्हा परिषदा व अनुदानाप्राप्त संस्थांना देखील लागू राहील.

१५.५ दिनांक १ जानेवारी २००६ पासून ३१ मार्च २००९ (दोन्ही दिवस धरुन) पर्यन्तच्या कालावधीतील वेतनाची थकबाकी संबंधित वर्षाच्या मे महिन्याच्या मासिक वेतन देयकाबरोबर काढण्यात यावी. आहरण व संवितरण अधिका-यांनी ज्यांचे वेतन आस्थापना देयकावर काढण्यात येते अशा कर्मचा-यांच्या बाबतीत त्या वेतन देयकात संबंधित वर्षाच्या थकबाकीच्या रकमेची एक वेगळी बाब म्हणून मागणी करावी आणि प्रत्येक शासकीय कर्मचा-याच्या भविष्य निर्वाह निधी खात्यामध्ये त्याच्या मासिक वर्गणीबरोबर वेगळी जमा करण्यात यावी. वेतन देयकाला जोडलेल्या विवरणपत्रात भविष्य निर्वाह निधी खात्यात जमा करावयाच्या थकबाकीच्या रकमेसह थकबाकीचा हप्ता क्रमांक स्पष्टपणे लाल शाईने दाखवावा. एका कार्यालयातून / विभागातून दुस-या कार्यालय/ विभागात बदली झालेल्या कर्मचा-यांच्या बाबतीत, भविष्य निर्वाह निधी खात्यामध्ये जमा करावयाच्या संबंधित वर्षाच्या थकबाकीच्या हप्त्याची रक्कम, कर्मचारी संबंधित वर्षाच्या दिनांक १ मे रोजी कार्यरत असलेल्या कार्यालयाने काढावी. दिनांक १ मे रोजी अन्य कार्यालयात प्रतिनियुक्तीवर असलेल्या कर्मचा-यांच्या बाबतीत प्रतिनियुक्तीवर जाण्यापूर्वी ज्या कार्यालयात संबंधित वर्षात कर्मचारी कार्यरत होता, त्या कार्यालयाने थकबाकीच्या हप्त्याची रक्कम भविष्य निर्वाह निधी खात्यात जमा करण्याबाबतची कार्यवाही करावी.

१५.६ पूर्व तपासणीच्या अभावी काही थकबाकी चुकीने परिगणित करण्यात येण्याची शक्यता आहे आणि ती अतिप्रदान म्हणून ठरल्यास त्याची नंतर वसुली करावी लागेल. आहरण व संवितरण अधिका-यांनी थकबाकीची रक्कम भविष्य निर्वाह निधी खात्यात जमा करताना त्यांच्या नियंत्रणाखालील शासकीय कर्मचा-यांना असे स्पष्ट करावे की, जमा करण्यात येणारी रक्कम , नंतर निदर्शनास येणा-या विसंगती लक्षात घेऊन त्यांच्याकडून देय होणारी रक्कम समायोजित करण्याच्या अधीन राहील. यासाठी प्रत्येक कर्मचा-याला सुधारित संरचनेतील वेतन प्रथम अदा करण्यात येईल त्यावेळी अथवा त्यानंतर या सोबतच्या जोडपत्र २ अनुसार असे लेखी वचन पत्र द्यावे की, वेतनाच्या निश्चितीमुळे काही जास्त रक्कम जमा झाली असे आढळून आल्यास ती भविष्यात देय होणा-या रकमेशी समायोजित करुन अथवा इतर प्रकारे शासनास परत करील.

१६. सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुखांनी या परिपत्रकाची प्रत कार्यालय सूचना फलकावर कर्मचा-यांच्या माहितीस्तव लावावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेतांक क्रमांक २००९०४२९१२४२१४००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने ,

विद्याधर कानडे,
प्रधान सचिव, (वित्त).

******

विवाम.

( शासन परिपत्रक, वित्त विभाग क्रमांक वेपुर १२०९/प्र.क्र.६९/सेवा ९ मंत्रालय, मुंबई ३२ दि. २९ एप्रिल,२००९ चे सहपत्र )
(Accompaniment to the Governmet Circular, Finance Department No. RPS 1209/CR 69/SER-9 dated the 29th April 2009)

**जोडपत्र – एक**
( पहा परिच्छेद ३)
Annexure – 1
(See para 3 )

**महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम,२०९ अन्वये दिनांक १ जानेवारी २००६ रोजी**
**वेतननिश्चितीसाठी नमुना**
Proforma for fixation of pay under
Maharashtra Civil Services ( Revised Pay) Rules 2009 as on 1st January 2006.

| | | |
|---|---|---|
| १. | शासकीय कर्मचा-याचे नाव | : |
| 1. | Name of the Government Servant | : |
| २. | दिनांक १.१.२०६ रोजी वेतननिश्चिती करावयाच्या पदाचे पदनाम | : |
| 2. | Designation of the post in which pay is to be fixed as on 1.1.2006. | : |
| ३. | दर्जा ( कायम/ स्थानापन्न ) | : |
| 3. | Status (Substantive /Officiating ) | |
| ४. | पदास लागू असलेली विद्यमान वेतनश्रेणी | : |
| 4. | Pre-revised scale(s) of pay applicable to the post | : |
| ५. | पदोन्नतीची संधी उपलब्ध असलेल्या पदावर दिनांक १.१.२००६ पूर्वी कालवध्द पदोन्नती योजना/आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मिळालेला आहे. तथापि, दिनांक १.१.२००६ पूर्वी प्रत्यक्ष पदोन्नती झाली नसल्यास, कालवध्द पदोन्नती योजना/आश्वासित प्रगती योजनेखाली मिळालेली वेतनश्रेणी. | : |
| 5. | Pay Scale sanctioned after receiving the benefit of TBP/ACP scheme before 1.1.206 on the post having Promotion opportunity, but not got actual promotion Before 1.1.2006. | : |
| ६. | पदोन्नतीची संधी उपलब्ध नसलेल्या पदावर किंवा एकाकी पदावर दिनांक १.१.२००६ पूर्वी कालवध्द पदोन्नती योजना/ आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मिळाला असल्यास, कालवध्द पदोन्नती योजना/ आश्वासित प्रगती योजनखाली मिळालेली वेतनश्रेणी. | : |
| 6. | Pay Scale sanctioned after receiving the benefit of TAB / ACP scheme before 1.1.2006 on the post having no promotion opportunity or isolated post. | : |
| ७. | दिनांक १.१.२००६ रोजी असलेली विद्यमान वित्तलब्धी– | : |
| 7. | Existing emoluments as on 1.1.2006:- | |
| | (अ) मूळ वेतन ( कुंठीत वेतनवाढीसह , असल्यास) | : |
| | (a) Basic Pay( including Staganation Increment, if any) | : |
| | (ब) महागाई वेतन | : |
| | (b) Dearness Pay | : |
| | (क) महागाई भत्ता | : |
| | (c) Dearness Allowance. | : |
| | (ड) एकूण विद्यमान वित्तलब्धी [(अ) ते (क)] | : |
| | (d) Total existing emoluments ( a) to (c) | : |
| ८. | अ.क्र.४ च्या समोर दर्शविलेल्या विद्यमान वेतनश्रेणीच्या अनुषंगाने सुधारित वेतन बँड आणि ग्रेड वेतन ( एचएजी + व त्यापेक्षा अधिक वेतनश्रेणीसाठी योग्य वेतनश्रेनी दर्शवावी) | : |

| | | |
|---|---|---|
| 8. | Revised pay band and grade pay corresponding to the pre-Revised scale shown at Sr.No. 4 above.( in the case of HAG † and above the appropriate scale may be mentioned ) | : |
| ९. | अ.क्र.५ च्या समोर दर्शविलेल्या विद्यमान वेतन श्रेणीच्या अनुषंगाने सुधारित वेतन बँड आणि ग्रेड वेतन. | : |
| 9. | Revised pay band and grade pay correponding to the pre-Revised scale shown at Sr. No. 5. | : |
| ९ | वरील अ.क्र.७(अ) मध्ये नमूद वेतनाच्या आधारावर जोडपत्र तीन मधील विवरणपत्रानुसार सुधारित वेतन बँड/श्रेणी मध्ये निश्चित होणारे वेतन. | : |
| 10. | Pay in the revised pay band/scale with reference to 7(a) above In which pay is to be fixed, as per Statement attached at Annexure III . | : |
| ११. | म.ना.से(सु.वे.)नियम २००९ # मधील नियम ४ नुसार वरील अ.क्र.४ समोरील वेतनश्रेणीस लागू असलेले ग्रेड वेतन | : |
| 11. | Grade pay to be applied in terms of Rule 4 of MCS(RP) Rules 2009 @ With reference to Sr. No. 4 above. | |
| १२. | म.ना.से. (सु.वे.) नियम २००९ # मधील नियम १४(२) नुसार लागू असलेले ग्रेड वेतन ( अ.क्र.९ आणि ८ मधील ग्रेड वेतनाच्या फरकाच्या ५० टक्के, किमान रुपये १००/-) | : |
| 12. | Grade pay applicable in terms of Rule 14(2) of MCS(RP) Rules, 2009 @ ( 50 % of difference between grade pay at Sr.No.9 & 8 subject to Minimum Rs. 100 .) | : |
| १३. | वरील क्र.६ च्या संदर्भात म.ना.से. ( सु.वे.) नियम २००९ # मधील नियम १४(३) नुसार लागू असलेले अतिरिक्त ग्रेस वेतन . | : |
| 13. | Additional Grade pay to be applied in terms of Rule 14 (3) of MCS (RP)Rules 2009 @ with reference to Sr. No. 6 above. | : |
| १४ | कनिष्ठ कर्मचा-याच्या सुधारित वेतनाच्या अनुषंगाने वाढविलेले सुधारित वेतन ( म.ना.से. (सु.वे.) नियम २००९ # मधील नियम ७(१) खालील टीप ५ आणि ७ ) लागू असल्यास, कनिष्ठ कर्मचा-याचे नाव आणि त्याचे निश्चित केलेले वेतनसुध्दा दर्शविण्यात यावे. | : |
| 14. | Stepped up pay with reference to the revised pay of Junior ( Note 5 & 7 of Rule 7(1) of MCS(RP)Rules 2009 @ ) if applicable, name and pay of the junior also to be indicated distinctly. | : |
| १५ | स्थानापन्न पदावरील वेतन निश्चितीनंतरचे वेतन कायम पदावरील वेतन निश्चितीनंतरच्या वेतनापेक्षा कमी असल्यास कायम पदावरील सुधारित वेतन [( म.ना.से. ( सू.वे.) नियम,२००९ # मधील नियम ७(२)] | : |
| 15. | Revised pay with reference to the subtantive pay in case where The pay ficed in the officiating post is lower than the pay Fixed in the substantive post, if applicable [ Rule 7(2) of MCS(RP) Rule 2009 @} | : |
| १६. | वैयक्तिक वेतन, असल्यास .. .. | : |
| 16. | Personal Pay, if any. .. .. | : |

.

१७. वेतन निश्चितीनंतरची सुधारित वित्तलब्धी :-
17. Revised amoluments after fixation of pay --

(अ) सुधारित वेतन बँड/वेतनश्रेणी मधील वेतन ( वरील अ.क्र.१० किंवा १४ किंवा १५ प्रमाणे जे लागू असेल ते ) :
(a) Pay in the Revised Pay Band/Pay scale (as per Sr.No. 10 or 14 or 15 above whichever is applicable :
(ब) ग्रेड वेतन ( वरील अ.क्र. ११ + १२ किंवा अ.क्र.११+ १३ जे लागू असेल ते ) :
(b) Grade Pay (Sr.No.11 + 12 or Sr. No. 11+13 whichever is applicable.) :
(क) विशेष वेतन, अनुज्ञेय असल्यास [म.ना.से. (सु.वे.)नियम २००९# मधील नियम ७ खालील पोटनियम (१) (क) ] :
(c) Special Pay, if admissile (Sub Rule (1)(c) of Rule 7 of MCS (RP) Rules 2009 @ :
(ड) वैयक्तिक वेतन, अनुज्ञेय असल्यास [म.ना.से. (सु.वे.)नियम २००९# मधील नियम ७ (१) खालील टीप ४ व ६ ] :
(d) Personal Pay , if admissible (see note 4 and 6 below Rule 7(1) of MCS (RP) Rules,2009 @ ) :

१८. पुढील वेतनवाढीचा दिनांक [म.ना.से. (सु.वे.)नियम २००९# मधील नियम ९ आणि १० )आणि वेतनवाढी नंतरचे वेतन.. :
18. Date of next increment [ Rule 9 & 10 of MCS(RP)Rules 2009 @ ] and pay after grant of increment :- :

| बाव क्रमांक<br>Item No. | वेतनवाढीचा दिनांक<br>Date of Increment | वेतनवाढी नंतरचे वेतन<br>Pay after increment | |
|---|---|---|---|
| | | वेतन बँड/वेतनश्रेणी मधील वेतन<br>Pay in the Pay Band/ Scale | ग्रेड वेतन (लागू असल्यास)<br>Grade Pay (Wherever applicable ) |
| i | ii | iii | iv |
| १.<br>1. | १ जुलै २००६<br>1st July 2006 | [अ.क्र.१७(अ)+अ.क्र.१७(अ) व (ब) यांच्या बेरजेच्या तीन टक्के ]<br>[Sr.No.17(a)+3% of sum of Sr.No.17(a) & (b) above] | [वरील अ.क्र.१७(ब)मध्ये दर्शविल्याप्रमाणे ]<br>[ As shown in Sr.No. 17(b) above] |
| २.<br>2 | १ जुलै २००७<br>1st july 2007 | [ बाव क्र.१ मधील स्तंभ क्र. iii + बाव क्र.१ मधील स्तंभ क्र. iii व iv यांच्या बेरजेच्या तीन टक्के ]<br>[ Column No. iii of item No. 1 + 3 % of sum of Column No. iii + iv of item No. 1 ] | [वरील अ.क्र.१७(ब) मध्ये दर्शविल्याप्रमाणे ]<br>[As shown in Sr.No. 17(b) above ] |

१९. इतर अनुषंगिक माहिती :
19 Any other relevant information. :

दिनांक : कार्यालय प्रमुखाचे पदनाम आणि स्वाक्षरी
Date Signature & Designation of Head Of Office.

..............................................................................................................................
vbm

( शासन परिपत्रक, वित्त विभाग क्रमांक वेपुर १२०९/प्र.क्र.६९/सेवा ९ मंत्रालय, मुंबई ३२ दि. २९ एप्रिल,२००९ चे सहपत्र )

(Accompaniment to the Governmet Circular, Finance Department No. RPS 1209/CR 69/SER-9 dated the 29th April 2009)

## जोडपत्र – दोन
(पहा परिच्छेद १५.६)

## Annexure – II
(See para 15.6 )

## वचनपत्र
## UNDERTAKING

मी असे वचन देतो की, चुकीच्या वेतननिश्चितीमुळे किंवा पुढे वेतननिश्चितीमध्ये विसंगती आढळून आल्यामुळे मला अतिप्रदान झाल्याचे निदर्शनास आल्यास ते भविष्यात मला प्रदान करण्यात येणा–या रकमेतून समायोजित करुन किंवा इतर प्रकारे मी शासनास परत करीन.

I , hereby undertake that any excess payment that may be found to have been made as a result of incorrect fixation of pay or pay excess payment detected in the light of dicrepancies noticed subsequently will be refunded by me to the Government either by adjustment against future payments due to me or otherwise.

दिनांक / Date

सही/Signature

ठिकाण / Place.

नाव /Name :

पदनाम /Designation :

क्क्क्क्क्क्क्

विवाम.
.

उदा.१ (अ) दि.१.१.२००६ रोजी धारण करीत असलेल्या पदावरील वेतननिश्चिती *(दिनांक १.१.२००६ पूर्वी कालबध्द पदान्नती /सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ न मिळालेले व मिळालेले कर्मचारी )* **तसेच**

(ब) दि.१.१.२००६ पूर्वी कालबध्द पदान्नती/सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मिळालेल्या व दिनांक १.१.२००६ पूर्वीच प्रत्यक्ष पदोन्नती मिळालेल्या कर्मचा-यांची वेतननिश्चिती.

जोडपत्र – एक
(पहा परिच्छेद ३)
Annexure – I
**(See para 3 )**
महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम,२०९ अन्वये दिनांक १ जानेवारी २००६ रोजी
वेतननिश्चितीसाठी नमुना

**Proforma afor fixation of pay under**
Maharashtra Civil Services ( Revised Pay) Rules 2009 as on 1st January 2006.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | शासकीय कर्मचा-याचे नाव | : | अ ब क |
| 1. | Name of the Government Servant | : | |
| २. | दिनांक १.१.२०६ रोजी वेतननिश्चिती करावयाच्या पदाचे पदनाम | : | लिपीक – टंकलेखक |
| 2. | Designation of the post in which pay is to be fixed as on 1.1.2006. | : | |
| ३. | दर्जा ( कायम/ स्थानापन्न ) | : | कायम |
| 3. | Status (Substantive /Officiating ) | | |
| ४. | पदास लागू असलेली विद्यमान वेतनश्रेणी | : | ३०५०-७५-३९५०-४५९० |
| 4. | Pre-revised scale(s) of pay applicable to the post | : | |
| ५. | पदोन्नतीची संधी उपलब्ध असलेल्या पदावर दिनांक १.१.२००६ पूर्वी कालबध्द पदोन्नती योजना/आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मिळालेला आहे. तथापि, दिनांक १.१.२००६ पूर्वी प्रत्यक्ष पदोन्नती झाली नसल्यास, कालबध्द पदोन्ती योजना/आश्वासित प्रगती योजनेखाली मिळालेली वेतनश्रेणी. | : | निरंक |
| 5. | Pay Scale sanctioned after receiving the benefit of TBP/ACP scheme before 1.1.206 on the post having Promotion opportunity, but not got actual promotion Before 1.1.2006. | : | |
| ६. | पदोन्नतीची संधी उपलब्ध नसलेल्या पदावर किंवा एकाकी पदावर दिनांक १.१.२००६ पूर्वी कालबध्द पदोन्नती योजना/ आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मिळाला असल्यास, कालबध्द पदोन्नती योजना/ आश्वासित प्रगती योजनखाली मिळालेली वेतनश्रेणी. | : | निरंक |
| 6. | Pay Scale sanctioned after receiving the benefit of TAB / ACP scheme before 1.1.2006 on the post having no promotion opportunity or isolated post. | : | |
| ७. | दिनांक १.१.२००६ रोजी असलेली विद्यमान वित्तलब्धी- | : | |
| 7. | Existing emoluments as on 1.1.2006:- | | |
| | (अ) मूळ वेतन ( कुंठीत वेतनवाढीसह , असल्यास) | : | ३७२५ |
| | (a) Basic Pay( including Staganation Increment, if any) | : | |
| | (ब) महागाई वेतन | : | १८६३ |
| | (b) Dearness Pay | : | |
| | (क) महागाई भत्ता | : | ११७३ |
| | (c) Dearness Allowance. | : | |
| | (ड) एकूण विद्यमान वित्तलब्धी [(अ) ते (क)] | : | ६७६१ |
| | (d) Total existing emoluments ( a) to (c) | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| ८. | अ.क्र.४ च्या समोर दर्शविलेल्या विद्यमान वेतनश्रेणीच्या अनुषंगाने सुधारित वेतन बँड आणि ग्रेड वेतन ( एचएजी + व त्यापेक्षा अधिक वेतनश्रेणीसाठी योग्य वेतनश्रेनी दर्शवावी) | : | वेतन बँड (पीबी-१) : ५२००-२०२००<br>ग्रेड वेतन : १९०० |
| 8. | Revised pay band and grade pay corresponding to the pre-Revised scale shown at Sr.No. 4 above.( in the case of HAG † and above the appropriate scale may be mentioned ) | : | |
| ९. | अ.क्र.५ च्या समोर दर्शविलेल्या विद्यमान वेतन श्रेणीच्या अनुषंगाने सुधारित वेतन बँड आणि ग्रेड वेतन. | : | निरंक |
| 9. | Revised pay band and grade pay correponding to the pre-Revised scale shown at Sr. No. 5. | : | |
| १० | वरील अ.क्र.७(अ) मध्ये नमूद वेतनाच्या आधारावर जोडपत्र तीन मधील विवरणपत्रानुसार सुधारित वेतन बँड/श्रेणी मध्ये निश्चित होणारे वेतन. | : | ६९३० |
| 10. | Pay in the revised pay band/scale with reference to 7(a) above In which pay is to be fixed, as per Statement attached at Annexure III . | : | |
| ११. | म.ना.से(सु.वे.)नियम २००९ # मधील नियम ४ नुसार वरील अ.क्र.४ समोरील वेतनश्रेणीस लागू असलेले ग्रेड वेतन | : | १९०० |
| 11. | Grade pay to be applied in terms of Rule 4 of MCS(RP) Rules 2009 @ With reference to Sr. No. 4 above. | | |
| १२. | म.ना.से. (सु.वे.) नियम २००९ # मधील नियम १४(२) नुसार लागू असलेले ग्रेड वेतन ( अ.क्र.९ आणि ८ मधील ग्रेड वेतनाच्या फरकाच्या ५० टक्के, किमान रुपये १००/-) | : | निरंक |
| 12. | Grade pay applicable in terms of Rule 14(2) of MCS(RP) Rules, 2009 @ ( 50 % of difference between grade pay at Sr.No.9 & 8 subject to Minimum Rs. 100 .) | : | |
| १३. | वरील क्र.६ च्या संदर्भात म.ना.से. ( सु.वे.) नियम २००९ # मधील नियम १४(३) नुसार लागू असलेले अतिरिक्त ग्रेस वेतन . | : | निरंक |
| 13. | Additional Grade pay to be applied in terms of Rule 14 (3) of MCS (RP)Rules 2009 @ with reference to Sr. No. 6 above. | : | |
| १४ | कनिष्ठ कर्मचा-याच्या सुधारित वेतनाच्या अनुषंगाने वाढविलेले सुधारित वेतन ( म.ना.से. (सु.वे.) नियम २००९ # मधील नियम ७(१) खालील टीप ५ आणि ७ ) ) लागू असल्यास, कनिष्ठ कर्मचा-याचे नाव आणि त्याचे निश्चित केलेले वेतनसुध्दा दर्शविण्यात यावे. | : | निरंक |
| 14. | Stepped up pay with reference to the revised pay of Junior ( Note 5 & 7 of Rule 7(1) of MCS(RP)Rules 2009 @ ) if applicable, name and pay of the junior also to be indicated distinctly. | : | |
| १५ | स्थानापन्न पदावरील वेतन निश्चितीनंतरचे वेतन कायम पदावरील वेतन निश्चितीनंतरच्या वेतनापेक्षा कमी असल्यास कायम पदावरील सुधारित वेतन [( म.ना.से. ( सू.वे.) नियम,२००९ # मधील नियम ७(२)] | : | निरंक |
| 15. | Revised pay with reference to the subtantive pay in case where The pay ficed in the officiating post is lower than the pay Fixed in the substantive post, if applicable [ Rule 7(2) of MCS(RP) Rule 2009 @} | : | |

vbm.

१६. वैयक्तिक वेतन, असल्यास .. .. : निरंक
16. Personal Pay, if any. .. .. :

१७. वेतन निश्चितीनंतरची सुधारित वित्तलब्धी :-
17. Revised amoluments after fixation of pay --

(अ) सुधारित वेतन बँड/वेतनश्रेणी मधील वेतन ( वरील अ.क्र.१० किंवा १४ किंवा १५ प्रमाणे जे लागू असेल ते ) : ६९३०
(c) Pay in the Revised Pay Band/Pay scale (as per Sr.No. 10 or 14 or 15 above whichever is applicable :
(ब) ग्रेड वेतन ( वरील अ.क्र. ११ + १२ किंवा अ.क्र.११+ १३ जे लागू असेल ते ) : १९००
(d) Grade Pay (Sr.No.11 + 12 or Sr. No. 11+13 whichever is applicable.) :
(क) विशेष वेतन, अनुज्ञेय असल्यास [म.ना.से. (सु.वे.)नियम २००९# मधील नियम ७ खालील पोटनियम (१)(क) ] : निरंक
(c) Special Pay, if admissile (Sub Rule (1)(c) of Rule 7 of MCS (RP) Rules 2009 @ :
(ड) वैयक्तिक वेतन, अनुज्ञेय असल्यास [म.ना.से. (सु.वे.)नियम २००९# मधील नियम ७ (१) खालील टीप ४ व ६ ] : निरंक
(d) Personal Pay , if admissible (see note 4 and 6 below Rule 7(1) of MCS (RP) Rules,2009 @ ) :

१८. पुढील वेतनवाढीचा दिनांक [म.ना.से. (सु.वे.)नियम २००९# मधील नियम ९ आणि १० )आणि वेतनवाढी नंतरचे वेतन.. :
18. Date of next increment [ Rule 9 & 10 of MCS(RP)Rules 2009 @ ] and pay after grant of increment :- :

| बाव क्रमांक<br>Item No. | वेतनवाढीचा दिनांक<br>Date of Increment | वेतनवाढी नंतरचे वेतन<br>Pay after increment | |
|---|---|---|---|
| | | वेतन बँड/वेतनश्रेणी मधील वेतन<br>Pay in the Pay Band/ Scale | ग्रेड वेतन (लागू असल्यास)<br>Grade Pay (Wherever applicable ) |
| i | ii | iii | iv |
| १.<br>1. | १ जुलै २००६<br>1st July 2006 | ६९३० + २७० = ७२००<br>[अ.क्र.१७(अ)+अ.क्र.१७(अ) व (ब) यांच्या बेरजेच्या तीन टक्के ]<br>[Sr.No.17(a)+3% of sum of Sr.No.17(a) & (b) above] | १९००<br>[वरील अ.क्र.१७(ब)मध्ये दर्शविल्याप्रमाणे ]<br>[ As shown in Sr.No. 17(b) above] |
| २.<br>2 | १ जुलै २००७<br>1st july 2007 | ७२०० + २८० = ७४८०<br>[ बाव क्र.१ मधील स्तंभ क्र. iii + बाव क्र.१ मधील स्तंभ क्र.iii व iv यांच्या बेरजेच्या तीन टक्के ]<br>[ Column No. iii of item No. 1 + 3 % of sum of Column No. iii + iv of item No. 1 ] | १९००<br>[वरील अ.क्र.१७(ब) मध्ये दर्शविल्याप्रमाणे ]<br>[As shown in Sr.No. 17(b) above ] |

१९. इतर अनुषंगिक माहिती :
19 Any other relevant information. :

दिनांक :
Date

कार्यालय प्रमुखाचे पदनाम आणि स्वाक्षरी
Signature & Designation of Head Of Office.

.............................................................................................................................

उदा.२. दि.१.१.२००६ पूर्वी कालबध्द पदोन्नती/सेवांतर्गात आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मिळालेल्या व दि.१.१.२००६ पूर्वी प्रत्यक्ष पदोन्नती न मिळालेल्या कर्मचा-यांची वेतननिश्चिती.

**जोडपत्र – एक**

( पहा परिच्छेद ३ )

**Annexure – I**

(See para 3 )

**महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम,२०९ अन्वये दिनांक १ जानेवारी २००६ रोजी वेतननिश्चितीसाठी नमुना**

**Proforma for fixation of pay under Maharashtra Civil Services ( Revised Pay )Rules 2009 as on 1st January 2006.**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | शासकीय कर्मचा-याचे नाव | : | अ ब क |
| 1. | Name of the Government Servant | : | |
| २. | दिनांक १.१.२००६ रोजी वेतननिश्चिती करावयाच्या पदाचे पदनाम | : | लेखा अधिकारी |
| 2. | Designation of the post in which pay is to be fixed as on 1.1.2006. | : | |
| ३. | दर्जा ( कायम/ स्थानापन्न ) | : | कायम |
| 3. | Status (Substantive /Officiating ) | | |
| ४. | पदास लागू असलेली विद्यमान वेतनश्रेणी | : | ६५०० - २००- १०५०० |
| 4. | Pre-revised scale(s) of pay applicable to the post | : | |
| ५. | पदोन्नतीची संधी उपलब्ध असलेल्या पदावर दिनांक १.१.२००६ पूर्वी कालबध्द पदोन्नती योजना/आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मिळालेला आहे. तथापि, दिनांक १.१.२००६ पूर्वी प्रत्यक्ष पदोन्नती झाली नसल्यास, कालबध्द पदोन्नती योजना/आश्वासित प्रगती योजनेखाली मिळालेली वेतनश्रेणी. | : | ८००० - २७५- १३५०० |
| 5. | Pay Scale sanctioned after receiving the benefit of TBP/ACP scheme before 1.1.206 on the post having Promotion opportunity, but not got actual promotion Before 1.1.2006. | : | |
| ६. | पदोन्नतीची संधी उपलब्ध नसलेल्या पदावर किंवा एकाकी पदावर दिनांक १.१.२००६ पूर्वी कालबध्द पदोन्नती योजना/ आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मिळाला असल्यास, कालबध्द पदोन्नती योजना/ आश्वासित प्रगती योजनखाली मिळालेली वेतनश्रेणी. | : | निरंक |
| 6. | Pay Scale sanctioned after receiving the benefit of TAB / ACP scheme before 1.1.2006 on the post having no promotion opportunity or isolated post. | : | |
| ७. | दिनांक १.१.२००६ रोजी असलेली विद्यमान वित्तलब्धी– | : | |
| 7. | Existing emoluments as on 1.1.2006:- | | |
| | (अ) मूळ वेतन ( कुंठीत वेतनवाढीसह , असल्यास) | : | ८५०० |
| | (a) Basic Pay( including Staganation Increment, if any) | : | |
| | (ब) महागाई वेतन | : | ४२५० |
| | (b) Dearness Pay | : | |
| | (क) महागाई भत्ता | : | २६७८ |
| | (c) Dearness Allowance. | : | |
| | (ड) एकूण विद्यमान वित्तलब्धी [(अ) ते (क)] | : | १५४२८ |
| | (d) Total existing emoluments ( a) to (c) | : | |
| ८. | अ.क्र.४ च्या समोर दर्शविलेल्या विद्यमान वेतनश्रेणीच्या अनुषंगाने सुधारित वेतन बँड आणि ग्रेड वेतन ( एचएजी + व त्यापेक्षा अधिक वेतनश्रेणीसाठी योग्य वेतनश्रेनी दर्शवावी) | : | वेतन बँड(पीबी-२): ९३००-३४८००<br>ग्रेड वेतन : ४४०० |

| | | | |
|---|---|---|---|
| 8. | Revised pay band and grade pay corresponding to the pre-<br>Revised scale shown at Sr.No. 4 above.( in the case of<br>HAG † and above the appropriate scale may be mentioned ) | : | |
| ९. | अ.क्र.५ च्या समोर दर्शविलेल्या विद्यमान वेतन श्रेणीच्या अनुषंगाने<br>सुधारित वेतन बँड आणि ग्रेड वेतन. | : | वेतन बँड (पीबी-३): १५६००-३९१००<br>ग्रेड वेतन : ५४०० |
| 9. | Revised pay band and grade pay correponding to the pre-<br>Revised scale shown at Sr. No. 5. | : | |
| १०. | वरील अ.क्र.७(अ) मध्ये नमूद वेतनाच्या आधारावर जोडपत्र तीन मधील<br>विवरणपत्रानुसार सुधारित वेतन बँड/श्रेणी मध्ये निश्चित होणारे वेतन. | : | १५८१० |
| 10. | Pay in the revised pay band/scale with reference to 7(a) above<br>In which pay is to be fixed, as per Statement attached at<br>Annexure III . | : | |
| ११. | म.ना.से(सु.वे.)नियम २००९ # मधील नियम ४ नुसार वरील अ.क्र.४<br>समोरील वेतनश्रेणीस लागू असलेले ग्रेड वेतन | : | ४४०० |
| 11. | Grade pay to be applied in terms of Rule 4 of MCS(RP)<br>Rules 2009 @ With reference to Sr. No. 4 above. | | |
| १२. | म.ना.से. (सु.वे.) नियम २००९ # मधील नियम १४(२) नुसार लागू<br>असलेले ग्रेड वेतन ( अ.क्र.९ आणि ८ मधील ग्रेड वेतनाच्या फरकाच्या<br>५० टक्के, किमान रुपये १००/-) | : | ५४०० - ४४०० =१००० ÷ = ५०० |
| 12. | Grade pay applicable in terms of Rule 14(2) of MCS(RP)<br>Rules, 2009 @ ( 50 % of difference between grade pay at<br>Sr.No.9 & 8 subject to Minimum Rs. 100 .) | : | |
| १३. | वरील क्र.६ च्या संदर्भात म.ना.से. ( सु.वे.) नियम २००९ # मधील<br>नियम १४(३) नुसार लागू असलेले अतिरिक्त ग्रेस वेतन . | : | निरंक |
| 13. | Additional Grade pay to be applied in terms of Rule 14 (3) of MCS<br>(RP)Rules 2009 @ with reference to Sr. No. 6 above. | : | |
| १४ | कनिष्ठ कर्मचा-याच्या सुधारित वेतनाच्या अनुषंगाने वाढविलेले सुधारित वेतन<br>( म.ना.से. (सु.वे.) नियम २००९ # मधील नियम ७(१) खालील टीप ५<br>आणि ७ (१) ) लागू असल्यास, कनिष्ठ कर्मचा-याचे नाव आणि त्याचे निश्चित<br>केलेले वेतनसुध्दा दर्शविण्यात यावे. | : | निरंक |
| 14. | Stepped up pay with reference to the revised pay of Junior ( Note<br>5 & 7 of Rule 7(1) of MCS(RP)Rules 2009 @ ) if applicable,<br>name and pay of the junior also to be indicated distinctly. | : | |
| १५ | स्थानापन्न पदावरील वेतन निश्चितीनंतरचे वेतन कायम पदावरील वेतन<br>निश्चितीनंतरच्या वेतनापेक्षा कमी असल्यास कायम पदावरील सुधारित वेतन<br>[( म.ना.से. ( सू.वे.) नियम,२००९ # मधील नियम ७(२)] | : | निरंक |
| 15. | Revised pay with reference to the subtantive pay in case where<br>The pay ficed in the officiating post is lower than the pay<br>Fixed in the substantive post, if applicable [ Rule 7(2) of<br>MCS(RP) Rule 2009 @} | : | |
| १६. | वैयक्तिक वेतन, असल्यास .. .. | : | निरंक |
| 16. | Personal Pay, if any. .. .. | : | |

१७. वेतन निश्चितीनंतरची सुधारित वित्तलब्धी :-
17. Revised amoluments after fixation of pay --

(अ) सुधारित वेतन बँड/वेतनश्रेणी मधील वेतन ( वरील अ.क्र.१० किंवा १४ किंवा १५ प्रमाणे जे लागू असेल ते ) : १५८१०
(e) Pay in the Revised Pay Band/Pay scale (as per Sr.No. 10 or 14 or 15 above whichever is applicable :
(ब) ग्रेड वेतन ( वरील अ.क्र. ११ + १२ किंवा अ.क्र.११+ १३ जे लागू असेल ते ) : ४४०० + ५०० = ४९००
Grade Pay (Sr.No.11 + 12 or Sr. No. 11+13 whichever is applicable.) :
(क) विशेष वेतन, अनुज्ञेय असल्यास [म.ना.से. (सु.वे.)नियम २००९# मधील नियम ७ खालील पोटनियम (१)(क) ] : निरंक
(c) Special Pay, if admissile (Sub Rule (1)(c) of Rule 7 of MCS (RP) Rules 2009 @ :
(ड) वैयक्तिक वेतन, अनुज्ञेय असल्यास [म.ना.से. (सु.वे.)नियम २००९# मधील नियम ७ (१) खालील टीप ४ व ६ ] : निरंक
(d) Personal Pay , if admissible (see note 4 and 6 below Rule 7(1) of MCS (RP) Rules,2009 @ ) :

१८. पुढील वेतनवाढीचा दिनांक [म.ना.से. (सु.वे.)नियम २००९# मधील नियम ९ आणि १० )आणि वेतनवाढी नंतरचे वेतन.. :
18. Date of next increment [ Rule 9 & 10 of MCS(RP)Rules 2009 @ ] and pay after grant of increment :- :

| बाव क्रमांक<br>Item No. | वेतनवाढीचा दिनांक<br>Date of Increment | वेतनवाढी नंतरचे वेतन<br>Pay after increment | |
|---|---|---|---|
| | | वेतन बँड/वेतनश्रेणी मधील वेतन<br>Pay in the Pay Band/ Scale | ग्रेड वेतन (लागू असल्यास)<br>Grade Pay (Wherever applicable ) |
| i | ii | iii | iv |
| १.<br>1. | १ जुलै २००६<br>1st July 2006 | १५८१० + ६३० = १६४४०<br>[अ.क्र.१७(अ)+अ.क्र.१७(अ) व (ब) यांच्या बेरजेच्या तीन टक्के ]<br>[Sr.No.17(a)+3% of sum of Sr.No.17(a) & (b) above] | ४९००<br>[वरील अ.क्र.१७(ब)मध्ये दर्शविल्याप्रमाणे ]<br>[ As shown in Sr.No. 17(b) above] |
| २.<br>2 | १ जुलै २००७<br>1st july 2007 | १६४४० + ६५० = १७०९०<br>[ बाव क्र.१ मधील स्तंभ क्र. iii + बाव क्र.१ मधील स्तंभ क्र.iii व iv यांच्या बेरजेच्या तीन टक्के ]<br>[ Column No. iii of item No. 1 + 3 % of sum of Column No. iii + iv of item No. 11 ] | ४९००<br>[वरील अ.क्र.१७(ब) मध्ये दर्शविल्याप्रमाणे ]<br>[As shown in Sr.No. 17(b) above ] |

१९. इतर अनुषंगिक माहिती :
19 Any other relevant information. :

दिनांक :
Date

कार्यालय प्रमुखाचे पदनाम आणि स्वाक्षरी
Signature & Designation of Head Of Office.

.....................................................................................................................................

विवाम.

उदा.३. पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नसलेल्या पदावर किंवा एकाकी पदावर दिनांक १.१.२००६ पूर्वी कालबध्द पदोन्नती/सेवांतर्गात आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मिळालेल्या कर्मचा-यांची वेतननिश्चिती.

**जोडपत्र – एक**

(पहा परिच्छेद ३)

**Annexure – I**

(See para 3 )

**महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम,२०९ अन्वये दिनांक १ जानेवारी २००६ रोजी वेतननिश्चितीसाठी नमुना**

**Proforma for fixation of pay under Maharashtra Civil Services ( Revised Pay )Rules 2009 as on 1st January 2006.**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | शासकीय कर्मचा-याचे नाव | : | अ ब क |
| 1. | Name of the Government Servant | : | |
| २. | दिनांक १.१.२००६ रोजी वेतननिश्चिती करावयाच्या पदाचे पदनाम | : | जिल्हा हिवताप अधिकारी |
| 2. | Designation of the post in which pay is to be fixed as on 1.1.2006. | : | |
| ३. | दर्जा (कायम/ स्थानापन्न ) | : | कायम |
| 3. | Status (Substantive /Officiating ) | | |
| ४. | पदास लागू असलेली विद्यमान वेतनश्रेणी | : | ६५०० - २००- १०५०० |
| 4. | Pre-revised scale(s) of pay applicable to the post | : | |
| ५. | पदोन्नतीची संधी उपलब्ध असलेल्या पदावर दिनांक १.१.२००६ पूर्वी कालबध्द पदोन्नती योजना/आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मिळालेला आहे. तथापि, दिनांक १.१.२००६ पूर्वी प्रत्यक्ष पदोन्नती झाली नसल्यास, कालबध्द पदोन्नती योजना/आश्वासित प्रगती योजनेखाली मिळालेली वेतनश्रेणी. | : | निरंक |
| 5. | Pay Scale sanctioned after receiving the benefit of TBP/ACP scheme before 1.1.206 on the post having Promotion opportunity, but not got actual promotion Before 1.1.2006. | : | |
| ६. | पदोन्नतीची संधी उपलब्ध नसलेल्या पदावर किंवा एकाकी पदावर दिनांक १.१.२००६ पूर्वी कालबध्द पदोन्नती योजना/ आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मिळाला असल्यास, कालबध्द पदोन्नती योजना/ आश्वासित प्रगती योजनखाली मिळालेली वेतनश्रेणी. | : | ७४५० -२२५ ११५०० |
| 6. | Pay Scale sanctioned after receiving the benefit of TAB / ACP scheme before 1.1.2006 on the post having no promotion opportunity or isolated post. | : | |
| ७. | दिनांक १.१.२००६ रोजी असलेली विद्यमान वित्तलब्धी– | : | |
| 7. | Existing emoluments as on 1.1.2006:- | | |
| | (अ) मूळ वेतन (कुंठीत वेतनवाढीसह , असल्यास) | : | ८१२५ |
| | (a) Basic Pay( including Staganation Increment, if any) | : | |
| | (ब) महागाई वेतन | : | ४०६३ |
| | (b) Dearness Pay | : | |
| | (क) महागाई भत्ता | : | २५६० |
| | (c) Dearness Allowance. | : | |
| | (ड) एकूण विद्यमान वित्तलब्धी [(अ) ते (क)] | : | १४७४८ |
| | (d) Total existing emoluments ( a) to (c) | : | |
| ८. | अ.क्र.४ च्या समोर दर्शविलेल्या विद्यमान वेतनश्रेणीच्या अनुषंगाने सुधारित वेतन बँड आणि ग्रेड वेतन (एचएजी + व त्यापेक्षा अधिक वेतनश्रेणीसाठी योग्य वेतनश्रेनी दर्शवावी) | : | वेतन बँड(पीबी-२): ९३००-३४८००<br>ग्रेड वेतन : ४४०० |

| | | | |
|---|---|---|---|
| 8. | Revised pay band and grade pay corresponding to the pre-Revised scale shown at Sr.No. 4 above.( in the case of HAG † and above the appropriate scale may be mentioned ) | : | |
| ९. | अ.क्र.५ च्या समोर दर्शविलेल्या विद्यमान वेतन श्रेणीच्या अनुषंगाने सुधारित वेतन बँड आणि ग्रेड वेतन. | : | निरंक |
| 9. | Revised pay band and grade pay correponding to the pre-Revised scale shown at Sr. No. 5. | : | |
| १०. | वरील अ.क्र.७(अ) मध्ये नमूद वेतनाच्या आधारावर जोडपत्र तीन मधील विवरणपत्रानुसार सुधारित वेतन बँड/श्रेणी मध्ये निश्चित होणारे वेतन. | : | १५१२० |
| 10. | Pay in the revised pay band/scale with reference to 7(a) above In which pay is to be fixed, as per Statement attached at Annexure III . | : | |
| ११. | म.ना.से(सु.वे.)नियम २००९ # मधील नियम ४ नुसार वरील अ.क्र.४ समोरील वेतनश्रेणीस लागू असलेले ग्रेड वेतन | : | ४४०० |
| 11. | Grade pay to be applied in terms of Rule 4 of MCS(RP) Rules 2009 @ With reference to Sr. No. 4 above. | | |
| १२. | म.ना.से. (सु.वे.) नियम २००९ # मधील नियम १४(२) नुसार लागू असलेले ग्रेड वेतन ( अ.क्र.९ आणि ८ मधील ग्रेड वेतनाच्या फरकाच्या ५० टक्के, किमान रुपये १००/-) | : | निरंक |
| 12. | Grade pay applicable in terms of Rule 14(2) of MCS(RP) Rules, 2009 @ ( 50 % of difference between grade pay at Sr.No.9 & 8 subject to Minimum Rs. 100 .) | : | |
| १३. | वरील क्र.६ च्या संदर्भात म.ना.से. ( सु.वे.) नियम २००९ # मधील नियम १४(३) नुसार लागू असलेले अतिरिक्त ग्रेस वेतन . | : | ४०० |
| 13. | Additional Grade pay to be applied in terms of Rule 14 (3) of MCS (RP)Rules 2009 @ with reference to Sr. No. 6 above. | : | |
| १४ | कनिष्ठ कर्मचा-याच्या सुधारित वेतनाच्या अनुषंगाने वाढविलेले सुधारित वेतन ( म.ना.से. (सु.वे.) नियम २००९ # मधील नियम ७(१) खालील टीप ५ आणि ७ (१) ) लागू असल्यास, कनिष्ठ कर्मचा-याचे नाव आणि त्याचे निश्चित केलेले वेतनसुध्दा दर्शविण्यात यावे. | : | निरंक |
| 14. | Stepped up pay with reference to the revised pay of Junior ( Note 5 & 7 of Rule 7(1) of MCS(RP)Rules 2009 @ ) if applicable, name and pay of the junior also to be indicated distinctly. | : | |
| १५ | स्थानापन्न पदावरील वेतन निश्चितीनंतरचे वेतन कायम पदावरील वेतन निश्चितीनंतरच्या वेतनापेक्षा कमी असल्यास कायम पदावरील सुधारित वेतन [( म.ना.से. ( सु.वे.) नियम,२००९ # मधील नियम ७(२)] | : | निरंक |
| 15. | Revised pay with reference to the subtantive pay in case where The pay ficed in the officiating post is lower than the pay Fixed in the substantive post, if applicable [ Rule 7(2) of MCS(RP) Rule 2009 @} | : | |
| १६. | वैयक्तिक वेतन, असल्यास .. .. | : | निरंक |
| 16. | Personal Pay, if any. .. .. | : | |

१७. वेतन निश्चितीनंतरची सुधारित वित्तलब्धी :-
17. Revised amoluments after fixation of pay --

(अ) सुधारित वेतन बँड/वेतनश्रेणी मधील वेतन ( वरील अ.क्र.१० किंवा १४ किंवा १५ प्रमाणे जे लागू असेल ते ) : १५१२०
(f) Pay in the Revised Pay Band/Pay scale (as per Sr.No. 10 or 14 or 15 above whichever is applicable :
(ब) ग्रेड वेतन ( वरील अ.क्र. ११ + १२ किंवा अ.क्र.११+ १३ जे लागू असेल ते ) : ४४०० + ४०० = ४८००
Grade Pay (Sr.No.11 + 12 or Sr. No. 11+13 whichever is applicable.) :
(क) विशेष वेतन, अनुज्ञेय असल्यास [म.ना.से. (सु.वे.)नियम २००९# मधील नियम ७ खालील पोटनियम (१)(क) ] : निरंक
(c) Special Pay, if admissile (Sub Rule (1)(c) of Rule 7 of MCS (RP) Rules 2009 @ :
(ड) वैयक्तिक वेतन, अनुज्ञेय असल्यास [म.ना.से. (सु.वे.)नियम २००९# मधील नियम ७ (१) खालील टीप ४ व ६ ] : निरंक
(d) Personal Pay , if admissible (see note 4 and 6 below Rule 7(1) of MCS (RP) Rules,2009 @ ) :

१८. पुढील वेतनवाढीचा दिनांक [म.ना.से. (सु.वे.)नियम २००९# मधील नियम ९ आणि १० )आणि वेतनवाढी नंतरचे वेतन.. :
18. Date of next increment [ Rule 9 & 10 of MCS(RP)Rules 2009 @ ] and pay after grant of increment :- :

| बाव क्रमांक Item No. | वेतनवाढीचा दिनांक Date of Increment | वेतनवाढी नंतरचे वेतन Pay after increment | |
|---|---|---|---|
| | | वेतन बँड/वेतनश्रेणी मधील वेतन Pay in the Pay Band/ Scale | ग्रेड वेतन (लागू असल्यास) Grade Pay (Wherever applicable ) |
| i | ii | iii | iv |
| १. 1. | १ जुलै २००६ 1st July 2006 | १५१२० + ६०० = १५७२० [अ.क्र.१७(अ)+अ.क्र.१७(अ) व (ब) यांच्या बेरजेच्या तीन टक्के ] [Sr.No.17(a)+3% of sum of Sr.No.17(a) & (b) above] | ४८०० [वरील अ.क्र.१७(ब)मध्ये दर्शविल्याप्रमाणे ] [ As shown in Sr.No. 17(b) above] |
| २. 2 | १ जुलै २००७ 1st july 2007 | १५७२० + ६२० = १६३४० [ बाव क्र.१ मधील स्तंभ क्र. iii + बाव क्र.१ मधील स्तंभ क्र.iii व iv यांच्या बेरजेच्या तीन टक्के ] [ Column No. iii of item No. 1 + 3 % of sum of Column No. iii + iv of item No. 11 ] | ४८०० [वरील अ.क्र.१७(ब) मध्ये दर्शविल्याप्रमाणे ] [As shown in Sr.No. 17(b) above ] |

१९. इतर अनुषंगिक माहिती :
19 Any other relevant information. :

दिनांक :
Date

कार्यालय प्रमुखाचे पदनाम आणि स्वाक्षरी
Signature & Designation of Head Of Office.

......................................................................................................................................

******

विवाम.

## दिनांक १ जानेवारी २००६ पूर्वीच्या निवृत्तीवेतनधारकांच्या निवृत्तीवेतनात सुधारणा करण्याबाबत.

वित्त विभाग, शासन निर्णय क्र.सेनिवे १००९/प्र.क्र.२९/सेवा-, दिनांक ५ मे, २००९.

संदर्भ: १) शा.निर्णय , वित्त विभाग,क्र.सेनिवे १००८/प्र.क्र.९९/सेवा ४, दिनांक २७.१०.२००८.
२) शा.निर्णय, वित्त विभाग, क्र.वेपुर १२०९/प्र.क्र.२०/सेवा ९ , दि.२७.०२.२००९.

-: निर्णय :-

केंद्र शासनाने सहाव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशीच्या आधारे राज्य शासकीय कर्मचा-यांच्या निवृत्तीवेतनामध्ये सुधारणा करण्यासाठी श्री. पी.एम.ए.हकीम यांच्या अध्यक्षतेखाली राज्य वेतन सुधारणा समिती,२००८ स्थापन केली होती. या समितीने केलेल्या शिफारशींच्या अनुषंगाने संदर्भाधीन (२) वरील शासन निर्णय, दिनांक २७ फेब्रुवारी २००९ च्या आदेशान्वये निवृत्तीवेतनधारकांच्या निवृत्तीवेतनामध्ये सुधारणा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार दिनांक १.१.२००६ पूर्वी सेवानिवृत्त झालेल्या निवृत्तीवेतनधारकांच्या निवृत्तीवेतनात खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

२. या आदेशामध्ये......

(ए) " विद्यमान निवृत्तीवेतनधाक " म्हणजे ३१ डिसेंबर २००५ रोजी निवृत्तीवेतन घेत असलेला/ घेण्यास पात्र असलेला निवृत्तीवेतनधारक.

(बी) " विद्यमान निवृत्तीवेतन " म्हणजे ३१ डिसेंबर २००५ रोजी देय असलेले व त्यात निवृत्तीवेतनाचा अंशराशीकृत भाग असल्यास तो धरुन मूळ निवृत्तीवेतन.यात म.ना.से. (निवृत्तीवेतन ) नियम, १९८२ मधील किंवा शासकीय कर्मचा-यास त्याच्या निवृत्तीवेतनाच्यावेळी लागू असलेल्या इतर कोणत्याही निवृत्तीवेतन नियमातील निवृत्तीवेतनाच्या सर्व प्रकारचा ( जखम/इजा निवृत्तीवेतन वगळून ) समावेश होतो.

(सी) " विद्यमान महागाई वाढ " म्हणजे निवृत्तीवेतनधारकांना दिनांक १ जानेवारी २००६ रोजी देय असलेली खाली नमूद केलेल्या कालावधीसाठी पुढीलप्रमाणे अनुज्ञेय असलेली वाढ:.

| अनु.क्र. | कालावधी | महागाई वाढीचा मासिक दर |
|---|---|---|
| १ | १ जानेवारी २००६ पासून | ० |
| २ | १ जुलै २००६ पासून | २ % |
| ३ | १ जानेवारी २००७ पासून | ६ % |
| ४ | १ जुलै २००७ पासून | ९ % |
| ५ | १ जानेवारी २००८ पासून | १२ % |

| | | |
|---|---|---|
| ६ | १ जुलै २००८ पासून | १६ % |

३. सहाव्या केंद्रीय वेतन आयोगाने दि.१.१.२००६ पूर्वी सेवानिवृत्त झालेल्या निवृत्तीवेतनधारकांच्या संदर्भात केलेल्या शिफारशीप्रमाणे राज्यातील निवृत्तीवेतनधारकांच्या मूळ निवृत्तीवेतनात ( यामध्ये महागाई भत्ता व महागाई निवृत्तीवेतनाचा समावेश नसेल ) ४० % वाढ करण्याचा निर्णय वरील संदर्भीय दिनांक २७ फेब्रुवारी २००९ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे. त्यानुसार दिनांक १.१.२००६ पूर्वी सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-याच्या संदर्भात खालील उदाहरणानुसार सेवानिवृत्तीवेतन निश्चित करण्यात यावे.

| | | |
|---|---|---|
| अ | दि.१.१.२००६ रोजी मूळ निवृत्तीवेतन | रु.१0,000/- |
| ब | महागाई निवृत्तीवेतन ( D.P.) | रु. ५,000/- |
| क | महागाई भत्ता ( २४ %) ( D. A.) | रु. ३,६00/- |
| ड | मूळ निवृत्तीवेतनाच्या (अ नुसार ) ४० % वाढ | रु. ४,000/- |
| इ | दि.१.१.२००६ रोजी निवृत्तीवेतनधारकाचे निवृत्तीवेतन (अ + ब + क + ड) | रु.२२,६00/- |

४. वरीलप्रमाणे निवृत्तीवेतनाच्या मूळ निवृत्तीवेतनावर ४० % वाढ देवून दिनांक १.१.२००६ रोजी अनुज्ञेय होणा-या सुधारित निवृत्तीवेतनाचे शीघ्रगणक जोडपत्र १ वर देण्यात आलेले आहे.अशा रितीने येणारी रक्कम ही १ जानेवारी, २००६ पासूनचे एकत्रित निवृत्तीवेतन म्हणून मानले जाईल.

५. विद्यमान निवृत्तिवेतनधारक, यथास्थिती, महालेखापाल ( लेखा व अनुज्ञेयता) १ मुंबई, किंवा महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता )-२ नागपूर यांच्या प्राधिकारपत्राशिवाय, एकत्रित दराने निवृत्तीवेतनाचे प्रदान करण्यासाठी, सर्व निवृत्तीवेतन संवितरण प्राधिकारी( म्हणजे यथास्थिती अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई/कोषागार अधिकारी) यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे.

६. ज्या प्रकरणी निवृत्तीवेतनधारक १ जानेवारी २००६ रोजी हयात असेल व त्यानंतर मृत्यू पावला असेल तेथे त्याचे कायदेशीर वारसदार १ जानेवारी २००६ पासून निवृत्तीवेतनधारकाच्या मृत्यूच्या दिनांकापर्यन्तची हयातकालीन थकबाकी मिळण्यास पात्र ठरेल/ठरतील. यासाठी निवृत्तीवेतनधारकाच्या कायदेशीर वारसदारांनी यथास्थिती, निवृत्तीवेतन संवितरण प्राधिका-याकडे म्हणजे अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई/कोषागार अधिकारी/ विभाग/ कार्यालय प्रमुखाकडे अर्ज करावा.

७. सेवेत असलेल्या/पुनर्नियुक्त झालेल्या निवृत्तीवेतनधारकाला सध्याच्या प्रचलित आदेशानुसार निवृत्तीवेतनावर महागाई वाढ मिळत नाही.त्यांच्या प्रकरणी त्यांची शासन सेवेत नियुक्ती/पुनर्नियुक्ती झाली नसती तर त्यांना जी महागाई वाढ अनुज्ञेय झाली असती ती काल्पनिक महागाई वाढ ते घेत होते असे मानून या आदेशानुसार त्यांचे निवृत्तीवेतन एकत्रित करण्यासाठी विचारात घेतली जाईल. त्यांना अनुज्ञेय ठरणारे एकत्रित निवृत्तीवेतन लक्षात घेऊन त्यांचे वेतन १ जानेवारी २००६ पासून पुनर्निश्चित करण्यात येईल. तथापि नियुक्ती/पुनर्नियुक्तीच्या कालावधीत त्यांना १ जानेवारी २००६ नंतरची महागाई वाढ अनुज्ञेय असणार नाही.

८.	निवृत्तीवेतनधारकांच्या निवृत्तीवेतनात दिनांक १ १.२००६ पासून सुधारणा करण्यात यावी. मात्र सुधारित वेतन संरचनेत निवृत्तिवेतनाचा प्रत्यक्ष लाभ दिनांक १.४.२००९ पासून अदा करण्यात यावा. त्यापूर्वीच्या थकबाकीच्या रकमेतून शासन निर्णय , वित्त विभाग, क्र.सेनिवे १००८/प्र.क्र.९९/ सेवा ४ दिनांक २७ ऑक्टोबर २००८ अन्वये मंजूर केलेल्या अग्रिमाची रक्कम दिनांक १.१.२००६ ते ३१.३.२००९ या कालावधीत अनुज्ञेय थकबाकीच्या सुरुवातीच्या वर्षात समायोजित करण्यात यावी. उर्वरित थकबाकीची रक्कम पुढील पाच वर्षात समान हप्त्यात रोखीने अदा करण्यात यावी.

९.	शासन असाही आदेश देत आहे की, ज्यांना निवृत्तीवेतन योजना लागू केलेली आहे अशा मान्यता व अनुदानप्राप्त शैक्षणिक संस्था, कृषितरे विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्न असलेली अशासकीय महाविद्यालये व कृषि विद्यापीठे यामधील निवृत्तीवेतनधारक यांना वरील निर्णय, योग्य त्या फेरफारसह लागू राहतील.

१०.	महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम १९६१( सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.पाच) च्या कलम २४८ च्या परंतुकान्वये प्रदान केलेले अधिकार आणि त्यासंबंधीचे इतर सर्व अधिकार याचा वापर करून शासन असाही आदेश देत आहे की, वरील निर्णय जिल्हा परिषदांचे निवृत्तीवेतनधारक यांनाही लागू राहतील.

११.	या संबंधीचा खर्च वरील परिच्छेदात नमूद केलेल्या निवृत्तीवेतनधारकांची निवृत्तीवेतन ज्या अर्थ संकल्पीय  शीर्षाखाली खर्ची टाकण्यात येतात त्या शीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो त्या त्या शीर्षातंर्गत मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा. तथापि, आवश्यक असल्यास संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी वरील निवृत्तीवेतनधारकांसंबंधीचा खर्च भागविण्यासाठी विधानमंडळाच्या येत्या अधिवेशनात पूरक मागणी सादर करण्यासाठी आवश्यकती कार्यवाही करावी.

१२.	सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या **www.maharashtra.gov.in** या वेब साईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २००९०५०५१३३५५२००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने ,

निलेश बा.वाडेकर,
शासनाचे उप सचिव.

( टीप: दिनांक ७.७.२००९ चे शुध्दिपत्रक पहावे. ( पान क्र.६१५ )

******

विवाम.

# निवृत्तीवेतन/कुटुंबनिवृत्तीवेतनावरील महागाई वाढ.

वित्त विभाग,

शासन निर्णय क्रमांक : निमवा १००९/ ३५/सेवा-४, दिनांक ५ मे , २००९.

पहा: शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक निमवा १००८/९८/सेवा-४, दिनांक १६ ऑक्टोबर,२००८.

निर्णय:

शासन असा आदेश देत आहे की, राज्य शासकीय निवृत्तीवेतनधारक/कुटुंब निवृत्तीवेतनधारकांना त्यांच्या दिनांक १ जानेवारी २००९ पासूनच्या सुधारित मूळ निवृत्तीवेतन/कुटुंब निवृत्तीवेतन आणि महागाई निवृत्तीवेतन/महागाई कुटुंब निवत्तीवेतन(असल्यास) त्यांच्या एकूण रकमेवर दि. १ जानेवारी, २००९ पासून २२ टक्के दराने महागाई वाढ देणात यावी.

२. रुपयाच्या अपूर्णांकात असलेली महागाई वाढीची रक्कम देताना ती पुढील रुपयात पूर्णांकित करावी.

३. प्रत्येक वैयक्तिक प्रकरणी देय होणा-या महागाई वाढीच्या रकमेची परिगणना करण्याची जबाबदारी ही निवृत्तीवेतन संवितरण प्राधिकारी म्हणजे यथास्थिती, अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई/कोषागार अधिकारी यांची राहील.

४. शासन असाही आदेश देत आहे की,ज्यांना निवृत्तीवेतन योजना लागू केलेली आहे अशा मान्यता प्राप्त व अनुदानप्राप्त शैक्षणिक संस्था, कृषितर विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्न असलेली अशासकीय महाविद्यालये व कृषि विद्यापीठे यांमधील निवृत्तीवेतनधारक/कुटुंब निवृत्तीवेतनधारक यांना वरील निर्णय, *योग्य त्या फेरफारांसह,* लागू राहील.

५. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१(सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक पाच) च्या कलम २४८ च्या परंतुकान्वये प्रदान केलेले अधिकार आणि त्यासंबंधातील इतर सर्व अधिकार यांचा वापर करुन शासन असाही आदेश देत आहे की, वरील निर्णय जिल्हा परिषदांचे निवृत्तीवेतनधारक/ कुटुंबनिवृत्ती वेतनधारक यांनाही लागू राहील.

६. ज्या राज्य शासकीय कर्मचा-यांनी सरकारी क्षेत्रातील उपक्रमांमध्ये/स्वायत्त संस्थांमध्ये/स्थानिक संस्था इत्यादींमध्ये स्वत:ला सामावून घेतल्यानंतर एक रकमी ठोक रक्कम स्वीकारलेली आहे, व जे निवृत्तीवेतनाच्या १/३ इतका अंशराशीकृत भाग पुन:स्थापित करण्यासाठी तसेच शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक निअंक १०९९/ ३०६/ सेवा-४, दिनांक १५ नोव्हेंबर , १९९९ अनुसार अंशराशीकृत रकमेच्या सुधारणेस पात्र ठरले आहेत, अशा कर्मचा-यांनाही, शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक निअंक १००१/ ५०/सेवा- ४ दिनांक

९ एप्रिल, २००१ च्या तरतूदीनुसार त्यांच्या पूर्ण निवृत्तीवेतनावर, वरील परिच्छेद १ मध्ये विहित केलेल्या दिनांकापासून व विहित दराने महागाई वाढ अनुज्ञेय राहील.

७. यासंबंधीचा खर्च वरील परिच्छेदांत नमूद केलेल्या निवृत्तीवेतनधारकांची निवृत्तीवेतन ज्या अर्थ संकल्पीय शीर्षाखाली खर्ची टाकण्यात येतात, त्या शीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो त्या त्या शीर्षा तंर्गत मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

८. शासनाने वेळोवेळी मंजूर केलेल्या निवृत्तीवेतनावरील महागाई वाढ देण्याबाबतचे सध्या अस्तित्वात असलेले सर्व आदेश, *योग्य त्या फेरफारांसह,* आता मंजूर केलेल्या महागाई वाढीस देखील लागू राहतील.

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या **www.maharashtra.gov.in** या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २००९०५०७१६५२१०००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने ,

निलेश बा. वाडेकर,
शासनाचे उप सचिव.

******

विवाम.

## महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम,२००९ :
## वेतन निश्चिती संबंधी सूचना.

**वित्त विभाग,**
शासन शुध्दिपत्रक क्रमांक वेपुर १२०९/प्र.क्र.६९/सेवा-९, दिनांक २२ मे ,२००९.

**शुध्दिपत्रक**

**शासन परिपत्रक, वित्त विभाग,क्रमांक वेपुर १२०९/प्र.क्र.६९/सेवा ९ दिनांक २९ एप्रिल,२००९ अन्वये निर्गमित केलेल्या परिपत्रकातील Annexure-III मधील Statements मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात यावी.**

**१. पृ.क्र.३३, Statement- 4 मधील रुपये 2750 या existing Basic Pay साठी दर्शविलेल्या Pay in pay Band मधील रक्कम ' रुपये '5220' ऐवजी ' रुपये 5120' अशी वाचावी.**

**२. पृ.क्र.३९ वरील Statements- 12 रद्द करण्यात येत असून सुधारित Statement -12 खालीलप्रमाणे वाचावे.**

**Statement- 12**

Existing Pay Scale Rs. 7450 – 225 – 11500

Revised Pay Structure : Pay Band- Rs.. 9300 – 34800. Grade Pay Rs. 4600, 4800, 5000, & 5200.

| Existing Basic Pay | Pay in Pay Band | Revised Basic Pay in Grade Pay Rs.4600 | Revised Basic Pay in Grade Pay Rs.4800 | Revised Basic Pay in Grade Pay Rs.5000 | Revised Basic Pay in Grade Pay Rs.5200 |
|---|---|---|---|---|---|
| 7450 | 13860 | 18460 | 18660 | 18860 | 19060 |
| 7675 | 14280 | 18880 | 19080 | 19280 | 19480 |
| 7900 | 14700 | 19300 | 19500 | 19700 | 19900 |
| 8125 | 15120 | 19720 | 19920 | 20120 | 20320 |
| 8350 | 15540 | 20140 | 20340 | 20540 | 20740 |
| 8575 | 15950 | 20550 | 20750 | 20950 | 21150 |
| 8800 | 16370 | 20970 | 21170 | 21370 | 21570 |
| 9025 | 16790 | 21390 | 21590 | 21790 | 21990 |
| 9250 | 17210 | 21810 | 22010 | 22210 | 22410 |
| 9475 | 17630 | 22230 | 22430 | 22630 | 22830 |
| 9700 | 18050 | 22650 | 22850 | 23050 | 23250 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 9925 | 18470 | 23070 | 23270 | 23470 | 23670 |
| 10150 | 18880 | 23480 | 23680 | 23880 | 24080 |
| 10375 | 19300 | 23900 | 24100 | 24300 | 24500 |
| 10600 | 19720 | 24320 | 24520 | 24720 | 24920 |
| 10825 | 20140 | 24740 | 24940 | 25140 | 25340 |
| 11050 | 20560 | 25160 | 25360 | 25560 | 25760 |
| 11275 | 20980 | 25580 | 25780 | 25980 | 26180 |
| 11500 | 21390 | 25990 | 26190 | 26390 | 26590 |
| 11725 | 21810 | 26410 | 26610 | 26810 | 27010 |
| 11950 | 22230 | 26830 | 27030 | 27230 | 27430 |
| 12175 | 22650 | 27250 | 27450 | 27650 | 27850 |

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २००९०५२२१८३४४४०१ असा आहे.

शि.म.म्हात्रे
शासनाचे उप सचिव.

******

**केंद्र शासनाच्या धर्तीवर महाराष्ट्र राज्यातील निवृत्तीवेतन धारकांना (रुपये २२५०/- पर्यन्तचे निवृत्तीवेतन + इतर देय रक्कम ) शासकीय खर्चाने मनीऑर्डरने पाठविणेबाबत.**

**वित्त विभाग**, परिपत्रक क्रमांक संकीर्ण १००६/सं.क्र.२३७/कोषा-५, **दिनांक ०८ जून, २००९.**

प्रस्तावना :- केंद्रिय वेतन धारकांचे रुपये २२५०/- पर्यन्तचे निवृत्तीवेतन केंद्र शासनाच्या खर्चाने पाठविण्याबाबत, केंद्र शासनाच्या व्यय विभागाच्या महानियंत्रक लेखा नवी दिल्ली, यांच्या दिनांक २ जानेवारी,२००६ च्या परिपत्रकानुसार केंद्र शासनाच्या " कोषागार नियम खंड-१ " मध्ये दुरुस्ती करण्यात आली आहे. याचप्रमाणे राज्य शासनाच्याही निवृत्ती वेतन धारकांना शासकीय खर्चाने मनीऑर्डरने पाठवावयाच्या सध्याच्या रकमेची मर्यादा वाढविण्याचा विचार शासनाच्या विचाराधीन होता.

परिपत्रक :-

महाराष्ट्र कोषागार नियम १९६८ च्या नियम ३४९ मध्ये राज्य शासनाच्या निवृत्त वेतन धारकांना मनीऑर्डने निवृत्तीवेतन देण्याची तरतूद आहे. जेथे जिल्हा कोषागारे किंवा उपकोषागारे आहेत अशा ठिकाणांव्यतिरिक्त अन्य महाराष्ट्र राज्य शासकीय निवृत्त वेतन धारकाचे रुपये १००/- पर्यन्तचे निवृत्ती वेतन निवृत्ती वेतन धारकाच्या विनंतीनुसार शासकीय खर्चाने (मनीऑर्डने ) कमीशनची रक्कम वजा करून उर्वरीत रक्कम पाठविली जाते . परंतु आता रुपये २२५०/- पर्यन्तचे मूळ निवृत्तीवेतन अधिक त्यावरील देय होणारी महागाई वाढ रक्कम निवृत्तीवेतन धारकांस त्यांच्या विनंतीवरून शासकीय खर्चाने मनीऑर्डरने पाठविण्यात यावे. यावरील खर्च राज्य शासनाच्या निवृत्ती धारकांसाठी " २०७१ निवृत्तीवेतन व इतर फायदे " या लेखाशीर्षाखाली व इतर राज्यांच्या निवृत्तीवेतन धारकांचा खर्च त्या त्या राज्यांच्या लेखाशिर्षाखाली दर्शविण्यात यावा.

हे परिपत्रक वित्त विभागाच्या अर्थसंकल्प -१८ शाखेच्या अनौपचारिक संदर्भ क्र.७८/०९/अर्थ—१८ दिनांक ३१.०३.२००९ सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदरचे परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या **www.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक २००९०६०८१३३१४४००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने ,

सु.सं.धपाटे,
अवर सचिव.

******

विबाम.

## दिनांक १ जानेवारी,२००६ नंतरच्या निवृत्तीवेतनधारकांच्या निवृत्तीवेतनात/कुटुंबनिवृत्तीवेतनात सुधारणा करण्याबाबत.

वित्त विभाग,
शासन निर्णय क्र.सेनिवे १००९/प्र.क्र.३३/सेवा-४ दि.२२ जून,२००९.

संदर्भ : १) शासन निर्णय, वित्त विभाग,क्र.सेनिवे १००८/प्र.क्र.९९/सेवा ४ दि.२७.१०.२००८.
२) शासन निर्णय, वित्त विभाग,क्र.वेपुर १२०९/प्र.क्र.२०/सेवा ९ दि.२७.०२.२००९.
३) शासन निर्णय, वित्त विभाग,क्र.सेनिवे १००९/प्र.क्र.२९/सेवा ९ दि.०५.०५.२००९.

## शासन निर्णय

केंद्र शासनाच्या सहाव्या केंद्रिय वेतन आयोगाच्या शिफारशीच्या आधारे राज्य शासकीय कर्मचा-याच्या निवृत्तीवेतनामध्ये सुधारणा करण्यासाठी श्री. पी.एम.ए.हकीम यांच्या अध्यक्षतेखाली राज्य वेतन सुधारणा समिती २००८ स्थापन केली होती. या समितीने केलेल्या शिफारशींच्या अनुषंगाने संदर्भाधीन क्रमांक (२) वरील दिनांक २७ फेब्रुवारी २००९ च्या शासन आदेशान्वये निवृत्तीवेतन धारकांच्या निवृत्तीवेतनामध्ये सुधारणा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार शासनाने महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील निवृत्तीवेतन, निवृत्ती/मृत्यू उपदान आणि कुटुंब निवृत्तीवेतन नियमित करणा-या तसेच महाराष्ट्र नागरी सेवा ( निवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण) नियम १९८४ मधील नियमामध्ये खालीलप्रमाणे फेरबदल करण्याचा निर्णय घेतला असून हे फेरबदल शासकीय कर्मचारी तसेच उपरोल्लेखित नियम ज्यांना लागू आहेत अशा इतर कर्मचा-यांनाही लागू राहतील.

### अंमलबजावणी दिनांक :

२. या आदेशान्वये सुधारित केलेल्या तरतूदी दिनांक १ जानेवारी,२००६ रोजी किंवा त्यानंतर निवृत्त होणा-या /सेवेत असताना मृत्यू पावलेल्या शासकीय कर्मचा-यांना लागू होतील. दिनांक १ जानेवारी,२००६ पूर्वी निवृत्त झालेल्या कर्मचा-यांच्या संदर्भात संदर्भाधिन क्रमांक (३) वरील शासन निर्णय दिनांक ५ मे,२००९ अन्वये स्वतंत्र आदेश काढण्यात आले आहेत.

१. दिनांक १ जानेवारी, २००६ रोजी किंवा त्यानंतर निवृत्त/मृत झालेल्या/होणा-या ज्या प्रकरणी निवृत्तीवेतन/कुटुंबनिवृत्तीवेतन /उपदान/ निवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण यापूर्वीच प्राधिकृत करण्यात आले आहेत किंवा अद्यापि प्राधिकृत करावयाचे आहेत अशा प्रकरणी ते या आदेशानुसार सुधारित करण्यात येईल.

## वेतन–

४. निवृत्तीवेतन विषयक विविध लाभांच्या परिगणनेसाठी सुधारित वेतन या संज्ञेचा अर्थ म.ना.से. ( निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील नियम ९(३६)(एक) मध्ये व्याख्या केल्यानुसार, शासकीय कर्मचा–यास त्याच्या निवृत्तीपूर्वी मिळत असलेले मूळ वेतन असा राहील.

५. सदरहू आदेशामध्ये वेतन या संज्ञेचा अर्थ म.ना.से. (सुधारीत वेतन) नियम २००९ प्रमाणे अंमलात आलेल्या सुधारित वेतनश्रेणीतील वेतन असा राहील.

## निवृत्तीवेतन:–

६. दिनांक १.१.२००६ पासून सर्वच प्रकरणी अर्हताकारी सेवेचा किमान कालावधी २० वर्षे इतका राहिल. त्यामुळे अर्हताकारी सेवेत भर घालण्याची तरतुद दिनांक १.१.२००६ पासून रद्द करण्यात येत आहे. या अनुषंगाने महाराष्ट्र नागरी सेवा ( निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील नियम ६६(ए) सुधारण्यात आला आहे. २० वर्षाची अर्हताकारी सेवा पूर्ण केल्यानंतर नियतवयोमानानुसार /स्वेच्छा सेवानिवृत्ती घेऊन सेवानिवृत्त होणा–या कर्मचाा–यांना सेवानिवृत्तीच्या शेवटच्या १० महिन्यात अर्जित केलेल्या सरासरी मूळ वेतनाच्या किंवा शेवटच्या महिन्यात घेतलेल्या मूळ वेतनाच्या ५० % यापैकी जी रक्कम कर्मचा–यास लाभदायक ठरेल, ती रक्कम निवृत्तीवेतन म्हणून अनुज्ञेय होईल. त्यामुळे दिनांक १.१.२००६ नंतर सेवानिवृत्त झालेल्या ज्या निवृत्तवेतनधारकांचे निवृत्तीवेतन त्यांच्या अर्हताकारी सेवेत भर घालून निश्चित करण्यात आले आहे.त्या निवृत्तीव्तिनधारकांचे निवृत्तीवेतनही या सुत्रानुसारच निश्चित करण्यात यावे.तथापि जेथे निवृत्तीवेतनधारक त्याला नियतवयोमान/निवृत्तीच्या दिनांकाला आवश्यक असलेली २० वर्षाची कमाल अर्हताकारी सेवा पूर्ण करील नसेल तेथे कमी सेवेच्या प्रमाणात यथायोग्य असे निवृत्तीवेतन कमी करण्यात येईल.

## निवृत्ती उपदान/मृत्यु उपदान:

७. महाराष्ट्र नागरी सेवा( निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील नियम ९(३६)(एक) मध्ये व्याख्या केल्यानुसार मूळ वेतनावर निवृत्ती/मुत्यु उपदानाची परिगणना करण्यात येईल. उपदानाची कमाल मर्यादा वेतनाच्या साडेसोळा पट किंवा पाच लाख यापैकी जी कमी असेल ती राहील.

## कुटुंबनिवृत्तीवेतन १९६४.

८. कुटुंब निवत्तीवेतनाची परिगणना मूळ वेतनाच्या ३० टक्के अशा एकरुप दराने काढण्यात येईल. सेवेत असलेल्या ज्या कर्मचा–यांचा मृत्यु दिनांक १.१.२००६ नंतर झाला असेल/ होईल, अशा कर्मचा–यांच्या वारसांना १० वर्षापर्यन्त उच्च दराने निवृत्तीवेतन मिळेल . या अनुषंगाने म.ना.से. (निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील संबंधीत नियम सुधारण्यात आला आहे.

## निवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण:

९. म.ना.से(निवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण) नियम १९६४ मधील नियम ५(१)नुसार निवृत्तीवेतनधारकाने दिनांक १.१.२००६ पासून निवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण करण्याचा विकल्प दिल्यास

त्याला निवृत्तीवेतनाच्या किमान ४० % व त्यापेक्षा अधिक होणार नाही एवढया भागाचे एका ठोक रकमेतील प्रदानासाठी सुधारित दराने अंशराशीकरण करता येईल. त्यामुळे दिनांक १.१.२००६ पासून सेवानिवृत्त झालेल्या/मृत पावलेल्या व अंशराशीकृत मूल्य घेतलेल्या निवृत्तीवेतनधारकांचे या सूत्रानुसार पुन्हा अंशराशीकृत मूल्य काढण्यात यावे.अर्जदारास देय होणा-या ठोक रकमेची गणना सुधारित तक्त्यानुसार करण्यात यावी. अशा प्रकारे परिगणित करण्यात आलेली रक्कम पूर्वी प्राप्त झालेल्या ठोक रकमेपेक्षा कमी आली तर अतिप्रदान रकमेची वसुली थकबाकीच्या रकमेतुन समायोजित करण्यात यावी. सुधारित तक्ता जोडपत्र-१ मध्ये देण्यात आला आहे. या अनुषंगाने म.ना.से. (निवृत्तिवेतन अंशराशीकरण) नियम १९८४ मधील तक्ता सुधारण्यात आला आहे.

**महागाई वाढ:**

१०. या आदेशानुसार अनुज्ञेय होणा-या निवृत्तीवेतनावर दि.१.१.२००६ नंतरची महागाई वाढ सुधारित पध्दतीनुसार खालीलप्रमाणे दिली जाईल.

| अ.क्र. | कालावधी | महागाई वाढीचा मासिक दर |
|---|---|---|
| १ | दि.१ जानेवारी २००६ पासून | ० % |
| २ | दि.१ जुलै २००६ पासून | २ % |
| ३ | दि.१ जानेवारी २००७ पासून | ६ % |
| ४ | दि.१ जुलै २००७ पासून | ९ % |
| ५ | दि.१ जानेवारी २००८ पासून | १२ % |
| ६ | दि.१ जुलै २००८ पासून | १६ % |

११. निवृत्तीवेतनधारक/कुटंबनिवृत्तीवेतनधारकांच्या निवृत्तीवेतन/कुटुंब निवृत्ती वेतनात दि.१.१.२००६ पासून सुधारणा करण्यात यावी. मात्र सुधारित वेतन संरचनेत निवृत्तीवेतन/कुटुंब निवृत्तीवेतनाचा प्रत्यक्ष लाभ दि.१.४.२००९ पासून अदा करण्यात यावा. त्यापूर्वीच्या थकबाकीच्या रकमेतून अंशराशीकरणाच्या सुधारित पध्दतीमुळे जादा प्रदानाची वसुली व शासन निर्णय, वित्त विभाग क्र.सेनिवे १००८/प्र.क्र.९९/सेवा ४ दिनांक २७ ऑक्टोबर, २००८ अन्वये मंजूर केलेल्या अग्रिमाची रक्कम दि.१.१.२००६ ते दि.३१.३.२००९ या कालावधीत अनुज्ञेय थकबाकीच्या सुरुवातीच्या वर्षात समायोजित करण्यात यावी. उर्वरित थकबाकीची रक्कम पुढील पाच वर्षात समान हप्त्यात रोखीने अदा करण्यात यावी.

१२. दिनांक १.१.२००६ रोजी किंवा त्यानंतर निवृत्त झालेल्या होणा-या/सेवेत असताना मृत्यु पावलेल्या राज्य शासकीय कर्मचा-यांच्या बाबतीत निवृत्तीवेतनविषयक लाभांचे निर्धारण व प्राधिकृती याबाबत महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम,१९८२ आणि महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण) नियम १९८४ मध्ये विहित केलेली नेहमीची कार्यपध्दती अवलंबिण्यात यावी.

१३. शासन असाही आदेश देत आहे की, ज्यांना निवृत्तीवेतन योजना लागू केलेली आहे अशा मान्यता व अनुदानप्राप्त शैक्षणिक संस्था,कृषितरे विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्न असलेली अशासकीय महाविद्यालये व कृषि विद्यापीठे यामधील निवृत्तीवेतनधारक यांना वरील निर्णय, योग्यत्या फेरफारासह लागू राहतील.

१४. महाराष्ट्र नागरी सेवा( निवृत्तीवेतन) नियम,१९८२ आणि महाराष्ट्र नागरी सेवा ( निवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण)नियम,१९८४मधील या संबंधीच्या विद्यामान तरतुदींमध्ये स्वतंत्रपणे सुधारणा करण्यात येत आहे. महाराष्ट्र नागरी सेवा ( निवृत्तीवेतन) नियम, १९८२ आणि महाराष्ट्र नागरी सेवा ( निवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण ) नियम,१९८४ मधील ज्या तरतुदींमध्ये या आदेशान्वये स्पष्टपणे सुधारणा करण्यात आलेल्या नाहीत त्या अबाधित राहतील.

१५. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम १९६१( सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक पाच) च्या कलम २४८ च्या परंतुकान्वये प्रदान केलेले अधिकार आणि त्यासंबंधीचे इतर सर्व अधिकार याचा वापर करून शासन असाही आदेश देत आहे की, वरील निर्णय जिल्हा परिषदांचे निवृत्तीवेतनधारक यांनाही लागू राहतील.

१६. यासंबंधीचा खर्च वरील परिच्छेदात नमूद केलेल्या निवृत्तीवेतनधारकांचे निवृत्तीवेतन ज्या अर्थसंकल्पीय शिर्षाखाली खर्ची टाकण्यात येतो त्या शिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो त्या त्या शिर्षातंर्गत मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा. तथापि, आवश्यक असल्यास संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी वरील निवृत्तीवेतनधारकांसंबंधीचा खर्च भागविण्यासाठी विधीमंडळाच्या येत्या अधिवेशनात पूरक मागणी सादर करण्यासाठी आवश्यकती कार्यवाही करावी.

१७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या **www.maharashtra.gov.in** या वेब साईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २००९०६२३१२३४२६००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने ,

निलेश बा. वाडेकर,
शासनाचे उप सचिव.

*( **टीप:** याच संदर्भात दिनांक ३० ऑक्टोबर,२००९ चे सुधारित शासन आदेश पहावेत. (पान क्र. ६५८)*

*विवाम.*

## जोडपत्र १ ( ANNEXURE – I )

**COMMUTATION VALUE FOR A PENSION OF RS. 1 PER ANNUM.**

| Age next Birthday | Commutation Value expressed As number of Years's purchase | Age next Birthday | Commutation Value expressed As number of Years's purchase |
|---|---|---|---|
| 20 | 9.19 | 52 | 8.708 |
| 21 | 9.187 | 53 | 8.724 |
| 22 | 9.186 | 54 | 8.678 |
| 23 | 9.185 | 55 | 8.627 |
| 24 | 9.184 | 56 | 8.572 |
| 25 | 9.183 | 57 | 8.512 |
| 26 | 9.182 | 58 | 8.446 |
| 27 | 9.180 | 59 | 8.371 |
| 28 | 9.178 | 60 | 8.287 |
| 29 | 9.176 | 61 | 8.194 |
| 30 | 9.173 | 62 | 8.093 |
| 31 | 9.169 | 63 | 7.982 |
| 32 | 9.164 | 64 | 7.862 |
| 33 | 9.159 | 65 | 7.731 |
| 34 | 9.152 | 66 | 7.591 |
| 35 | 9.145 | 67 | 7.431 |
| 36 | 9.136 | 68 | 7.262 |
| 37 | 9.126 | 69 | 7.083 |
| 38 | 9.116 | 70 | 6.897 |
| 39 | 9.103 | 71 | 6.703 |
| 40 | 9.090 | 72 | 6.502 |
| 41 | 9.075 | 73 | 6.296 |
| 42 | 9.059 | 74 | 6.085 |
| 43 | 9.040 | 75 | 5.872 |
| 44 | 9.019 | 76 | 5.057 |
| 45 | 8.996 | 77 | 5.443 |
| 46 | 8.971 | 78 | 5.229 |
| 47 | 8.943 | 79 | 5.018 |
| 48 | 8.913 | 80 | 4.812 |
| 49 | 8.881 | 81 | 4.611 |
| 50 | 8.846 | | |
| 51 | 8.808 | | |

******

# कोषागारातील निवृत्ती वेतन प्रदानाच्या कार्यपध्दतीत सुधारणा करणेबाबत.

वित्त विभाग ,

शासन परिपत्रक ,क्रमांक संकीर्ण १००९/प्र.क्र.३१/कोषा प्रशा-५, दिनांक २४ जून , २००९.

प्रस्तावना:- राज्यातील सर्व कोषागार कार्यालयातील निवृत्तीवेतन विभागामार्फत राज्य व केंद्र शासनाच्या निवृत्तीवेतनधारकांना दरमहा निवृत्तीवेतन तसेच कुटुंब निवृत्तीवेतन अदा केले जाते.जिल्हा कोषागार कार्यालयामध्ये त्यासाठी " अप्पर कोषागार अधिकारी "( निवृत्ती वेतन) यांच्या नियंत्रणाखाली हा विभाग कार्यरत आहे. सध्याच्या कार्यपध्दतीमध्ये निवृत्ती वेतन विभागामध्ये तयार झालेल्या देयकांसाठी टोकन नोंदवही ठेवण्यात येत नसल्याने देयक काऊंटरला त्या देयकाचा खरेपणा तपासता येत नाही. तसेच काही प्रसंगी देयकाचा शोष घेणे शक्य होत नाही. निवृत्ती वेतन विभागामध्ये तयार करण्यात आलेल्या देयकांची तपासणी ( स्क्रोल झाल्यानंतर) निवृत्तीवेतन विभागातच होते. सदर तपासणी अधिक प्रभावी व पारदर्शी पध्दतीने होण्याकरिता इतर देयकांप्रमाणेच निवृत्तीवेतन व तद्संबंधित देयके कोषागारांच्या लेखा परिक्षण शाखांमार्फत होणे आवश्यक आहे.

खोटया /बोगस निवृत्तीवेतन विषयक देयकांना प्रतिबंध करणे, ट्रेझरीनेट प्रणाली व पेन्शन ॲटोमेशन सिस्टीम प्रणालीमध्ये सुसुत्रता व एकजिनसीपणा आणणे, निवृत्ती वेतन विभागातील कामाचे स्वरुप अधिक जबाबदारीपूर्ण व पारपदर्शक बनविणे. या सर्व बाबींचा विचार करुन कार्यपध्दत बदल करण्याचे शासनाच्या विचाराधीन होते यासाठी खालीलप्रमाणे सुधारीत कार्यपध्दतीची अंमलबजावणी करण्यात यावी.

## परिपत्रक

देयके तयार करणे :-

दरमहा निवृत्ती वेतनाची देयके व सुधारित वेतन विषयक फरकाची देयके आज्ञावलीव्दारेच तयार करावीत. पेन्शन ऑटोमेशन सिस्टीम **(PAS)** प्रमाणलीमधून तयार होणा-या बदल विवरणपत्र **(change statement )** आधारे तपासणी करून अप्पर कोषागार अधिकारी ( नि.वे.) यांनी देयकांवर आहरण व संवितरण अधिकारी म्हणून स्वाक्षरी करावी.

देयके कोषागारात सादर करणे :-

प्रदानासाठी कोषागारात देयक सादर करण्यासाठी अप्पर कोषागार अधिकारी यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात यावे. निवृत्ती वेतन विभागातील सर्व देयके टोकन रजिस्टरमध्ये नोंदवून अप्पर कोषागार अधिकारी यांच्या सहीने कोषागारात सादर करण्यात येतील. देयकासोबत **BEAMS** प्रणालीतून काढलेले प्राधिकार पत्र जोडणे आवश्यक राहील.

देयकांची तपासणी करणे :-

अप्पर कोषागार अधिकारी( निवृत्तीवेतन) यांनी सादर केलेली देयके **Scroll** झाल्यानंतर कोषागार कार्यालयाच्या लेखा परीक्षण शाखेत सादर होतील. लेखा परीक्षण विभागामध्ये देयकाचा खरेपणा, सहीचा

नमूना तपासून खात्री करण्यात यावी. देयकातील निवृत्तीवेतन धारकांची माहिती तपासण्यासाठी लेखा परिक्षण विभागाला PAS प्रणालीतील डेटा तपासण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात यावी. अप्पर कोषागार अधिकारी (लेखा परिक्षण) निवृत्तीवेतनाची देयके पारीत करण्यास सक्षम प्राधिकारी असेल.

देयके पारीत झाल्यानंतर:-

देयके पारीत झाल्यानंतर प्रथम प्रदानाचा इलेक्ट्रानिक डेटा दरमहा महालेखापाल कार्यालयास पाठविण्यात यावा. इलेक्ट्रॉनिक डेटाव्दारे महालेखापाल कार्यालयास प्राप्त झालेल्या व कोषागारातून प्रदान झालेल्या उपदान व अंशराशीकरण प्राधिकराची सत्यता उपदान प्रदान आदेश **(Gratuity Payment Order )** व सेवा निवृत्ती वेतन प्रदान आदेश **(Pension Payment Order )** क्रमांकाव्दारे तपासण्यात येईल.

**PAS प्रणालीवरील प्रभावी नियंत्रण ठेवणे:-**

नवीन निवृत्ती वेतन धारकांच्या महालेखापालांकडून प्राप्त झालेल्या इलेक्ट्रॉनिक डेटा व प्रत्यक्ष **PPO** याची तपासणी अप्पर कोषागार अधिकारी (निवृत्तीवेतन) यांनी करावी. दरमहा बदल विवरणपत्र **(Change statement )** अप्पर कोषागार अधिकारी ( निवृत्तीवेतन) यांनीच काढावे व प्रत्यक्ष तपासून त्याआधारे देयकावर स्वाक्षरी करावी. पासवर्ड ठरावीका कालांतराने बदलले जातील याकडे अप्पर कोषागार अधिकारी (निवृत्तीवेतन) यांनी नियंत्रण ठेवावे.

सदर बदलांमुळे निवृत्ती वेतन विभागातून खोटी अथवा बोगस देयके तयार करणे व सादर करणे याची शक्यता कमी होईल. अप्पर कोषागार अधिकारी ( निवृत्तीवेतन) यांना आहरण व संवितरण अधिकारी घोषित केल्यामुळे देयकांचा खरेपणा देयक स्विकृती काउंटतरलाच समजू शकेल. PAS मधून तयार होणा-या बदल विवरणपत्र **(Change statement )** वर अप्पर कोषागार अधिकारी ( निवृत्तीवेतन) यांचे प्रभावी नियंत्रण राहील्याने बोगस निवृत्ती वेतन लाभाच्या प्रदानावर प्रभावी आळा बसेल. उपदान प्रदान आदेश/सेवा निवृत्ती वेतन/सुधारित सेवा निवृत्ती वेतन प्रदान आदेश प्रथम प्रदानाच्या प्राधिकाराची महालेखापाल कार्यालयात छाननी झाल्याने खोटया अथवा बोगस देयकांना प्रतिबंध होईल.

उपरोक्त सूचना/ उपाययोजनांचे काटेकोरपणे अंमलबजावणी करून निवृत्तीवेतन धारकांचे/कुटुंब निवृत्तीवेतन व तत्सम देयके पारीत करण्यात यावीत. उपरोक्त सूचना आदेश निर्गमित झाल्याचे दिनांकापासून अंमलात येतील.

सदर परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या **www.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून याचा संगणक संकेतांक २००९०६२४१४०८५४००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने ,

स.अ.मु.नकवी,
उप सचिव.

******

विबाम.

## दिनांक १ जानेवारी २००६ पूर्वीच्या निवृत्तीवेतनधारकांच्या निवृत्तीवेतनात/कुटुंबनिवृत्तीवेतनात सुधारणा करण्याबाबत.

वित्त विभाग,
शासन शुध्दीपत्रक क्र.सेनिवे १००९/प्र.क्र.२९/सेवा ४ दि. ०७ जुलै,२००९.

संदर्भ: १) शासन निर्णय, वित्त विभाग क्र. सेनिवे १००९/प्र.क्र.२९/सेवा ४ दि. ०५ मे,२००९.
२) शासन शुध्दीपत्रक, वित्त विभाग क्र.सेनिवे १००९/प्र.क्र.३३/सेवा ४ दिनांक २२ जून,२००९.

शुध्दीपत्रक

दिनांक १/१/२००६ पूर्वी सेवानिवृत्त झालेल्या निवृत्तीवेतनधारकांच्या निवृत्तीवेतनात सुधारणा करण्याबाबतच्या संदर्भाधिन क्र.१ मधील दि.५/५/२००९ च्या शासन परिच्छेद ३ नंतर खालील तरतुदीचा समावेश करण्यात येत आहे.

परिच्छेद २ (बी ) मध्ये उल्लेख केलेल्या विद्यमान निवृत्तीवेतनातील ज्या प्रकरणात दिनांक १.८.२००४ पासून ५० % महागाई वेतनाचा समावेश मूळ निवृत्तीवेतनात आहे. त्या प्रकरणात हे ५०% महागाई वेतन निवृत्तीवेतनातून वगळून उर्वरित निवृत्तीवेतनावर ४० % वाढ ( फिटमेंट वेटेज ) परिगणित करण्यात यावी. त्यानुसार दिनांक १.८.२००४ रोजी किंवा त्यानंतर सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-यांच्या प्रकरणी संदर्भाधिन क्र.१ मधील दि.५.५.२००९ च्या शासन निर्णयातील परिच्छेद ३ मध्ये दिलेल्या उदाहरणानुसार सेवानिवृत्तीवेतन पुन:र्निश्चित करावे.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या **www.maharashtra.gov.in** या वेब साईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २००९०७०७१६४०५४००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने ,

निलेश बा.वाडेकर,
शासनाचे उप सचिव.

******

विबाम.

## असुधारित वेतनश्रेणीत निवृत्तीवेतन /कुटुंबनिवृत्तीवेतन घेणा-या निवृत्तीवेतन/कुटुंबनिवृत्तीवेतनावरील महागाई वाढ.

वित्त विभाग,
शासन निर्णय क्र.निमवा १००९/प्र.क्र.८०/सेवा ४ दि.७ नोव्हेंबर,२००९.

पहा: १) शासन निर्णय वित्त विभाग क्र.निमवा १००८/९८/सेवा ४ दि.१६.१०.२००८.
२) शासन निर्णय वित्त विभाग क्र.मभवा ११०९/९६/सेवा ९ दि.२२ जुलै, २००९.

-: निर्णय :-

शासन असा आदेश देत आहे की, असुधारित वेतनश्रेणीत निवृत्तीवेतन/कुटुंबनिवृत्तीवेतन घेणा-या राज्य शासकीय निवृत्तीवेतनधारक/कुटुंबनिवृत्तीवेतनधारकांना त्यांच्या मूळ निवृत्तीवेतन /कुटुंबनिवृत्तीवेतन आणि महागाई निवृत्तीवेतन/महागाई कुटुंब निवृत्तीवेतन (असल्यास) यांच्या एकूण रकमेवर दि. १ जानेवारी २००९ पासून ६४ टक्के दराने महागाई वाढ देण्यात यावी.

२. रुपयाच्या अपूर्णांकात असलेली महागाई वाढीची रक्कम देताना ती पुढील रुपयात पूर्णांकित करावी.

३. प्रत्येक वैयक्तिक प्रकरणी देय होणा-या महागाई वाढीच्या रकमेची परिगणना करण्याची जबाबदारी ही निवृत्तीवेतन संवितरण प्राधिकारी म्हणजे यथास्थिती अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई/कोषागार अधिकारी यांची राहील.

४. शासन असाही आदेश देत आहे की, ज्यांना निवृत्तीवेतन योजना लागू केलेली आहे अशा मान्यता व अनुदानप्राप्त शैक्षणिक संस्था, कृषितर विद्यापीठे व त्यांच्याशी सलंग्न असलेली अशासकीय महाविद्यालये व कृषि विद्यपीठे यांमधील निवृत्तीवेतनधारक/कुटुंबनिवृत्तीवेतनधारक यांना वरील निर्णय योग्य त्या फेरफारासह लागू राहील.

५. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम १९६१ (सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक पाच) कलम २४८ च्या परंतुकान्वये प्रदान केलेले अधिकार आणि त्यासंबंधातील इतर सर्व अधिकार यांचा वापर करुन शासन असाही आदेश देत आहे की, वरील निर्णय जिल्हा परिषदांचे निवृत्तीवेतनधारक /कुटुंबनिवृत्तीवेतनधारक यांनाही लागू राहील.

६. ज्या राज्य शासकीय कर्मचा-यांनी सरकारी क्षेत्रातील उपक्रमांमध्ये/स्वायत्त संस्थांमध्ये /स्थानिक संस्था इत्यादींमध्ये स्वत:ला सामावून घेतल्यानंतर एक रकमी ठोक रक्कम स्वीकारलेली आहे व जे निवृत्तीवेतनाच्या १/३ इतका अंशराशीकृत भाग पुन:स्थापित करण्यासाठी तसेच शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक निअंक १०९९/ ३०६ / सेवा-४, दि. १५.११.१९९९ अनुसार अंशराशीकृत रकमेच्या सुधारणेस पात्र ठरले आहेत, अशा कर्मचा-यांनाही शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक निअंक १००१/५०/सेवा ४ दिनांक ९.४.२००१ च्या तरतूदीनुसार त्यांच्या पूर्ण निवृत्तीवेतनावर वरील परिच्छेद - १ मध्ये विहित केलेल्या दिनांकापासून व विहित दराने महागाई वाढ अनुज्ञेय राहील.

७. यासंबंधीचा खर्च वरील परिच्छेदांत नमूद केलेल्या निवृत्तीवेतनधारकांची निवृत्तीवेतने ज्या अर्थ संकल्पीय शीर्षाखाली खर्ची टाकण्यात येतात,त्या शीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो त्या त्या शीर्षा खाली मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

८. शासनाने वेळोवेळी मंजूर केलेल्या निवृत्तीवेतनावरील महागाई वाढी देण्याबाबतचे सध्या अस्तित्वात असलेले सर्व आदेश, *योग्य त्या फेरफारांसह,* आता मंजूर केलेल्या महागाई वाढीस देखील लागू राहतील.

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या **www.maharashtra.gov.in** या वेब साईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २००९११०७१४०००१००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने ,

निलेश बा.वाडेकर,
शासनाचे उप सचिव.

******

## अर्जित रजेचे रोखीकरण सुधारीत वेतन संरचनेनुसार करण्याबाबत.

वित्त विभाग शासन पूरक पत्र क्र.अरजा-२००९/प्र.क्र.२१/०९/सेवा-६, दि.**१० नोव्हेंबर,२००९.**

**वाचा :** शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.अरजा-२००९/प्र.क्र.२१/०९/सेवा-६ दि.२७.८.२००९.

**पूरक पत्र**

*उपरोक्त शासन निर्णय दिनांक २७ ऑगस्ट २००९ मधील परिच्छेद २ नंतर खालील परिच्छेद वाचावा.*

" २(अ)- वरील परिच्छेद -२ मध्ये नमूद केलेल्या शासकीय कर्मचा-यांचे सुधारीत वेतन संरचनेतील " वेतन " विचारात घेऊन त्यांना नियमाप्रमाणे अनुज्ञेय असलेल्या शिल्लक अर्जित रजेच्या संबंधातील रजा वेतनाची सममूल्य रोख रक्कम एका ठोक रक्कमेत रोखीने प्रदान करण्यात यावी. जर सदर कर्मचा-यास असुधारित वेतनश्रेणीतील वेतनाच्या आधारे शिल्लक अर्जित रजेच्या रोख सममूल्याची रक्कम अदा केली असल्यास त्यांना फरकाची रक्कम एका ठोक रक्कमेत रोखीने प्रदान करण्यात यावी."

२. सदर शासन पूरक पत्र महाराष्ट्र शासनाच्या**www.maharashtra.gov.in** या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २००९११०९१७०२५२००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने ,

नमिता नं.पाटील,
शासनाच्या उप सचिव.

******

## दिनांक १ जानेवारी २००६ पूर्वीच्या निवृत्तीवेतनधारकांच्या निवृत्तीवेतनात/कुटुंबनिवृत्तीवेतनात सुधारणा करण्याबाबत.

वित्त विभाग,
शासन शुध्दीपत्रक क्र.सेनिवे १००९/प्र.क्र.२९/सेवा-४ दिनांक १२ नोव्हेंबर,२००९.

संदर्भ : १) शासन निर्णय,वित्त विभाग,क्र.सेनिवे १००९/प्र.क्र.२९/सेवा ४ दि.५ मे,२००९.
२) शासन शुध्दिपत्रक,वित्त विभाग क्र.सेनिवे १००९/प्र.क्र.२९/सेवा ४ दि.२२ जून,२००९.
३) शासन शुध्दिपत्रक,वित्त विभाग क्र.सेनिवे १००९/प्र.क्र.२९/सेवा ४ दि.०७ जुलै,२००९.

### -: शुध्दीपत्रक :-

दिनांक १/१/२००६ पूर्वी सेवानिवृत्त झालेल्या निवृत्तीवेतनधारकांच्या निवृत्तीवेतनात सुधारणा करण्याबाबतच्या संदर्भाधिन क्रमांक १ मधील दि.५.५.२००९ च्या शासन निर्णयाच्या परि.३ मधील उदाहरणातील (क) येथे उल्लेखिलेल्या २४ % महागाई भत्ता संदर्भात खुलासा खालीलप्रमाणे आहे :-

निवृत्तीवेतनधारक/कुटुंबनिवृत्तीवेतनधारकांना प्रत्यक्षात २४ % महागाई वाढ दिनांक १ मे २००६ पासून मंजुर करण्यात आली असली तरी दिनांक १ जानेवारी २००६ पासून एकत्रित निवृत्तीवेतन/कुटुंबनिवृत्तीवेतनाची परिगणना करताना २४% महागाई वाढ विचारात घेण्यात आलेली आहे.

२. संदर्भाधीन क्रमांक १ मधील दिनांक ५.५.२००९ च्या शासन निर्णयासोबतच्या जोडपत्र-१ मधील शीघ्रगणकातील ज्या निवृत्तीवेतन/कुटुंब निवृत्तीवेतनाची परिगणना अपूर्णाकात आल्याने येणारे एकत्रित निवृत्तीवेतन/ कुटुंबनिवृत्तीवेतन मागील रुपयात पूर्णांकित करण्यात आले आहे. अशा प्रकरणात निवृत्तीवेतन/कुटुंबनिवत्तीवेतनाची परिगणना पुढील रुपयात पुर्णांकित करण्यात येऊन त्याप्रमाणे निवृत्तीवेतन/कुटुंबनिवृत्तीवेतनात सुधारणा करण्यात यावी.

३. सदर शासन शुध्दिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेब साईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २००९१११२१३०२२३००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने ,

निलेश बा. वाडेकर,
शासनाचे उप सचिव.

******

विवाम.

## निवृत्ती वेतनविषयक प्रकरणे/मा.लोकआयुक्त संदर्भ त्वरेने हाताळण्याबाबत.

ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
परिपत्रक क्रमांक सेनिवे २००९/प्र.क्र.१८१/आस्था-११, दिनांक १८ नोव्हेंबर,२००९.

वाचा: १) शासन परिपत्रक, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, क्रमांक सेनिवे-१000/प्र.क्र.१४९/ आस्था-११, दिनांक २२.११.२००७.

परिपत्रक:- सेवानिवृत्त जिल्हा परिषद कर्मचा-यांना तसेच त्यांच्या वारसांना निवृत्तीवेतन/कुटुंब निवृत्तीवेतन विषयक लाभ वेळेवर अदा करण्याबाबत शासन वारंवार सूचना देत असते.तरी देखील जिल्हा परिषद कार्यालयांकडून त्याची गांर्भीयाने दखल घेतली जात नाही. कर्मचारी सेवानिवृत्त होण्यापूर्वी ६ महिन्यांच्या आत त्यांचे सेवानिवृत्तीचे प्रकरण सक्षम प्राधिका-याकडे मंजूरीसाठी सादर केले जात नाही. काही प्रकरणे सेवानिवृत्तीनंतरही १-२ वर्षे अंतिम होत नाहीत. विभागीय चौकशी /न्यायिक प्रकरणे अशा प्रकारची वर्जित प्रकरणे वगळता कर्मचा-यांना सेवानिवृत्तीच्या दिनांकास निवृत्ती वेतनादी लाभ दिले गेले पाहिजेत. काही प्रकरणांमध्ये कर्मचा-यांकडून शासनास येणे असलेल्या रकमांच्या कारणास्तव प्रलंबित राहतात. अशा प्रकरणांमध्ये संबंधित कर्मचा-यांना त्या संबंधीची नोटीस पाठवून कर्मचा-यांकडे पाठपुरावा करणे आवश्यक आहे. कर्मचा-यास त्याच्याकडून कागदपत्रांच्या पूर्ततेअभावी निवृत्ती वेतन अंतिमत: निकाली काढण्यास विलंब होत असेल तर त्यास स्पष्टपणे तसे कळवावे. कर्मचा-यांकडून कागदपत्रांची पूर्तता होताच विनाविलंब प्रकरण अंतिमत: निकाली काढावे.

२. कर्मचा-यांस सेवानिवृत्तीनंतर आर्थिक विवंचना भासू नये, याची काळजी प्रशासनातील सर्व संबंधितांची आहे. त्यास हक्काच्या रकमा वेळेत दिल्यास कर्मचा-यास त्याला व त्यांच्या कुटुंबियांस मानसिक व आर्थिक त्रास होणार नाही. वेळच्यावेळी अशा निवृत्ती वेतनादी रकमा अदा केल्यास प्रशासनाविषयी गैरसमज होत नाही.

३. प्रलंबित निवृत्ती वेतनविषयक प्रकरणांचा आढावा उप मुख्य कार्यकारी अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग यांनी दर पंधरा दिवसांनी तसेच उप आयुक्त (आस्थापना) यांनी दर महिन्यात आढावा घेऊन प्रलंबित प्रकरणांचा निपटारा होईपर्यन्त पाठपुरावा करावा.

४. निवृत्ती वेतनादी लाभ वेळेत मिळाले नाहीत तर वरिष्ठ अधिकारी शासन मा.लोकआयुक्त,मा. न्यायालय इ.कडे संबंधित तक्रार अर्ज करतात. त्यामुळे निवृत्ती वेतनादी लाभांबाबतच्या किरकोळ बाबींमुळे खालच्या स्तरावरील कार्यालयातील कर्मचा-यांपासून शासनापर्यन्तच्या प्रत्येक टप्प्यावर कार्यालयांच्या वेळेचा अपव्यय होतो. त्यामुळे निवृत्ती वेतनादी प्रकरणे वेळच्यावेळी हाताळणे आवश्यक आहे. तक्रारदाराच्या तक्रार अर्जासंबंधी मा. लोक आयुक्त कार्यालय जिल्हा परिषदांकडून परस्पर अहवाल मागविते. त्यासंबंधातील काही प्रकरणांमध्ये असे आढळून आले आहे की, मा.लोक आयुक्त कार्यालयाकडून वारंवार स्मरणपत्रे पाठवूनही त्यांच्याकडे अहवाल पाठव्लि जात नाहीत. अंतरिम उत्तर देखील पाठविले जात नाही. त्यानंतर मा. लोक

आयुक्त शासनाकडून त्यासंबंधीचा अहवाल मागवितात. मा.लोक आयुक्त कार्यालयाकडील प्रकरणे वेळेवर हाताळली जात नाहीत ही अत्यंत गंभीर बाब आहे. मा.लोक आयुक्त प्रकरणांवर विधानसभा/विधान परिषद प्रश्नांप्रमाणे कार्यवाही करण्याच्या सूचना यापूर्वी वेळोवेळी दिलेल्या ाहेत. तरीदेखील जिल्हा परिषदाकडून काही प्रकरणांमध्ये २-३ वर्षे कार्यवाही अंतिम केली जात नाही अथवा त्या संबंधी अहवाल पाठविले जात नाहीत.मा. लोक आयुक्तांकडे वेळीच अहवाल पाठविले न गेल्याने प्रकरणे सुनावणीसाठी ठेवली जातात.प्रकरणे संपूर्णत: जिल्हा परिषद स्तरावर हाताळली जात असल्याने जिल्हा परिषदेच्या संबंधित अधिका-यांना देखील सुनावणीसाठी बोलवावे लागते व अशा किरकोळ बाबींसाठी देखील वेळेचा अपव्यय होतो.प्रकरणे जर विहित मुदतीत हाताळली तर या बाबी उद्‌भवणार नाहीत. कर्मचा-यांने मा. लोक आयुक्तांकडे तक्रार करुनही त्याचा निपटार होण्यासाठी गांभीर्याने पाहिले जात नाही. शिवाय अहवाल देखील त्रोटक स्वरुपाचे असतात त्यामुळे सेवानिवृत्त कर्मचा-यांच्या प्रकरणी अहवाल सादर करताना/निर्णय घेताना अडचणी येतात.यापुढे मा. लोक आयुक्तांकडे तक्रारदारांच्या तक्रार अर्जासंबंधी मुद्देनिहाय अहवाल विहित मुदतीत पाठविण्याची दक्षता सर्व संबंधितांनी घ्यावी. तसेच सेवानिवृत्ती विषयक सर्व प्रकरणांमध्ये शासनाकडे अहवाल पाठविताना खालील बाबींची पूर्तता करावी.

कर्मचा-याचे नांव: ............................................
नियुक्तीचा दिनांक :..................................................
सेवानिवृत्तीचा दिनांक : ..........................................

| अ. क्र. | अनुज्ञेय लाभ | अदा केलेली रक्कम रुपये | अदा केल्याचा दिनांक | व्याजाची परिगणना सेवानिवृत्तीनंतर सुरु होण्याचा कालावधी | देय व्याज रुपये | अभिप्राय विलंबाची कारणे इ. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | निवृत्तीवेतन | | | सहा महिन्यांच्या कालावधीनंतर (*) | | |
| २ | भविष्य निर्वाह निधी | | | सहा महिन्यांनतर (*) | | |
| ३ | सेवा उपदान | | | | | |
| ४ | गट विमा योजना | | | तीन महिन्यांनतर (*) | | |
| ५ | अंश राशीकरण | | | व्याज अनुज्ञेय नाही (*) | | |
| ६ | रजा रोखीकरण | | | एक महिन्यानंतर (*) | | |
| ७ | ठेव संलग्न योजना | | | | | |
| ८ | स्वग्राम प्रवासभत्ता देयक | | | | | |
| ९ | इतर | | | | | |

* कंसात प्रकरण निहाय दिनांक दर्शवावा.

.

विवाम.

५. जिल्हा परिषदेतील सर्व विभाग प्रमुख, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.वि.) जिल्हा परिषदा व उपायुक्त (आस्थापना) विभागीय आयुक्त कार्यालय यांनी देखील त्यांच्या स्तरांवरील प्रकरणांमध्ये वरील बाबींची पूर्तता होण्याच्या दृष्टीने प्रकरणे तपासावीत. विलंबास जबाबदार असलेल्या सर्व संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन शिस्तभंगाची कारवाई करावी.

६. सेवाविषयक बाबींविषयक नियम, शासन निर्णय, परिपत्रके स्वयंस्पष्ट आहेत. तरीदेखील प्रकरणे विनाकारण मार्गदर्शनासाठी पाठविली जातात. त्यामुळे प्रकरणे निकालात निघताना विनाकारण विलंब होतो. त्यासाठी निवृत्ती वेतनादी लाभ मंजूर करण्यास सक्षम असलेल्या प्राधिका-याने त्यांच्या स्तरावरच निर्णय घेऊन प्रकरण अंतिमत: निकाली काढावे. निवृत्ती वेतन विषयक व्याज मंजूर करण्याचे अधिकार विभागीय आयुक्तांना प्रदान केले आहेत. तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा नियम,१९६८ मधील नियमामुसार वर्ग ३ व वर्ग ४ च्या जिल्हा परिषद कर्मचा-यांचे सेवाविषयक बाबीसंदर्भात शासनास असलेले अधिकार विभागीय आयुक्त यांना प्रदान करण्यात आले आहेत. त्यामुळे शासनाकडे विनाकारण प्रकरणे पाठविली जाणार नाहीत याची दक्षता जिल्हा परिषदांनी घ्यावी. विवक्षित प्रकरणात शासनाच्या मंजूरीची आवश्यकता असल्यास प्रकरणे विभागीय आयुक्तांमार्फतच पाठविण्याची दक्षता जिल्हा परिषदांनी घ्यावी.

७. सदर परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या **www. maharashtra.gov.in** या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २००९१११८१८५६३३००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने ,

राजेंद्र वाघ,
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

******

## दिनांक १ जानेवारी २००६ नंतरच्या निवृत्तीवेतनधारकांची निवृत्तीवेतन/ कुटुंबनिवृत्तीवेतन प्रकरणांच्या वेतन पडताळणीबाबत.

वित्त विभाग,

शासन परिपत्रक क्र.सेनिवे १००९/प्र.क्र.९१/सेवा-४, दिनांक ०८ डिसेंबर, २००९.

संदर्भ: १) शासन निर्णय,वित्त विभाग क्रमांक सेनिवे १००९/प्र.क्र.३३/सेवा-४दि.३०.१०.२००९.

## परिपत्रक

सहाव्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने दिनांक १ जानेवारी, २००६ नंतर सेवानिवृत्त झालेल्या निवृत्तीवेतन धारकांच्या निवृत्तीवेतनात/ कुटुंब निवृत्तीवेनात सुधारणा करण्याबाबतचे आदेश संदर्भाधिन शासन निर्णय दिनांक ३० ऑक्टोबर,२००९ अन्वये निर्गमित करण्यात आले आहेत.

२. दिनांक १ जानेवारी, २००६ पासून सुधारित वेतनसंरचनेमध्ये केलेल्या वेतननिश्चितीच्या पडताळणीचे काम विचारात घेऊन सध्या अस्तित्वात असलेली वेतन पडताळणी पथके पुढे चालू ठेवण्याचा,बंद करण्यात आलेली वेतन पडताळणी पथके पुनर्जिवित करण्याचा तसेच स्वतंत्र वेतन पडताळणी पथक स्थापन करण्याचे आदेश शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक १००९/प्र.क्र.१६९/सेवा -९, दिनांक ६ नोव्हेंबर,२००९ अन्वये निर्गमित करण्यात आले आहेत. तथापि या पथकाकडे असलेल्या प्रकरणांची संख्या विचारात घेता सेवानिवृत्त कर्मचा-याच्या वेतन निश्चितीच्या पडताळणीस विलंब लागण्याची शक्यता असल्याने या पथकांकडे निवृत्तीवेतनधारकांची वेतननिश्चिती प्रकरणे सादर न करता स्वतंत्र व्यवस्था करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

३. दिनांक १ जानेवारी, २००६ नंतर सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-यांच्या वेतन निश्चितीची पडताळणी करिता खालील कार्यपध्दती विहित करण्यात येत आहे.

१) संबंधित निवृत्तीवेतनधारकाची वेतननिश्चिती ज्या कार्यालयाने केली आहे, त्या कार्यालयाच्या एक टप्पा वरिष्ठ स्तरावरुन वेतन पडताळणी करावी. म्हणजेच तालुका व जिल्हा स्तरावरील कार्यालयांनी केलेल्या वेतननिश्चिती पडताळणी प्रादेशिक कार्यालयाने, प्रादेशिक कार्यालयाने केलेल्या वेतननिश्चिती पडताळणी विभाग प्रमुख कार्यालयाने, विभाग प्रमुख कार्यालयाने केलेल्या वेतननिश्चितीची पडताळणी मंत्रालयीन प्रशासकीय विभागाने व मंत्रालयीन प्रशासकीय विभागाने केलेल्या वेतननिश्चितीची पडताळणी लेखा व कोषागारे संचालनालयाने करावी. यासाठी प्रत्येक मंत्रालयीन प्रशासकीय विभागाने प्रत्येक स्तरावर अर्थात प्रादेशिक स्तर, विभाग प्रमुख स्तर व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग स्तरावर विशिष्ट अशा कर्मचारी वर्गावर नावाने ही जबाबदारी सोपवावी व तसे महालेखापाल, मुंबई/नागपूर, संचालक, लेखा व कोषागारे व वित्त विभाग यांना कळवावे. ही कार्यवाही १५ दिवसात पूर्ण करावी.

२) वरिलप्रमाणे केलेल्या वेतननिश्चितीबाबतची नोंद सेवापुस्तकात घेऊन निवृत्तीवेतन/कुटुंब निवृत्तीवेतनाची प्रकरणे सोबतच्या जोडपत्र १(इंग्रजी) मध्ये सर्व माहिती भरुन महालेखापालांकडे सादर करावीत.

३) उपरोक्त कार्यपध्दतीनुसार प्राप्त होणारी प्रकरणे महालेखापाल कार्यालयीने प्राधिकृत करावीत.

४) दिनांक १ जानेवारी,२००६ ते ३१ मार्च,२०१० पर्यन्त सेवानिवृत्त झालेल्या/होणा-या कर्मचा-यांच्या निवृत्तीवेतन/कुटुंब निवृत्तीवेतनाच्या प्रकरणांबाबत ही कार्यवाही अवलंबिण्यात यावी.

५) उपरोक्त कार्यवाही प्राथम्याने करावी.

६) संबंधित कार्यालयांनी या प्रकरणांची वेतन पडताळणी पथकाकडून कार्योत्तर पडताळणी ( **post verification** ) करुन घेण्यात यावी. अशा प्रकारे कार्योत्तर पडताळणी ( **post verification**) करण्यासाठी विभागांनी पडताळणी केलेल्या वेतन निश्चिती प्रकरणांची माहिती संबंधित विभागाच्या वेतन पडताळणी पथकांकडे पाठवावी.

७) कार्यालय स्तरावरुन करण्यात आलेल्या वेतन निश्चितीमध्ये चूक झाल्याने निवृत्तीवेतनधारकास/कुटुंबनिवृत्तीवेतनधारकास अतिरिक्त प्रदान झाल्याचे कार्योत्तर पडताळणी मध्ये ( **post verification**) निदर्शनास आल्यास अतिरिक्त प्रदानाची रक्कम परत करण्याबाबतचे बंधपत्र वेतननिश्चिती करणा-या कार्यालयांनी संबंधित निवृत्तीवेतनधारक/ कुटुंबनिवृत्तीवेतनधारकांकडून प्राप्त करावे. बंधपत्राचा नमूना सोबतच्या जोडपत्र २ ( इंग्रजी) मध्ये दिला आहे.

८) कार्योत्तर पडताळणीमध्ये कार्यालय स्तरावरुन केलेली वेतन पडताळणी योग्य असल्याबाबतचे प्रमाणपत्र कार्यालयाने संबंधित महालेखापाल कार्यालयाकडे पाठवावे.

९) कार्यालय स्तरावरुन करण्यात आलेल्या वेतन पडताळणीमध्ये कार्योत्तर पडताळणीच्या वेळी त्रुटी आढळल्यास ( अतिरिक्त किंवा कमी प्रदान) संबंधित कार्यालयांनी ते प्रकरण निवृत्तीवेतनाच्या पुनर्निर्धारणासाठी संबंधित महालेखापाल कार्यालयाकडे पाठवावे.

१०) बंधपत्रानुसार वसुली करण्याची जबाबदारी कार्यालय प्रमुखाची राहील.

११) लेखा व कोषागारे संचालनालयाच्या अधिनस्त असलेल्या वेतन पडताळणी पथकांमार्फत दिनांक १ जानेवारी,२०६ ते दिनांक ३१ डिसेंबर,२००९ पर्यन्त सेवानिवृत्त झालेल्या/होणा-या ज्या निवृत्तीवेतनधारकांची वेतन पडताळणी करण्यात आली आहे त्या प्रकरणी उपरोक्त सूचनांनुसार पुन्हा वेतन पडताळणी करण्याची आवश्यकता नाही.

१२) दिनांक १ एप्रिल, २०१० पासून सेवानिवृत्त होणा-या कर्मचा-यांच्या प्रकरणी प्रचलित कार्यपध्दतीनुसार वेतन पडताळणीची कार्यवाही करावी.

४. हे शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या **www.maharashtra.gov.in** या वेब साईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २००९१२०९१९०८४९००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने ,

निलेश बा. वाडेकर,
शासनाचे उप सचिव.

******

विबाम.

( For post 2006 pensioners )

**ANNEXURE – I**

(As referred in paragraph 3 of Government Circular, Finance Department No.PEN/ 1009/CR-33/SER-4 (Marathi Version ) dated December 2009.)

| | |
|---|---|
| Name of the pensioner | |
| File ID | |
| Application No. | |
| DDO for Gratuity/DDO code | |
| Treasury Oficer for pension | |
| Date of retirement/Death<br>Name & Contact number of dealing clerk Accountant | |
| Mobile/Telephone No.of pensioners/family pensioner | |

**Details of Pay fixation from 01.01.2006.**

| **Pre-revised Pay scale 01.01.2006** | **Pay as on 01.01.2006** |
|---|---|
| | |

**Corresponding pay band in revised pay structure with applicable grade pay**

| **Revised Pay Band** | **Revised pay as on 01.01.2006** | **Pay** | **Grade Pay** |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |

| **Net Qualifying service** | | |
|---|---|---|
| Pension | **Final benefits authorized** | **Proposed revision as per 6th Pay Commission.** |
| Enhanced Family Pension | | |
| Family Pension | | |
| Provisional or Final gratuity paid | | |
| Commuted Pension | | |
| Commutation Factor | | |
| Commuted value of pension | | |
| Gratuity to be withheld | | |
| Recovery/MH of recovery | | |

**Note:** In case of death of pensioner, please forward a copy of death certificate,Death Gratuity nomination if made and form no.10 duly filed in by the gratuity nominee or else forward Form No. 10 duly filled by legal hairs as per the provision of Rule 112 MCS(P) Rules. Please note that all the documents are to be attested by the Competent pension sanctioning authority.

Singature of the Head of Department/Office
Place:
Date :

क्क्क्क्क्क

( For post 2006 pensioners )

## ANNEXURE – II

(As referred in paragraph 3 of Government Circular, Finance Department No.PEN/ 1009/CR-33/SER-4 (Marathi Version ) dated December 2009.)

I, ……………………………………………………………………………………
( Name of the pensioner/family pensioner)

hereby undertake that any excess payment that may be found to have been made as a result of incorrect fixation of pay / pension / family pension / gratuity / amount of commuted value of pension or any excess payment detected in the light of discrepancies noticed in this regard subsequently will be refunded by me to the Government by adjustment against or recovery from future payment due to me such as pension / family pension / gratuity / amount of commuted value of pension, if any.

**Date:** **Name and Signature of**

**Place** : **Pensioner/family pensioner**

To,

……………………………………………………………..
( Name & address of the Head of /Department/office )

******

विवाम .

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ मध्ये
सुधारणा करण्याबाबत.
दि.१ जानेवारी,२००६ नंतरच्या निवृत्तीवेतनधारकांच्या
निवृत्तीवेतनात/ कुटुंबनिवृत्तीवेतनात सुधारणा.

वित्त विभाग,
शुध्दिपत्रक क्र. सेनिवे १००९/प्र.क्र.३३/सेवा-४ दिनांक १५ डिसेंबर,२००९.

संदर्भ: १) शासन निर्णय, वित्त विभाग क्र.सेनिवे १००९/प्र.क्र.३३/सेवा ४ दिनांक ३०.१०.२००९.

: शुध्दिपत्रक :

दिनांक १ जानेवारी,२००६ नंतरच्या निवृत्तीवेतनधारकांच्या निवृत्तीवेतनात/कुटुंबनिवृत्तीवेतनात सुधारणा करण्याबाबतच्या संदर्भाधिन क्र.१ मधील दिनांक ३० ऑक्टोबर,२००९ च्या शासन निर्णयात खालील बदल करण्यात येत आहेत.

परि.३ नंतर खालीलप्रमाणे परि.३.१ चा समावेश करण्यात येत आहे.

- ३.१ दिनांक १ जानेवारी ,२००६ ते दिनांक २६ फेब्रुवारी,२००९ पर्यन्त सेवानिवृत्त झालेल्या शासकीय कर्मचा-यांची निवृत्तीवेतन प्रकरणे महालेखापाल कार्यालयाकडे पाठविण्यात आली नसल्यास ती प्रकरणे प्रथम असुधारित वेतन/ असुधारित नियमानुसार तयार करुन महालेखापाल कार्यालयाकडे सादर करावीत. निवृत्तीवेतनाच्या प्राधिकरणानंतर ही प्रकरणे शासन निर्णय,वित्त विभाग क्रमांक सेनिवे १००९/प्र.क्र.३३/सेवा-४ दिनांक ३० ऑक्टोबर,२००९ मधील तसेच या शुध्दिपत्रकातील तरतुदींनुसार सुधारित करण्यात यावीत.

परिच्छेद ४ मधील शेवटच्या वाक्यानंतर खालील वाक्याचा समावेश करण्यात येत आहे.:

- तथापि मूळ वेतनामध्ये व्यवसायरोध भत्त्याचा समावेश होईल.

परि.५ मधील शेवटच्या वाक्यानंतर खालील वाक्याचा समावेश करण्यात येत आहे.

- हे लाभ केवळ स्थायी/स्थायीकरणाचे लाभ दिलेल्या शासकीय कर्मचा-यांना लागू ठरतील.
- परि.५, ५.१ व ५.२ मध्ये उल्लेखिलेली जोडपत्र १,२ व जोडपत्र ३ रद्द करण्यात येत असून त्याऐवजी सुधारित जोडपत्र १, जोडपत्र २, जोडपत्र ३ ही शुध्दिपत्रकाच्या इंग्रजी प्रतीसोबत जोडल्याप्रमाणे असतील.
- इंग्रजी प्रतीच्या ५.१ मधील दुस-या ओळीतील शब्दानंतर स्वल्पविराम जोडण्यात येत आहे.

- परि.५.५.(ब)(१) मधील भत्ता या शब्दानंतर ' + अनुज्ञेय असल्यास व्यवसाय रोध भत्ता ' या शब्दांचा समावेश करण्यात येत आहे.

  परि.५.६ वगळण्यात येत असून त्याऐवजी खालील परि.५.६ चा समावेश करण्यात येत आहे.

- ५.६ निवृत्तीवेतनाची कमाल मर्यादा राज्य शासनाकडील उच्चतम अनुज्ञेय वेतन + उच्चतम ग्रेड वेतनाच्या ५० टक्के अशी राहील.(उच्चतम वेतन दिनांक १.१.२००६ पासून रुपये ६७,०००/-+ रुपये १२,०००/- अनुज्ञेय ग्रेड वेतन असे आहे.)

  निवृत्ती उपदान/मृत्यु उपदान संदर्भातील परि.६ वगळण्यात येत असून त्याऐवजी खालील परि.६ चा समावेश करण्यात येत आहे.

  निवृत्ती उपदान/मृत्यु उपदान-

- ६. संदर्भाधीन दिनांक ३० ऑक्टोबर २००९ च्या शासन निर्णयाच्या परि.४ मध्ये ( या शुध्दिपत्रकातील सुधारणेसह ) नमूद केलेल्या मूळ वेतनावर निवृत्ती/ मृत्यु उपदानाची परिगणना करण्यात येईल. दिनांक १ जानेवारी,२००६ते दिनांक १ सप्टेंबर,२००९ (मध्यान्ह पूर्व)पर्यन्त सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-यांना त्यांच्या अर्हताकारी सेवेच्या प्रत्येक पूर्ण सहामाही कालावधीकरिता त्याच्या मूळ वेतनाच्या एक चतुर्थांश ( कमाल साडेसोळा पट ) किंवा रुपये पाच लाख यापैकी जी रक्कम कमी असेल इतके निवृत्ती उपदान अनुज्ञेय राहील. दिनांक १ सप्टेंबर २००९ रोजी मध्यान्हानंतर किंवा त्यानंतर सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-यांकरिता त्यांच्या अर्हताकारी सेवेच्या प्रत्येक पूर्ण सहामाही कालावधीकरिता त्यांच्या मूळ वेतनाच्या एक चतुर्थांश ( कमाल साडेसोळा पट) किंवा रुपये सात लाख यापैकी जी रक्कम कमी असेल इतके निवृत्ती उपदान अनुज्ञेय राहील.

  परि.६.१ पूर्वीप्रमाणेच राहील.

  परि.७ वगळण्यात येत असून त्याऐवजी खालील परि.७ चा समावेश करण्यात येत आहे.:

- ७. कुटुंब निवृत्तीवेतनाची परिगणना मूळ वेतनाच्या ३० टक्के अशा एकरुप दराने काढण्यात येईल व या कुटुंब निवृत्तीवेतनाची कमाल मर्यादा राज्य शासनाकडील उच्चतम अनुज्ञेय वेतन + उच्चतम अनुज्ञेय ग्रेड वेतनाच्या ३० टक्के अशी राहील.(उच्चतम वेतन दिनांक १.१.२००६ पासून रुपये ६७,०००/-+ रुपये १२,०००/- अनुज्ञेय ग्रेड वेतन असे आहे.)

  परि. ७.१. व ७.२ पूर्वीप्रमाणेच राहतील.

- परि.८ मधील पहिल्या ओळीतील दिनांक ' २७ फेब्रुवारी २००९ पासून ' या शब्दाऐवजी ' २७ फेब्रुवारी, २००९ रोजी किंवा त्यानंतर सेवानिवृत्त होणा-या ' या शब्दांचा समावेश करण्यात येत आहे.
- परि.८.१ मधील तिस-या ओळीतील दिनांक २७ फेब्रुवारी २००९ या शब्दानंतर ' पासून अस्तित्वात येईल व या दिनांकास ' हे शब्द वगळण्यात येत असून त्याऐवजी ' रोजी ' या शब्दाचा समावेश करण्यात येत आहे.

- इंग्रजी प्रतीतील परि.८.१ मधील तिस-या ओळीतील **'The revised Rule and table will become absolute after '** या शब्दांऐवजी **' The existing Rule and table will become obsolete from '**या शब्दांचा समावेश करण्यात येत आहे.

- इंग्रजी प्रतीतील परि.८.१ मधील चौथ्या ओळीतील **' / commutation of pension '** हे शब्द वगळण्यात येत आहेत.
- इंग्रजी प्रतीतील परि.८.२ मधील पहिल्या ओळीतील **on or before 27 th February, 2009** या शब्दाऐवजी
**'Between 1st January 2006 and 26th February 2009 '** या शब्दांचा समावेश करण्यात येत आहे.

परि.८.२ मध्ये शेवटच्या ओळीनंतर पुढील वाक्य जोडण्यात येत आहे.

- ' सदर विकल्प शासकीय कर्मचा-याने तो जेथून सेवानिवृत्त झाला असेल त्या विभाग/ कार्यालय प्रमुखाकडे दिनांक ३० मार्च २०१० पर्यन्त सादर करावा. विकल्प विहित मुदतीत सादर न केल्यास ८.२ (अ) प्रमाने परिगणना करण्यात येईल.

परि.८.२ व) मधील सूत्र बदलण्यात आले असून सुधारित सूत्र खालीलप्रमाणे राहील:

- वाढीव निवृत्तीवेतन (सुधारित मूळ निवृत्तीवेतन वजा पूर्वीचे मूळ निवृत्तीवेतन) x १/३ x १२ x अंशराशीकरणाच्या सुधारित तक्त्यानुसार (जोडपत्र ४) कर्मचा-याच्या मूळ अर्जाच्या दिनांकाच्या पुढील जन्मदिनी होणा-या वयाकरिता निश्चित केलेले अंशराशीकृत मूल्य.

- परि.८.४ मधील शेवटचे वाक्य वगळण्यात येत आहे.

- परि.१० मधील ' प्रथम हप्त्यात ' हे शब्द वगळण्यात येत आहेत.तसेच याच परिच्छेदातील ' डिसेंबर २००९ ' हे शब्द वगळण्यात येत असून त्याऐवजी ' फेब्रुवारी २०१० ' या शब्दांचा समावेश करण्यात येत आहे.

परि.१३ मधील शेवटच्या वाक्यानंतर खालील वाक्यांचा समावेश करण्यात येत आहे.

- हयातकालीन थकबाकीची रक्कम अनुज्ञेय असल्यास सदर थकबाकीची रक्कम परि.१० मध्ये नमूद केलेल्या रकमा वजा /समायोजित करुन एकाच हप्त्यात त्याच्या कायदेशीर वारसास रोखीने अदा करण्यात यावी. त्याचप्रमाणे थकबाकीचा एक किंवा अधिक हप्ते रोखीने अदा करण्यात आल्यानंतर मृत्यू पावलेल्या निवृत्तीवेतनधारक/कुटुंबनिवृत्तीवेतनधारकांच्या बाबतीत अदा करावयाची बाकी असलेल्या हप्त्याची रक्कमही परि.१० मध्ये नमूद केलेल्या रकमा वजा/समायोजित करुन एकाच हप्त्यात त्याच्या कायदेशीर वारसास रोखीने अदा करण्यात यावी.

विवाम.

२.	शासन असाही आदेश देत आहे की, ज्यांना निवृत्तीवेतन योजना लागू केलेली आहे अशा मान्यता व अनुदानप्राप्त शैक्षणिक संस्था,कृषितर विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्न असलेली अशासकीय महाविद्यालये व कृषि विद्यापीठे यामधील निवृत्तीवेतनधारक यांना वरील शुध्दिपत्रक योग्य त्या फेरफारासह लागू राहील.

३.	महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम १९६१ ( सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक पाच ) कलम २४८ च्या परंतुकान्वये प्रदान केलेले अधिकार आणि त्यासंबंधीचे इतर सर्व अधिकार याचा वापर करुन शासन असाही आदेश देत आहे की, वरील शुध्दिपत्रक जिल्हा परिषदांचे निवृत्तीवेतनधारक यांनाही लागू राहतील.

४.	सदर शासन शुध्दिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या **www.maharashtra.gov.in** या वेब साईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २००९१२१६१२०८५६००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने ,

निलेश बा. वाडेकर,
शासनाचे उप सचिव.

ववव

**( For post 2006 pensioners)**

## ANNEXURE – I

(As referred in paragraph 5 of Government Resolution, Finanace Department, No.PEN 1099/CR 33/ SER-4 dated 30 th October,2009. )

A Government servant retiring on Superannuatiion , retiring ,invalid or compensation pension before completing qualifying service of 10 years, will be eligible for following service benefit :

| M.C.S. (Pension) Rules 1982 | Length of Service | Pension | Pro-rata service Gratuaty | Retirement Gratuity |
|---|---|---|---|---|
| Rule 110(1) & Rule 111 (1) | Less than 10 Years | Not eligible For pension. | At the rate of half month's basic pay for every completed six monthly period of qualifying service. | At the rate of one fourth of month's basic pay for every completed six monthly period of qualifying service. |

Vbm.

**( Pensioners retired after 27th February 2009 (A.N.))**

## ANNEXURE – II

(As referred in paragraph 5.1 of Government Resolution, Finanace Department, No.PEN 1099/CR 33/ SER-4 dated 30 th October,2009. )

A Government servant retiring on Superannuatiion , retiring ,invalid or compensation pension after completing qualifying service of 10 years or more but less than twenty years, will be eligible for following service benefit :

| **M.C.S. (Pension) Rules 1982** | **Length of Service** | **Pension** | **Pro-rata service Gratuaty** | **Retirement Gratuity** |
|---|---|---|---|---|
| Rule 110(1) & Rule 111 (1) | 10 Years or more but less than 20 years | 50% of last basic pay or average basis received during last 10 months whichever is more beneficial. | Not eligible for service gratuity. | At the rate of one fourth of last month's basic pay for every completed six monthly period of qualifying service. |

क्क्क्क्क्क

**( Pensioners retired after 27th February 2009 (A.N.))**

## ANNEXURE – III

(As referred in paragraph 5.2 of Government Resolution, Finanace Department, No.PEN 1099/CR 33/ SER-4 dated 30 th October,2009. )

A Government servant retiring on Superannuatiion , retiring ,invalid or compensation pension after completing qualifying service of 20 years or more will be eligible for following service benefit :

| **M.C.S. (Pension) Rules 1982** | **Length of Service** | **Pension** | **Pro-rata service Gratuaty** | **Retirement Gratuity** |
|---|---|---|---|---|
| Rule 110(1) & Rule 111 (1) | 20 Years or more than 20 years | 50% of last basic pay or average basis received during last 10 months whichever is more beneficial. | Not eligible for service gratuity. | At the rate of one fourth of last month's basic pay for every completed six monthly period of qualifying service not exceeding sixty six half years. |

******

विबाम .

## पुनर्नियुक्तीवरील सेवानिवृत्त कर्मचा-याचे सुधारित वेतनश्रेणीत वेतनाचे विनियमन.

वित्त विभाग,
शासन निर्णय क्रमांकः पुनिवे १००९/प्र.क्र.७८/सेवा-४, दि. १५ डिसेंबर ,२००९.

शासन निर्णयः

महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, २००९ च्या नियम २(२) नुसार जे शासकीय कर्मचारी दिनांक ३१ डिसेंबर,२००५ रोजी किंवा तत्पूर्वी सेवानिवृत्त झाले, आणि ज्यांना सेवानिवृत्तीनंतर त्या तारखेस पुन्हा नियुक्त करण्यात आले आणि ज्यांच्या सेवानिवृत्तीनंतरचा पुनर्नियुक्तीचा कालावधी त्या तारखेनंतर वाढवून दिलेला आहे अशांना महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, २००९ लागू नाहीत. अशा व्यक्तींना सुधारित वेतनश्रेणीचा लाभ देण्यात यावा का व त्यांचे सुधारित वेतनश्रेणीत वेतन कशाप्रकारे निश्चित करावे हा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

२. शासन आता असे निदेश देत आहे की, महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम २००९ मधील नियम ६ नुसार दि.१ जानेवारी,२००६ रोजी पुनर्नियुक्त असलेल्या निवृत्तीवेतनधारकांना त्या दिनांकाला त्यांना लागू असलेल्या विद्यमान वेतनश्रेणीत वेतन घेणे चालू ठेवणे किंवा १ जानेवारी,२००६ पासून सुधारित वेतनश्रेणी स्वीकारणे, यापैकी एक विकल्प निवडण्याची संधी देण्यात यावी. हे आदेश निर्गमित केल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत आवश्यक तो विकल्प देण्यात यावा. या कालमर्यादेपूर्वी विकल्प न दिल्यास पुनर्नियुक्तीवरील निवृत्तीवेतनधारकाने दिनांक १ जानेवारी, २००६ पासून सुधारित वेतनश्रेणी निवडली असे समजण्यात येईल. हे आदेश राज्य शासनाच्या नागरी विभागात करार पध्दतीने नियुक्त झालेले कर्मचारी/ अधिकारी वगळता नागरी पदावरुन किंवा सैनिकी पदावरुन निवृत्तीवेतन आणि/किंवा उपदान किंवा निवृत्तीवेतनविषयक इतर लाभ उदा.अंशदायी निधी (**Contributory fund**) घेऊन सेवानिवृत्त झालेल्या उर्वरित सर्व पुनर्नियुक्त कर्मचारी/ अधिका-यांना लागू राहतील. ज्या व्यक्ती दिनांक १ जानेवारी,२००६ ला पुनर्नियुक्तीवर होत्या, परंतु ज्यांचा पुनर्नियुक्तीचा कालावधी अगोदरच संपुष्टात आलेला आहे व ज्या सध्या शासन सेवेत नाहीत, अशा व्यक्तींच्या निदर्शनास हे आदेश आणण्यात यावेत.

३. निवृत्तीवेतन किंवा निवृत्तीवेतनविषयक इतर लाभ घेऊन सेवानिवृत्त झालेल्या पुनर्नियुक्त शासकीय कर्मचा-याचे प्रारंभिक वेतन, हे लाभ किंवा त्याचा काही भाग वगळून निश्चित करण्यात आले आहे,अशा पुनर्नियुक्तीवर असलेल्या सेवानिवृत्त कर्मचा-याने १ जानेवारी २००६ पासून सुधारित वेतनश्रेणी निवडली असेल किंवा सुधारित वेतनश्रेणी निवडल्याचे समजण्यात आले असेल तेथे, त्याचे सुधारित वेतनश्रेणीतील वेतन महाराष्ट्र नगरी सेवा (सुधारित वेतन) नियम २००९ मधील नियम ७ नुसार निश्चित करण्यात यावे. अशा रितीने काढण्यात आलेली रक्कम सुधारित वेतनश्रेणीतील टप्प्यात बसत नसेल तर वेतन अगोदरच्या टप्प्याला निश्चित करण्यात यावे व त्यामधील फरक हा 'वैयक्तिक वेतन' म्हणून देण्यात यावा. अशा रितीने काढण्यात आलेली रक्कम सुधारित वेतनश्रेणीच्या किमान वेतनापेक्षा कमी असेल तर वेतन, किमान वेतनाच्या टप्प्याला निश्चित करण्यात यावे. म्हणजेच 'सुधारित वेतनश्रेणीचे किमान वेतन वजा

निवृत्तीवेतन ' असे वेतन देण्यात यावे. अशा रितीने काढण्यात आलेली रक्कम सुधारित वेतनश्रेणीच्या कमाल वेतनापेक्षा जास्त येत असेल तर वेतन, कमाल वेतनाच्या टप्प्याला निश्चित करण्यात यावे व त्यामधील फरक हा ' वैयक्तिक वेतन' म्हणून देण्यात यावा. अशा सर्व प्रकरणांत निवृत्तीवेतन हे स्वतंत्रपणे घेण्यात येईल.

४. जेव्हा पुनर्नियुक्तीवरील सेवानिवृत्त कर्मचा-याने विद्यमान वेतनश्रेणीत त्याचे वेतन घेण्याचा आणि दिनांक १ जानेवारी २००६ नंतर ज्या दिनांकापासून सुधारित वेतनश्रेणीचा पर्याय निवडला असेल , तर त्याचे सुधारित वेतनश्रेणीतील वेतन, महाराष्ट्र नागरी सेवा ( सुधारित वेतन) नियम २००९ मधील नियम ११ नुसार निश्चित करण्यात यावे.

५. शासन असेही आदेश देत आहे की, सैनिकी विभागात वर्ग-अ पदावर कार्यरत असलेल्या व वयाची ५५ वर्षे पूर्ण होण्यापूर्वी सेवानिवृत्त होणा-या राजादिष्ट अधिकारी व नागरी अधिकारी यांच्या दुर्लक्षित सेवानिवृत्ती वेतनाची मर्यादा दिनांक १ जानेवारी,२००६ पासून रु.१०००/- (रु.एक हजार फक्त) करण्यात यावी. त्यामुळे नागरी व सैनिकी सेवेतील निवृत्तीवेतनाची अस्तित्वात असलेली मर्यादा दिनांक १ जानेवारी,२००६रोजी किंवा त्यानंतर पुनर्नियुक्त कर्मचा-यांच्या प्रकरणी लागु ठरणार नाही. जे कर्मचारी दिनांक १ जानेवारी,२००६ पूर्वी पुनर्नियुक्तीने कार्यरत आहेत, त्यांनी वेतननिश्चितीकरिता या आदेशातील तरतूदींचा विकल्प दिल्यास त्यांची दिनांक १ जानेवारी २००६ पासूनची वेतननिश्चिती त्यानुसर करण्यात यावी. त्यांनी हा विकल्प दिल्यास, ते दिनांक १ जानेवारी २००६ पासूनच प्रथम पुनर्नियुक्त झाले आहेत असे समजून त्यांच्या अटी सुधारण्यात याव्यात. हे आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत आवश्यक तो लेखी विकल्प देण्यात यावा. एकदा दिलेला विकल्प अंतिम असेल.

६. या शासन निर्णयातील तरतुदी महाराष्ट्र नागरी सेवा( निवृत्ती वेतन) नियम,१९८२ मधील नियम १५७ व नियम १६२ च्या तरतूदीनुसार जेथे पुनर्नियुक्त शासकीय कर्मचा-याचे पुनर्नियुक्तीनंतरचे वेतन निश्चित करण्यात आले आहे/येते, तेथे सुधारित वेतनश्रेणीनुसार वेतन निश्चितीसाठी लागू राहतील.

७. निवृत्तीवेतनधारकांस पुनर्नियुक्त करण्यास सक्षम असणारा प्राधिकारी, या आदेशानुसार पुनर्नियुक्तीवर असलेल्या निवृत्तीवेतनधारकाचे वेतन निश्चित करील. तथापि, महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, २००९ प्रमाणे करण्यात आलेली वेतननिश्चिती पडताळून पाहण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या वेतन पडताळणी पथकाकडून ही वेतननिश्चिती पडताळून पहाण्यात येईल.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या **www.maharashtra.gov.in** या वेब साईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २००९१२१५१५२१२६००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने ,

निलेश बा. वाडेकर,
शासनाचे उप सचिव.

******

विवाम.

## असुधारित वेतनश्रेणीत निवृत्तीवेतन/कुटुंबनिवृत्तीवेतन घेणा-या निवृत्तीवेतन/कुटुंबनिवृत्तीवेतनावरील महागाई वाढ.

वित्त विभाग,

शासन निर्णय, क्रमांक निमवा १००९/प्र.क्र.९२/सेवा-४, दिनांक १८ डिसेंबर,२००९.

पहा: १) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.निमवा १००९/८०/सेवा ४ दि.७ नोव्हेंबर,२००९.
२) शासन निर्णय, वित्त विभाग क्र.मभवा १११०९/प्र.क्र.९६/सेवा-९, दि.२ डिसेंबर,२००९.

### : निर्णय :

शासन असा आदेश देत आहे की, असुधारित वेतनश्रेणीत निवृत्तीवेतन/कुटुंब निवृत्तीवेतन घेणा-या राज्य शासकीय निवृत्तीवेतनधारक/कुटुंब निवृत्तीवेतनधारकांना त्यांच्या मूळ निवृत्तीवेतन /कुटुंब निवृत्तीवेतन आणि महागाई निवृत्तीवेतन/महागाई कुटुंब निवृत्तीवेतन (असल्यास) यांच्या एकूण रकमेवर दिनांक १ जूलै २००९ पासून ७३ टक्के या दराने महागाई वाढ देण्यात यावी.

२. रुपयाच्या अपूर्णांकात असलेली महागाई वाढीची रक्कम देताना ती पुढील रुपयात पुर्नांकित करावी.

३. प्रत्येक वैयक्तिक प्रकरणी देय होणा-या महागाई वाढीच्या रकमेची परिगणना करण्याची जबाबदारी ही निवृत्तीवेतन संवितरण प्राधिकारी म्हणजे यथास्थिती, अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई/कोषागार अधिकारी यांची राहील.

४. शासन असाही आदेश देत आहे की, ज्यांना निवृत्तीवेतन योजना लागू केलेली आहे अशा मान्यता व अनुदानप्राप्त शैक्षणिक संस्था, कृषितर विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्न असलेली अशासकीय महाविद्यालये व कृषि विद्यापीठे यांमधील निवृत्तीवेतनधारक/कुटुंब निवृत्तीवेतनधारक यांना वरील निर्णय, *योग्य त्या फेरफारांसह,* लागू राहील.

५. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम ,१९६२ ( सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक पाच) च्या कलम २४८ च्या परंतूकान्वये प्रदान केलेले अधिकार आणि त्यासंबंधातील इतर सर्व अधिकार यांचा वापर करुन शासन असाही आदेश देत आहे की, वरील निर्णय जिल्हा परिषदांचे निवृत्तीवेतनधारक/कुटुंब निवृत्तीवेतनधारक यांनाही लागू राहील.

६. ज्या राज्य शासकीय कर्मचा-यांनी सरकारी क्षेत्रातील उपक्रमांमध्ये /स्वायत्त संस्थांमध्ये/ स्थानिक संस्था इत्यादींमध्ये स्वत:ला सामावून घेतल्यानंतर एक रकमी ठोक रक्कम स्वीकारली आहे, व जे निवृत्तीवेतनाच्या १/३ इतका अंशराशीकृत भाग पुन:स्थापित करण्यासाठी तसेच शासन निर्णय, वित्त विभाग

,क्रमांक निअंक १०९९/३०६/सेवा-४, दिनांक १५ नोव्हेंबर १९९९ अनुसार अंशराशीकृत रकमेच्या सुधारणेस पात्र ठरले आहेत, अशा कर्मचा-यांनाही, शासन निर्णय वित्त विभाग, क्रमांक, निअंक १००१/५०/सेवा-४, दिनांक ९ एप्रिल,२००१ च्या तरतूदीनुसार त्यांच्या पूर्ण निवृत्तीवेतनावर, वरील परिच्छेद १ मध्ये विहित केलेल्या दिनांकापासून व विहित दराने महागाई वाढ अनुज्ञेय राहील.

७. यासंबंधीचा खर्च वरील परिच्छेदांत नमूद केलेल्या निवृत्तीवेतनधारकांची निवृत्तीवेतने ज्या अर्थ संकल्पीय शीर्षाखाली खर्ची टाकण्यात येतात, त्या शीर्षाखाली खर्ची टाकणात यावा व तो त्या त्या शीर्षांतर्गत मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

८. शासनाने वेळोवेळी मंजूर केलेल्या निवृत्तीवेतनावरील महागाई वाढी देण्याबाबतचे सध्या अस्तित्वात असलेले सर्व आदेश, *योग्य त्या फेरफारांसह,* आता मंजूर केलेल्या महागाई वाढीस देखील लागू राहतील.

९. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या **www.maharashtra.gov.in** या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २००९१२१८१४४७४९००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने ,

निलेश बा. वाडेकर,
शासनाचे उप सचिव.

******

.
.
.
..
.
.
.
.
.
विवाम.

## दिनांक १ जानेवारी २००६ पूर्वीच्या निवृत्तीवेतनधारकांच्या निवृत्तीवेतनात/कुटुंब निवृत्तीवेतनात सुधारणा करण्याबाबत.

वित्त विभाग,
शुध्दिपत्रक, क्रमांक सेनिवे १००९/प्र.क्र.२९/सेवा-४, दिनांक ०२ फेब्रुवारी,२०१०.

संदर्भ: १) शासन निर्णय, वित्त विभाग क्र.सेनिवे १००९/प्र.क्र.२९/सेवा-४, दि. ५ मे, २००९.
२) शासन शुध्दीपत्रक, वित्त विभाग,क्र.सेनिवे १००९/प्र.क्र.२९/सेवा ४,दि. २२ जून,२००९.
३) शासन शुध्दीपत्रक, वित्त विभाग क्र.सेनिवे १००९/प्र.क्र२९/सेवा-४, दि. ७ जुलै,२००९.
४) शासन शुध्दीपत्रक, वित्त विभाग क्र.सेनिवे १००९/प्र.क्र.२९/सेवा-४,दि.१२नोव्हेंबर,२००९

### शुध्दिपत्रक

दिनांक १ जानेवारी,२००६ पूर्वीच्या निवृत्तीवेतनधारकांच्या निवृत्तीवेतनात/ कुटुंब निवृत्तीवेतनात सुधारणा करण्याबाबतच्या संदर्भाधिन क्र.१ मधील दिनांक ५ मे,२००९ च्या शासन निर्णयात खालील बदल करण्यात येत आहेत.

परि.४ नंतर खालीलप्रमाणे परि.४.१ चा समावेश करण्यात येत आहे.

४.१ ज्या निवृत्तीवेतनधारक/कुटुंब निवृत्तीवेतनधारकांना असुधारित वेतनावर आधारित तात्पुरते निवृत्तीवेतन/ कुटुंब निवृत्तीवेतन विषयक लाभ, यथास्थिती, महाराष्ट्र नागरी सेवा(निवृत्तीवेतन) नियम १९८२ च्या नियम १२६, १३० व नियम १४० च्या तरतुदीनुसार मंजूर करण्यात आलेले आहेत, त्यांचे तात्पुरते निवृत्तीवेतन/ कुटुंबनिवृत्तीवेतन विषयक लाभही संदर्भाधिन क्रमांक १ वरील दि.५ मे २००९ च्या शासन निर्णयानुसार तसेच या नियमातील तरतूदींनुसार तात्पुरत्या स्वरुपात सुधारित करण्यात यावेत.

परि.६ मधील शेवटच्या वाक्यानंतर खालील वाक्यांचा समावेश करण्यात येत आहे.

- हयातकालीन थकबाकीची रक्कम अनुज्ञेय असल्यास सदर थकबाकीच्या रक्कमेतून वित्त विभाग शासन निर्णय क्र. सेनिवे १००८/प्र.क्र.९९/सेवा-४, दिनांक २७ ऑक्टोबर,२००८ अन्वये मंजूर केलेल्या अग्रिमाची रक्कम वजा/समायोजित करुन उर्वरित रक्कम एकाच हप्त्यात त्याच्या कायदेशीर वारसास रोखीने अदा करण्यात यावी.त्याचप्रमाणे थकबाकीचा एक किंवा अधिक हप्ते रोखीने अदा करण्यात आल्यानंतर मृत्यू पावलेल्या निवृत्तीवेतनधारक/कुटुंबनिवृत्तीवेतनधारकांच्या बाबतीत अदा करावयाची बाकी असलेल्या हप्त्याच्या रक्कमेतूनही वित्त विभाग शासन निर्णय क्र. सेनिवे १००८/प्र.क्र.९९/सेवा ४ दिनांक २७ ऑक्टोबर,२००८ अन्वये मंजूर केलेल्या अग्रिमाची रक्कम वजा/समायोजित करुन उर्वरित रक्कम एकाच हप्त्यात त्याच्या कायदेशीर वारसास रोखीने अदा करण्यात यावी.

मराठी प्रतीतील परि.८ वगळण्यात येत असून त्याऐवजी खालील परि.८ चा समावेश करण्यात येत आहे.

- सुधारित वेतन संरचनेनुसार निवृत्तीवेतन/कुटुंब निवृत्तीवेतन दिनांक १ एप्रिल २००९ पासून रोखीने अदा करण्यात यावे. दिनांक १ जानेवारी,२००६ ते दिनांक ३१ मार्च २००९ पर्यन्तच्या कालावधीतील थकबाकी शासन निर्णय,वित्त विभाग क्र.सेनिवे १००८/प्र.क्र.९९/सेवा ४ दिनांक २७ ऑक्टोबर, २००८ अन्वये मंजूर केलेल्या अग्रिमाची रक्कम समायोजित करुन ५ वर्षात ५ समान हप्त्यात रोखीने अदा करण्यात यावी. सन २००९ मध्ये अदा करावयाच्या प्रथम हप्त्याच्या थकबाकीची रक्कम असल्यास व ती अद्याप अदा करण्यात आली नसल्यास ती फेब्रुवारी,२०१० पर्यन्त अदा करावी.थकबाकीची उर्वरित रक्कम सन २०१० पासून दरवर्षी जून महिन्यात अदा करावी.

इंग्रजी प्रतीमधील परि.९ वगळण्यात येत असून त्याऐवजी खालील परि.९ चा समावेश करण्यात येत आहे.

- **Pension/family pension in the revised pay structure is payable in cash from 1 st day of April, 2009.The amount of arrears admissible for the period from 1st day of January, 2006 to 31st March,2009 will be payable in cash in five equal instalments over a period of five years after adjusting the amount of advance sanctioned vide Government Resoulution No. PEN 1008/CR 99/SER 4 dated 27.10.2008 . The arrears of first instalment if any to be paid in 2009 and if it is not paid then it should be paid till February,2009. Remaining amount of arrears should be paid in the month of June every year from 2010.**

२. शासन असाही आदेश देत आहे की, ज्यांना निवृत्तीवेतन योजना लागू केलेली आहे अशा मान्यता व अनुदानप्राप्त शैक्षणिक संस्था, कृषितर विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्न असलेली अशासकीय महाविद्यालये व कृषि विद्यापीठे यामधील निवृत्तीवेतनधारक यांना वरील शुध्दीपत्रक योग्य त्या फेरफारासह लागू राहील.

३. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम १९६१( सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक पाच)च्या कलम २४८ च्या परंतूकान्वये प्रदान केलेले अधिकार आणि त्यासंबंधीचे इतर सर्व अधिकार याचा वापर करुन शासन असाही आदेश देत आहे की, वरील शुध्दीपत्रक जिल्हा परिषदांचे निवृत्तीवेतनधारक यांनाही लागू राहील.

४. सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या **www.maharashtra.gov.in** या वेब साईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१००२०२१७४०५१००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने ,

निलेश बा. वाडेकर,
शासनाचे उप सचिव.

******

विवाम.

वेतन आयोगाच्या अनुषंगाने निवृत्तीवेतन/ कुटुंब
निवृत्तीवेतनाबाबत येणा-या तक्रारींचे निवारण करण्यासाठी
समन्वय अधिका-याची नियुक्ती करण्याबाबत.

वित्त विभाग,
शासन परिपत्रक क्र.सेनिवे १०१०/प्र.क्र. १६/सेवा-४, दिनांक ०३ फेब्रुवारी,२०१०.

राज्यातील निवृत्तीवेतन धारकांच्या निवृत्तीवेतनात सहाव्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने सुधारणा करण्याचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. या आदेशाच्या तसेच निवृत्तीवेतन धारकांना येणा-या अडचणी/मिळणारे लाभ इत्यादीची माहिती मिळविण्याकरिता तसेच पाचव्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने निवृत्ती वेतनधारक/कुटुंब निवृत्तीवेतनधारकांच्या निवृत्ती वेतनात /कुटुंब निवृत्तीवेतनात अद्यापही सुधारणा न झाल्याच्या तक्रारीसंदर्भात निवृत्ती वेतनधारक सतत शासनाकडे पत्रव्यहाराव्दारे /समक्ष भेटून/दूरध्वनीवरुन संपर्क साधत आहेत. त्या अनुषंगाने याबाबतची माहिती निवृत्ती वेतनधारकांना देऊन त्यांच्या अडचणी दूर करण्यासाठी वित्त विभागातील निवृत्ती वेतनविषयक कामकाज हाताळणारे श्री. र.आ.नागरगोजे, अवर सचिव यांची समन्वय अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे. सर्व निवृत्ती वेतनधार/ कुटुंब निवृत्ती वेतनधारक यांनी त्यांच्या तक्रारी संदर्भात श्री.नागरगोजे यांचेकडे संपर्क साधावा.श्री.र.आ.नागरगोजे यांचे दूरध्वनी क्रमांक व मंत्रालयातील दालन क्रमांक याची माहिती खालीलप्रमाणे आहे :-

श्री.र.आ.नागरगोजे, अवस सचिव, वित्त विभाग,
दालन क्रमांक ३५७ (ॲनेक्स), ३ रा मजला, मंत्रालय, मुंबई ३२.
दूरध्वनी क्रमांक : कार्यालय- २२८४५२३० /२२७९३५९०
मोबाईल क्र. ९८३३५८९२५२

सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांना अशा सूचना देण्यात येत आहेत की, खुद्द प्रशासकीय विभाग व त्या विभागाच्या अधिपत्याखालील कार्यालयातील निवृत्ती वेतनधारकांच्या अडचणींचे निवारण करण्यासाठी अवर सचिव दर्जाचा अधिकारी नियुक्त करुन त्यांचे नाव, कार्यालयीन दूरध्वनी क्रमांक, मोबाईल क्रमांक व मंत्रालयातील दालन क्रमांक या माहितीसह परिपत्रक तात्काळ निर्गमित करावे व त्याची प्रत वित्त विभागास पृष्ठांकित करावी.

३. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या **www.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध असून, त्याचा संकेतांक २०१००२०३१८२९५०००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने ,

निलेश बा. वाडेकर,
शासनाचे उप सचिव.

******

विबाम.

महाराष्ट्र नागरी सेवा ( निवृत्तीवेतन) नियम १९८२
मधील नियमांबाबतचे स्पष्टीकरण. .
अतिरिक्त खुलासा.

वित्त विभाग ,
शासन परिपत्रक क्रमांक: सेनिवे १००८/९६/सेवा-, दिनांक १ जुलै ,२०१०.

संदर्भ : शासन परिपत्रक वित्त विभाग,क्र.सेनिवे १००८/९६/सेवा-४, दि. ३ नोव्हेंबर,२००८.

## परिपत्रक:

महाराष्ट्र नागरी सेवा ( निवृत्तीवेतन) नियम १९८२ मध्ये करण्यात आलेल्या तरतूदीनुसार शासकीय कर्मचा-यांचे निवृत्तीवेतन/कुटुंबनिवृत्तीवेतन व अनुषंगीक बाबी विनियमित करण्यात येतात. तथापि या नियमातील काही तरतूदींच्या नियमास अभिप्रेत अर्थाबाबतचे स्पष्टीकरण संदर्भाधीन दिनांक ३ नोव्हेंबर,२००८ च्या परिपत्रान्वये करण्यात आले आहे. या परिपत्रकातील अ.क्र.९, १०, ११, १२, व १६ मध्ये केलेला खुलासा नियम १११, ११६ व १३० मधील मृत्यु उपदान/ कुटुंब निवृत्तीवेतन /सेवा उपदानासंदर्भातील आहे.

